सोलापूर

SOLAPUR TARUN BHARAT

# तरुण भारत

न मे कर्मफले स्पृहा

सोलापूर, धाराशिव, लातूर, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना, बीड, अहमदनगर व सातारा येथून वितरित

धाराशिव | गुरुवार, १३ नोव्हेंबर २०२५ | वर्ष ३ रे अंक २५३ | पाने १२ | किंमत रु. ६/- ■ RNI No. MAHMAR/2023/86468 ■ Postal Regd No. SLP/32/2024-2026. ▌dainiktarunbharat.com ▌epaper.dainiktarunbharat.com

## विचारपुष्प



नि आपल्यापैकी प्रत्येकाला वैयक्तिकदृष्ट्या संघकार्याच्या विस्तारासाठी जागरूक राहिलेच पाहिजे. सोबतच एक आणि एक जोडून आवां (आम्ही दोघे) झाले पाहिजे आणि आम्ही दोघांनी मिळून कार्यवृद्धीसाठी प्रयत्न केले पाहिजेत. अखेर 'आवां'च्या या शृंखलेत सर्व कार्यकर्त्यांना जोडून 'वयं' (आम्ही सर्व) झाले पाहिजे आणि सर्वांनी सामूहिकपणे आपली संपूर्ण शक्ती, बुद्धी आणि युक्तीचा उपयोग करून कार्यासाठी वाहून घेतले पाहिजे.

**यादवराव कृष्ण जोशी**
रा. स्व. संघाचे पूर्व सह सरकार्यवाह

# दिल्ली स्फोट हा दहशतवादच

## केंद्र सरकारची भूमिका ● केंद्रीय मंत्रिमंडळाच्या बैठकीत ठराव




◆ **नवी दिल्ली, १२ नोव्हेंबर**

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या अध्यक्षतेखाली बुधवारी झालेल्या मंत्रिमंडळाच्या बैठकीत लाल किल्ल्याजवळ झालेला स्फोट हे दहशतवादी कृत्यच असल्याचे केंद्र सरकारने म्हटले आहे. मंत्रिमंडळाने पीडितांच्या कुटुंबीयांप्रती तीव्र शोक व्यक्त करीत दोन मिनिटांचे मौन पाळले.

हे कृत्य देशाच्या ऐक्य आणि शांततेवर हल्ला आहे,असे बैठकीत सरकारने म्हटले. या हल्ल्यातील दोषी, त्यांचे साथीदार आणि सूत्रधारांची ओळख पटवून त्यांच्यावर लवकरात लवकर कारवाई करावी, असा निर्देश सरकारने तपास यंत्रणांना दिला. दहशतवाद खपवून न घेण्याच्या धोरणाचा पुनरुच्चार केंद्राने केला.

हा हल्ला भ्याड आणि निंदनीय असल्याचे केंद्र सरकारने स्पष्ट केले. भारत हा दहशतवाद खपवून न घेण्याचे धोरण कायम ठेवेल. सुरक्षा यंत्रणांनी सतर्क राहावे आणि अत्यंत गांभीर्याने तपास करण्याचा निर्देश सरकारने यंत्रणांना दिला.

जगभरातील कित्येक देशांनी भारताला दिलेल्या पाठिंब्याबद्दल कॅबिनेटने त्यांचे आभार मानले. संकटाच्या या काळात जागतिक सहकार्य भारताची दृढता आणि मजबूत करीत आहे, असे सरकारने म्हटले. ◂(वृत्तसंस्था)

## 'अल-फलाह' संशयाच्या भोवऱ्यात




◆ **फरिदाबाद, १२ नोव्हेंबर**

दिल्लीतील लाल किल्ला स्फोट आणि 'व्हाईट कॉलर्ड' मॉड्युलचा पर्दाफाश झाल्यानंतर हरयाणाच्या फरिदाबाद जिल्ह्यातील मुस्लिमबहुल धौज गावातील अल-फलाह विद्यापीठ आणि त्याचा ७६ एकरचा विस्तीर्ण परिसर संशयाच्या भोवऱ्यात अडकला आहे.

येथील सुशिक्षित व्यक्ती पाकिस्तान समर्थित सूत्रधारांच्या इशाऱ्यावर काम करीत असल्याचे आढळून आले. त्यामुळे अशा व्यक्तींसाठी विद्यापीठ सुरक्षित आश्रयस्थळ कसे झाले, याचा तपास सुरक्षा यंत्रणा करीत आहेत. संकेतस्थळावर उपलब्ध माहितीनुसार, या विद्यापीठाची स्थापना हरयाणा विधानसभेच्या खाजगी विद्यापीठ कायद्यानुसार करण्यात आली आहे. या विद्यापीठाने १९९७ मध्ये अभियांत्रिकी महाविद्यालय सुरू केले. २०१३ मध्ये अल-फलाह अभियांत्रिकी महाविद्यालयाला विद्यापीठ अनुदान आयोगाच्या राष्ट्रीय मूल्यांकन आणि मान्यता परिषद अर्थात् नॅकने 'अ' श्रेणी दिली होती.

हरयाणा सरकारने २०१४ मध्ये याला विद्यापीठाचा दर्जा दिला. अल-फलाह वैद्यकीय महाविद्यालय विद्यापीठाशी संलग्न आहे.

अल्पसंख्यक विद्यार्थ्यांसाठी असलेल्या अलिगड मुस्लिम विद्यापीठ आणि जामिया मिलिया इस्लामिया विद्यापीठाचा एक उत्कृष्ट पर्याय म्हणून मागील काही वर्षांपासून अल-फलाह विद्यापीठाने स्वतःला सादर केले, अशी माहिती तज्ज्ञांनी दिली. दिल्लीच्या जामिया मिलिया इस्लामिया विद्यापीठापासून केवळ ३० किमी अंतरावर असलेले हे विद्यापीठ एका विश्वस्त संस्थेद्वारे चालवले जाते. ही संस्था १९९५ मध्ये स्थापन करण्यात आली. जावेद अहमद सिद्दिकी या संस्थेचे अध्यक्ष आहेत. मुफ्ती अब्दुल्लाह कासमी एमए हे उपाध्यक्ष आणि मोहम्मद वाजिद हे सचिव आहेत. प्रो. डॉ. मोहम्मद परवेझ हे सध्या विद्यापीठाचे रजिस्ट्रार आणि डॉ. भूपिंदर कौर आनंद या विद्यापीठाच्या कुलगुरू आहेत. ◂(वृत्तसंस्था)

## 'जमात'च्या ३०० ठिकाणांवर छापेमारी



**श्रीनगर** : काश्मिरातील दहशतवाद परिसंस्थेवरील कारवाईची तीव्रता वाढवताना पोलिसांनी बुधवारी प्रतिबंधित जमात-ए-इस्लामीशी संबंधित खोऱ्यातील ३०० ठिकाणांवर छापेमारी केली, अशी माहिती अधिकाऱ्यांनी दिली. जमातशी संबंधित संघटना वेगवेगळ्या आघाड्यांच्या नावाखाली त्यांच्या कारवाया पुनरुज्जीवित करण्याचा प्रयत्न करीत असल्याची विश्वसनीय गोपनीय माहिती मिळाल्यानंतर ही कारवाई करण्यात आली. कुलगाम, पुलवामा, शोपियाँ, बारामुल्ला आणि गंदेरबाल जिल्ह्यांमधील काही ठिकाणांवर ही छापेमारी करण्यात आली. एकट्या कुलगाममध्ये २०० पेक्षा जास्त ठिकाणी छापे घातले. तसेच जवळपास ५०० संशयितांची चौकशीही करण्यात आली. त्यापैकी काही जणांना प्रतिबंधक कायद्याच्या अन्वये ताब्यात घेऊन जिल्हा कारागृहात पाठवण्यात आले. छापेमारीत आक्षेपार्ह साहित्य, डिजिटल उपकरणे जप्त करण्यात आले. जमातच्या काही सदस्यांची चौकशी करण्यात आली, असे अधिकाऱ्याने सांगितले. ■

### उमरची 'ती' कार अखेर सापडली

स्फोटात मृत्युमुखी पडल्याचा संशय असलेल्या डॉ. उमरची आणखी एक लाल रंगाची ही इकोस्पोर्ट्स कार फरिदाबाद पोलिसांनी खंदावली गावातून जप्त केली. जप्त केल्यानंतर हे वाहन तपासणीसाठी न्यायवैद्यक प्रयोगशाळेत पाठवण्यात आले. या वाहनाची नोंदणी २२ नोव्हेंबर २०१७ रोजी दिल्लीतील राजौरी गार्डन आरटीओत करण्यात आली आहे. ती डॉ. उमरने खरेदी केली होती. ■

# शिवसेना पक्ष, चिन्ह सुनावणी नवीन वर्षात



◆ **नवी दिल्ली, १२ नोव्हेंबर**

शिवसेना पक्ष व चिन्हाबाबत बुधवारी अखेर सर्वोच्च न्यायालयात अंतिम सुनावणीला सुरूवात झाली. त्यात न्यायालयाने या प्रकरणी दोन्ही पक्षकारांना युक्तिवादासाठी किती वेळ लागेल? अशी विचारणा करत त्यांची मते जाणून घेतली. त्यानंतर सुनावणी २१ जानेवारीपर्यंत लांबणीवर टाकली.

कोर्टाने या प्रकरणी २१ व २२ असे सलग दोन दिवस सुनावणी होण्याचे संकेत दिले. त्यामुळे पुढच्या सुनावणीत न्यायालय दोन्ही पक्षांचा युक्तिवाद ऐकून आपला निकाल देऊ शकते किंवा तो राखून ठेवू शकते. या सुनावणीवरच उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे व शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांचे राजकीय भवितव्य ठरणार आहे.

बुधवारी न्यायमूर्ती सूर्यकांत व न्यायमूर्ती जॉयमल्या बागची यांच्या न्यायासनापुढे शिवसेना प्रकरणाची सुनावणी झाली. सुनावणी सुरू होताच कोर्टाने ठाकरे व शिंदे गटाला तुम्हाला युक्तिवादासाठी किती वेळ लागेल? याची विचारणा केली. त्यावर ठाकरे गटाचे वकील ज्येष्ठ विधिज्ञ देवदत्त कामत यांनी आपल्याला २ तास पुरेसे असल्याचे स्पष्ट केले. तर वकील डॉक्टर ए एम सिंघवी यांनी आपल्याला किमान ३ तास लागतील असे नमूद केले. त्यानंतर कोर्टाने या प्रकरणी काही मुद्दे एकमेकांशी जुळणारे असू शकतात असे नमूद करत सुनावणी २१ जानेवारीपर्यंत तहकूब केली. ◂(वृत्तसंस्था)

### सलग दोन दिवस सुनावणी

सुप्रीम कोर्ट यासंबंधी म्हणाले, या प्रकरणी काही मुद्दे एकमेकांशी जुळणारे असू शकतात. पण प्रथम, शिवसेनेच्या प्रकरणात युक्तिवाद सुरू होतील. त्यानंतर राष्ट्रवादी काँग्रेसच्या केसेस येतील. याचिकाकर्त्या पक्षाला युक्तिवादासाठी ३ तासांचा वेळ दिला जाईल. तर प्रतिवादींना २ तासांचा वेळ दिला जाईल. दोन्ही पक्षांना युक्तिवाद पूर्ण करण्यासाठी व सोयीचे संकलन करण्यासाठी १ नोडल वकील नियुक्त करता येईल. या प्रकरणी २१ जानेवारी रोजी सकाळी ११.३० वा. सुनावणी होईल. त्यानंतर हे प्रकरण दुसऱ्या दिवशी म्हणजे २२ जानेवारी रोजीही ऐकले जाईल. याचा अर्थ या प्रकरणी २१ व २२ जानेवारी रोजी सलग दोन दिवस या प्रकरणाची सुनावणी होणार आहे. ■

## महत्त्वाचे

### बाजारातील तेजीने गुंतवणूकदार आश्वस्त

**मुंबई** : बुधवारी भारतीय शेअर बाजारात जोरदार तेजी दिसून आली, ज्यामुळे गुंतवणूक दारांना मोठा दिलासा मिळाला. प्रमुख कॉर्पोरेट शेअर्समध्ये



जोरादर खरेदी झाल्याने निर्देशांक आणि निफ्टीत वाढ झाली. आयटी आणि आर्थिक क्षेत्रातील शेअर्सनी बाजाराला चालना दिली. दिवसभरातील कारभारात टीसीएस, बजाज फिनसर्व्ह, इटर्नल लिमिटेड, रिलायन्स इंडस्ट्रीज, बजाज फायनान्स, टेक महिंद्रा यांच्यात मोठी वाढ दिसली. दुसरीकडे, काही शेअर्सवर दबाव दिसून आला. त्यात बीईएल, हिंदुस्थान युनिलिव्हर, ट्रेंट, मारुती सुझुकी, सन फार्मा आणि आयटीसी यांचा समावेश होता. ■

### व्लादिमिर पुतिन यांचा ५ डिसेंबरला भारत दौरा

**मॉस्को** : रशियाचे राष्ट्राध्यक्ष व्लादिमीर पुतिन यांच्या भारत दौऱ्याची तारीख निश्चित झाली आहे. ५ डिसेंबर रोजी पुतिन भारत भेटीवर येणार आहे, यावेळी एसयू-५७ लढाऊ विमाने, एस-४०० हवाई संरक्षण प्रणाली खरेदीसंदर्भात करार होण्याची शक्यता आहे. क्रेमलिनने जारी केलेल्या निवेदनात पुतिन यांच्या भारत दौऱ्याची तारीख निश्चित केली आहे. ५ डिसेंबर रोजी पुतिन राजधानी दिल्लीत येणार असून, यावेळी ते भारत-रशिया वार्षिक शिखर परिषदेत सहभागी होतील. डिसेंबर २०२१ नंतरचा पुतिन यांचा हा पहिलाच भारत दौरा आहे.




### नागरी सेवा मुख्य परीक्षेचा निकाल जाहीर

**नवी दिल्ली** : केंद्रीय लोकसेवा आयोगाने (यूपीएससी) नागरी सेवा (सिव्हिल सर्व्हिसेस) मुख्य परीक्षा २०२५ चे निकाल जाहीर केले आहेत. मुलाखत फेरीसाठी एकूण २,७३६ उमेदवार पात्र ठरले आहेत. मुख्य परीक्षेत बसलेले उमेदवार अधिकृत संकेतस्थळाला भेट देऊन त्यांचे निकाल तपासू शकतात. निकाल अधिकृत संकेतस्थळावर पीडीएफ स्वरूपात प्रसिद्ध करण्यात आले आहेत. उमेदवारांचे रोल नंबर निकालावर सूचिबद्ध आहेत. निकाल पाहण्यासाठी उमेदवारांच्या यादीत रोल नंबर शोधावा लागणार आहे. यूपीएससीने २२ ते ३१ ऑगस्ट दरम्यान नागरी सेवा मुख्य परीक्षा घेतली आणि त्याचे निकाल बुधवारी जाहीर झाले. पात्र उमेदवारांना मुलाखतीसाठी हजर राहावे लागेल. सहभागी होण्यासाठी, त्यांनी वेबसाईटवर उपलब्ध असलेला डीएएफ भरून द्यावा लागेल. या आधारे त्यांची मुलाखत यूपीएससी दिल्ली येथे घेतली जाईल. यूपीएससी लवकरच त्यांच्या अधिकृत वेबसाईटवर मुलाखतीच्या तारखा जाहीर करेल. अंतिम निकाल जाहीर झाल्यापासून १५ दिवसांच्या आत मुलाखतीनंतर सर्व उमेदवारांच्या गुणपत्रिका आयोगाच्या संकेतस्थळावर अपलोड केल्या जातील. त्या संकेतस्थळावर ३० दिवस उपलब्ध राहतील.

# मेळघाटातील कुपोषणामुळे होणारे बालमृत्यू भयावह

## उच्च न्यायालयाने राज्य सरकारला फटकारले



◆ **मुंबई, १२ नोव्हेंबर**

आदिवासीबहुल मेळघाटात कुपोषणामुळे होणाऱ्या बालमृत्यूचा प्रकार भयावह आहे, असा संताप मुंबई उच्च न्यायालयाने बुधवारी व्यक्त केला आणि या मुद्यावर अत्यंत बेजबाबदार दृष्टिकोनाबद्दल राज्य सरकारला फटकारले.

मेळघाट परिसरात जून २०२५ ते आतापर्यंत शून्य ते सहा महिन्यांच्या वयोगटातील ६५ बालकांनी प्राण गमावले, असे रेवती मोहिते डेरे आणि संदेश पाटील यांच्या खंडपीठाने नोंदवले. हा भयावह प्रकार आहे. सरकारने याबाबत चिंता दाखवली पाहिजे तसेच काळजीही घेतली पाहिजे, असे न्यायालयाने म्हटले.

पूर्व महाराष्ट्रातील अमरावती जिल्ह्यातील मेळघाट भागात कुपोषणामुळे बालके, गर्भवती महिला आणि स्तनदा मातांच्या मृत्यूंची संख्या जास्त असल्याचे अधोरेखित करणाऱ्या अनेक जनहित याचिकांवर उच्च न्यायालयात सुनावणी सुरू होती.

या मुद्यावर आम्ही २००६ पासून आदेश देत आहोत. परंतु, सरकारने कागदावर सर्वकाही व्यवस्थित असल्याचा दावा करताना जमिनीवरील वास्तव मात्र वेगळेच असल्याचे न्यायालयाने नमुद केले. या मुद्यावर सरकार किती गांभीर्य बाळगते, यावरून दिसून येते. सरकारचा यावरील दृष्टिकोन अत्यंत बेजबाबादार आहे, असे न्यायालयाने म्हटले.

या मुद्याची सरकारने काळजी घ्यायला हवी. जूनपासून आतापर्यंत ६५ बालकांचा मृत्यू झाला. तुम्ही काळजी घेतली पाहिजे. आम्ही करतो, त्याप्रमाणे तुम्हीही चिंता केली पाहिजे. हा अत्यंत भयावर प्रकार असल्याचे न्यायालयाने म्हटले.

हा मुद्दा अत्यंत गांभीर्याने घ्या, असे सांगताना न्यायालयाने सार्वजनिक आरोग्य, आदिवासी, महिला आणि बालकल्याण तसेच वित्त विभागाच्या प्रधान सचिवांना २४ नोव्हेंबर रोजी हजर राहण्याचा आदेश दिला.

ही अतिशय दुर्दैवी परिस्थिती आहे. सरकार सार्वजनिक आरोग्याचा मुद्दा इतक्या हलक्यात घेत आहे, असे न्यायालयाने नमूद केले. चारही प्रधान सचिवांनी या मुद्यावर उचललेल्या पावलांची माहिती देणारे प्रतिज्ञापत्र दाखल करण्याचा आदेश न्यायालयाने दिला. ◂(वृत्तसंस्था)

### डॉक्टरांना अधिक वेतन द्या

अशा आदिवासी भागातील परिस्थितीचा विचार करून नियुक्त केलेल्या डॉक्टरांना प्रोत्साहन मिळेल म्हणून अधिक वेतन द्यावे. काही जबाबदारी असली पाहिजे. तुम्ही यंत्रणा विकसित करायला पाहिजे, असे उच्च न्यायालयाने म्हटले. ■




# सामान्य माणसांच्या प्रश्नांना न्याय देणारे वृत्तपत्र : महंत वाकोजी बुवा

### 'तरुण भारत'च्या धाराशिव जिल्हा आवृत्तीच्या नुतन कार्यालयाचे थाटात उद्घाटन



**तभा वृत्तसेवा,**
**धाराशिव, दि. १२ नोव्हेंबर-**

'तरुण भारत' हे आपल्या राष्ट्रीयतावादी दृष्टिकोन विषयांवरील ठोस भूमिका, आणि सांस्कृतिक राष्ट्रवादासह भारतीय सांस्कृतिक मूल्यांवर आधारित विषयांवर परखडपणे लिखाण करत सामान्य माणसांच्या प्रश्नांना न्याय देणारे दैनिक आहे, असे मत श्री तुळजाभवानी मातेचे महंत वाकोजी बुवा यांनी जिल्हा आवृत्ती कार्यालय उद्घाटनप्रसंगी प्रसंगी व्यक्त केले.

दैनिक सोलापूर तरुण भारत धाराशिव जिल्हा आवृत्ती नुतन कार्यालय आरंभ बुधवार १२ नोव्हेंबर रोजी तरुण भारतचे मुख्य समूह संपादक दिलीप पेठे, श्री तुळजाभवानी मातेचे महंत वाकोजी बुवा, प्रकाशक दिलीप दुलंगे, जिल्हा संघचालक ॲड. रवींद्र कदम, जिल्हा माहिती अधिकारी विवेक खडसे, मराठवाडा आवृत्ती विभाग प्रमुख राजाराम मस्के, डॉ. सुश्रुत डंबळ, डॉ.सतीश महामुनी, पुजारी नगर फाऊंडेशनचे अध्यक्ष गणेश पुजारी, बापू जगदे, अब्दुल सय्यद, बाळासाहेब शामराज, उमेश गवते, वितरण व्यवस्थापक नागसेन शिवशरण, जिल्हा प्रतिनिधी अनिल आगलावे, उपसंपादक विपीन वीर तालुका प्रतिनिधी यांच्या उपस्थितीत संपन्न झाले. प्रखर राष्ट्रीय विचाराचे वृतपत्र म्हणून दै. सोलापूर तरुण भारत धाराशिव जिल्ह्यात गेल्या अनेक दशकापासून वाचकांच्या पसंतीस उतरले आहे. धाराशिव नुतन कार्यालय शुभारंभ प्रसंगी विविध क्षेत्रातील मान्यवरांनी उपस्थित राहून शुभेच्छा दिल्या.

# लंडनमधील 'इंडिया हाऊस' सरकार घेणार ताब्यात

## स्वातंत्र्यवीर सावरकरांचे होते वास्तव्य





◆ **मुंबई, १२ नोव्हेंबर**


लंडनमधील स्वातंत्र्य सैनिकांचे वास्तव्य असलेले 'इंडिया हाऊस' राज्य सरकार ताब्यात घेऊन त्यास स्मारक म्हणून जतन करणार आहे. 'इंडिया हाऊस'मध्ये स्वातंत्र्यवीर विनायक दामोदर सावरकर यांचे वास्तव्य होते, अशी माहिती सांस्कृतिक कार्य मंत्री आशिष शेलार यांनी बुधवारी दिली. आशिष शेलार यांच्या मंत्रालयातील दालनात बैठक पार पडली. यावेळी आमदार देवयानी फरांदे, पुरातत्व विभागाचे अधिकारी उपस्थित होते. बैठकीनंतर माहिती देताना शेलार म्हणाले, रघुजीराजे भोसले यांची ऐतिहासिक तलवार आणण्यासाठी लंडन दौऱ्यावर असताना इंडिया हाऊसला भेट दिली होती. त्यावेळी लंडनस्थित भारतीयांनी स्वातंत्र्यवीर सावरकर यांच्यासह इतर स्वातंत्र्य सैनिकांच इंडिया हाऊसमध्ये वास्तव्य असल्याची बाब निदर्शनास आणून दिली होती. ◂(वृत्तसंस्था)


# निवडणुकीसाठी भाजपाचे ४० स्टार प्रचारक जाहीर


## फडणवीस, गडकरी, रवींद्र चव्हाण, बावनकुळे, मुनगंटीवारांचा समावेश











◆ **मुंबई, १२ नोव्हेंबर**

भाजपने आगामी स्थानिक स्वराज्य संस्था निवडणुकीच्या पृष्ठभूमीवर पक्षाच्या उमेदवारांचा प्रचार करण्यासाठी स्टार प्रचारकांची नावं जाहीर केली आहेत. यामध्ये मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, केंद्रीय मंत्री नितीन गडकरी, राष्ट्रीय सहसंघटन मंत्री शिव प्रकाश, राष्ट्रीय सरचिटणीस विनोद तावडे, केंद्रीय मंत्री पियुष गोयल, प्रदेशाध्यक्ष रविंद्र चव्हाण, मंत्री बावनकुळे आणि माजी मंत्री सुधीर मुनगंटीवारांचा समावेश आहे.

राज्यामध्ये आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांच्या पृष्ठभूमीवर सर्वच पक्ष कामाला लागले आहेत. त्यामध्ये आता प्रत्यक्ष निवडणुकांच्या तारखा जाहीर झाल्यानंतर भाजपच प्रत्येक ठिकाणी आघाडी घेताना दिसत आहे. स्थानिक पातळीवरील गणितं सांभाळून जिथे युती होते तिथे युतीच्या आणि जिथे युती होत नाही तेथे मैत्रिपूर्ण लढतीसाठी भाजपा सज्ज झालेलं आहे.

भाजपाने जारी केले या स्टार प्रचारकांमध्ये राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण, केंद्रीय मंत्री नितीन गडकरी, राष्ट्रीय सहसंघटनमंत्री शिव प्रकाश, चंद्रशेखर बावनकुळे, विनोद तावडे, अशोक चव्हाण, पीयूष गोयल, नारायण राणे, सुधीर मुनगंटीवार, मंत्री चंद्रकांत (दादा) पाटील, रावसाहेब दानवे पाटील, मंत्री ॲड. आशिष शेलार, मंत्री राधाकृष्ण विखे पाटील, केंद्रीय मंत्री मुरलीधर मोहोळ, रक्षा खडसे, मंत्री पंकजा मुंडे, गिरीश महाजन, गणेश नाईक, जयकुमार रावल, छ.शिवेंद्रराजे भोसले, नितेश राणे, जयकुमार गोरे, मेघना बोर्डीकर, अमर साबळे, अतुल सावे, अशोक उईके, चित्रा वाघ, प्रविण दरेकर, भागवत कराड, गोपीचंद पडळकर, डॉ.संजय कुटे, अमित साटम, धनंजय महाडिक, ॲड. माधवी नाईक, रणधीर सावरकर, अशोक नेते, मंगेश चव्हाण, प्रसाद लाड, इद्रिस मुलतानी अशा ४० नेत्यांचा समावेश आहे. ◂(तभा वृत्तसेवा)

### स्वबळावर लढण्यास सज्ज

दरम्यान राज्यामध्ये काही अपवाद वगळता बहुतांश ठिकाणी मात्र सर्वच पक्ष स्वबळावर निवडणुका लढणार असल्याचे चित्र सध्यातरी दिसत आहे. परिस्थिती काहीही समोर आली तरी, ताकदीनं लढण्यासाठी भाजपाने कंबर कसली असून, त्यासाठी आता आपल्या उमेदवारांच्या प्रचारार्थ भाजपा नेत्यांना स्टार प्रचारक म्हणून उतरविले आहे.

CMYK
सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले. विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



# महाराष्ट्र एटीएसची ठाणे-पुण्यात छापेमारी

### अल-कायदा मॉड्युल प्रकरणात कारवाई




◆ **मुंबई, १२ नोव्हेंबर**

अल-कायदा आणि इतर प्रतिबंधित संघटनांसोबत संबंध असल्याच्या आरोपाखाली अटक करण्यात आलेल्या सॉफ्टवेअर अभियंत्याच्या प्रकरणात महाराष्ट्र एटीएसने ठाण्यात एका शिक्षकावर तसेच पुण्यात छापेमारी केली, अशी माहिती अधिकाऱ्यांनी बुधवारी दिली.

ही छापेमारी दिल्लीत झालेल्या स्फोट प्रकरणात नव्हती. मात्र, मानक प्रक्रियेचा भाग म्हणून या घटनेसोबत महाराष्ट्राचा काही संबंध आहे का, याची तपासणी केली जात आहे, असे महाराष्ट्र एटीएसने स्पष्ट केले. अटक केलेला पुण्यातील सॉफ्टवेअर अभियंता झुबेर हंगरगेकरने एका बैठकीसाठी ठाणे जिल्ह्यातील मुंब्रा येथील शिक्षकाच्या घराचा वापर केला होता, असे अधिकाऱ्यांनी सांगितले.

अल-कायदाच्या उपसंघटनेशी संबंध असल्याबद्दल आणि कट्टरवादी कारवायांमध्ये सहभागी असल्याच्या संशयावरून एटीएसने २७ ऑक्टोबर रोजी पुण्यातून हंगरगेकर याला अटक केली होती. त्याच्या जुन्या फोनमध्ये पाकिस्तानी फोन नंबर चौकशीदरम्यान एटीएसला आढळले होते. बैठकीसाठी त्याने एकदा मुंब्रा येथे भेट दिली होती, असेही पुढील तपासात एटीएसला आढळले होते. (वृत्तसंस्था)

## प्रजासत्ताक दिनाला लक्ष्य करण्याचा कट?



डॉ. मुझम्मिलने जानेवारी महिन्यात लाल किल्ल्याची कित्येक वेळा रेकी केल्याची खळबळजनक माहिती त्याच्या फोनमधील डम्प डेटाच्या विश्लेषणातून समोर आली, अशी माहिती अधिकाऱ्यांनी दिली. पोलिसांनी 'व्हाईट कॉलर' मोड्युलचा पर्दाफाश करीत डॉ. मुझम्मिलला अटक केली आहे. प्रजासत्ताक दिनाला लाल किल्ल्याला लक्ष्य करण्याच्या मोठ्या कटाचा हा भाग असवा, असा संशय पोलिसांनी व्यक्त केला. पण, त्यावेळी परिसरात गस्त वाढवली असल्याने तो यशस्वी होऊ शकला नाही.

दिल्लीतील स्फोट झालेल्या ठिकाणावरून जवळपास ४० नमुने गोळा करण्यात आले. याच्या प्राथमिक विश्लेषणात स्फोटकांच्या नमुन्यात अमोनियम नायट्रेटचे संकेत मिळाले, अशी माहिती न्यायवैद्यक प्रयोगशाळेच्या कर्मचाऱ्यांनी दिली.

जानेवारी महिन्याच्या पहिल्या आठवड्यात डॉ. मुझम्मिल कित्येक वेळा लाल किल्ला आणि परिसरात असल्याचे डम्प डेटा विश्लेषणातून समोर आले, असे एका वरिष्ठ पोलिस अधिकाऱ्याने नाव जाहीर न करण्याच्या अटीवर सांगितले.

### नमुन्यात दोन प्रकारची स्फोटके

न्यायवैद्यक प्रयोगशाळेने स्फोट झालेल्या भागातून ४० नमुने गोळा केले. यात काडसुसांच्या दोन रिकाम्या पुंगळ्या, जिवंत काडतुसे आणि दोन वेगवेगळ्या प्रकारच्या स्फोटकांचे नमुने असल्याचे अधिकाऱ्यांनी सांगितले. यातील एक नमुना अमोनियम नायट्रेट या स्फोटकाचा असू शकतो, अशी शक्यता वर्तवण्यात आली.

### मुंब्रा-कोंढव्यात छापेमारी

एटीएस अधिकाऱ्यांनी मंगळवारी मुंब्राला जाऊन संबंधित शिक्षकाची चौकशी केली. हा शिक्षक या प्रकरणातील आरोपी किंवा साक्षीदार नाही. पुण्यातील कोंढवा परिसरातही छापेमारी करीत एकाची चौकशी केल्याचे एटीएस अधिकाऱ्याने सांगितले. हंगरगेकर आणि दिल्ली स्फोटात कोणताही संबंध नसल्याचे आढळले, असे एका अधिकाऱ्याने स्पष्ट केले.



आयपीएस अधिकारी प्रवीण रामराव पवार यांची मुलगी प्राजक्ता हिच्या बुधवारी झालेल्या विवाहाला उपस्थित असलेले मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, शरद पवार, अदानी ग्रुपचे अध्यक्ष गौतम अदानी आणि अन्य मान्यवर

# २० हजार जिलेटिन कांड्या जप्त

### पश्चिम बंगालमध्ये दहशत माजवण्याचा कट उधळला

◆ **कोलकाता, १२ नोव्हेंबर**

पश्चिम बंगाल पोलिसांनी बुधवारी गोपनीय माहितीच्या आधारे छापे टाकत बीरभूम जिल्ह्यातून २० हजार जिलेटिनच्या कांड्या जप्त करीत दहशत माजवण्याचा कट उधळला. इतक्या मोठ्या प्रमाणात स्फोटके सापडल्याने दिल्लीमधील घटनेशी याचा संबंध आहे का, याचा तपास पोलिस करीत आहेत.

एका पोलिस अधिकाऱ्याने सांगितले की, झारखंडमधील पाकूर येथून पश्चिम बंगालमध्ये एका वाहनातून स्फोटके आणले जात असल्याची माहिती गोपनीय माहिती मिळाली होती. मंगळवारी रात्री बीरभूममधील सुलतानपूर-नलहाटी मार्गावर सापळा रचून पोलिसांनी पिकअप वाहनाला रोखले. तपासणीत त्यात जिलेटिनच्या कांड्या आढळून आल्या. याप्रकरणी चालकासह दोघांना अटक करण्यात आली. बीरभूममध्ये जप्त करण्यात आलेल्या जिलेटिनच्या कांड्या फरिदाबाद दहशतवादी मॉड्यूलचा भाग आहे का, याचा तपास केला जात आहे. दरम्यान, जिलेटिनच्या कांड्या स्वस्त स्फोटक मानल्या जातात, ज्याचा वापर खाणकाम आणि बांधकामात केला जातो. जिलेटिनपासून स्फोटकेदेखील बनवता येतात आणि डेटोनेटरने स्फोट करता येते. (वृत्तसंस्था)

## महत्त्वाचे

### कर संकलन वाढले, परतफेड घटली

**नवी दिल्ली** : २०२५-२६ या आर्थिक वर्षाच्या पहिल्या सात महिन्यांत निव्वळ प्रत्यक्ष कर संकलन १२.९२ लाख कोटी झाले. गेल्या वर्षी याच कालावधीत गोळा झालेल्या १२.०७ लाख कोटींपेक्षा हे ७ टक्के जास्त आहे. तथापि, परतफेड १७.७% ने घटून २.४२ लाख कोटी झाली. निव्वळ प्रत्यक्ष कर संकलनात वैयक्तिक उत्पन्न कर (पगारदार व्यक्तीसाठी) आणि कॉर्पोरेट कर (कंपन्यांसाठी) दोन्ही समाविष्ट आहेत, ज्यामध्ये एसटीटी देखील समाविष्ट आहे. पगारदार व्यक्ती आणि लहान व्यवसाय मालकांच्या उत्पन्नात वाढ झाल्याने प्रत्यक्ष करांमध्ये वाढ झाली आहे. गेल्या वर्षी कर दरात कपात झाली असली तरी, वैयक्तिक उत्पन्न कर संकलन मजबूत राहिले. बिगर-कॉर्पोरेट करदात्यांकडून संकलन मजबूत आहे. परतफेडीत घट होण्याची दोन कारणे असू शकतात.

### स्पाईसजेटचा तोटा ६२१ कोटींवर

**नवी दिल्ली** : लॉ कॉस्ट विमान कंपनी स्पाईसजेटचा जुलै-सप्टेंबर तिमाहीत (२२६) एकत्रित निव्वळ तोटा गेल्या वर्षीच्या याच तिमाहीत ४५८ कोटींच्या तुलनेत ३५ टक्के वाढून ६२१ कोटी झाला. ऑपरेटिंग महसूल देखील १३ टक्क्यांनी घटून ७९२ कोटी झाला, जो गेल्या वर्षीच्या याच तिमाहीत ९१५ कोटी होता. स्पाईसजेटच्या वाढत्या तोट्याच्या कारणांमध्ये ऑपरेटिंग खर्च वाढणे, पावसाळ्यात प्रवाशांची संख्या कमी असणे आणि पुरवठा साखळी समस्या यांचा समावेश आहे. तिमाही निकाल जाहीर झाल्यानंतर स्पाईसजेटचे शेअर्स वधारले होते. मात्र, सहा महिन्यात त्यात मोठी घसरण नोंदविण्यात आली आहे.

### ओपनएआयने दिल्लीत घेतले कार्यालय

**नवी दिल्ली** : आर्टिफिशियल इंटेलिजेंस (एआय) कंपनी ओपनएआयने दिल्लीमध्ये सीटर ऑफिस स्पेस भाड्याने घेतली आहे. हे कंपनीचे भारतातील पहिले ऑफिस असेल. ही जागा प्रीमियम वर्कस्पेस प्रदाता कॉर्पोरेटएज सोबतच्या भाडेपट्टा करारानुसार घेण्यात आली आहे. चॅटजीपीटीची मूळ कंपनी, ओपनएआयने या वर्षी ऑगस्टमध्ये भारतात कार्यालय उघडण्याची योजना जाहीर केली. कंपनी सध्या दिल्लीत जागा शोधत होती. याशिवाय, ओपनएआय भारतात सरकार, व्यवसाय आणि विकासकांसोबत काम करण्यासाठी एक स्थानिक टीम तयार करत आहे.

### नोएल टाटांचे पुत्र नेव्हिल टाटा ट्रस्ट बोर्डात सामील



**नवी दिल्ली** : टाटा ट्रस्ट्सने त्यांच्या प्रमुख सर दोराबजी टाटा ट्रस्ट (एसडीटीटी) च्या संचालक मंडळावर अध्यक्ष नोएल टाटा यांचे पुत्र नेव्हिल टाटा (३३) यांची नियुक्ती केली आहे. ही नियुक्ती १२ नोव्हेंबरपासून लागू झाली आणि तीन वर्षांच्या कालावधीसाठी आहे. संचालक मंडळाने नेव्हिल यांच्या नियुक्तीला एकमताने मान्यता दिली. याव्यतिरिक्त टीव्हीएस मोटर कंपनीचे अध्यक्ष मानद अध्यक्ष वेणू श्रीनिवासन यांची सर दोराबजी टाटा ट्रस्ट (एसडीटीटी) चे विश्वस्त आणि उपाध्यक्ष म्हणून पुन्हा नियुक्ती करण्यात आली आहे. टाटा समूहाचे दिग्गज भास्कर भट यांचीही बोर्डावर नियुक्ती करण्यात आली आहे. दोन्ही नियुक्त्या तीन वर्षांसाठी आहेत, ज्या १२ नोव्हेंबर २०२५ पासून लागू होतील. एसडीटीटी बोर्डात आता सात विश्वस्त आहेत.



भुतान दौऱ्यावरून आल्यानंतर पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी बुधवारी एलएनजीपी रुग्णालयात जाऊन दिल्ली बॉम्ब स्फोटातील जखमींची विचारपूस केली

## लाडकी बहीण योजनेच्या केवायसीमध्ये अडचणी

**मुंबई** : राज्यात मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेंतर्गत लाखो लाभार्थी महिलांच्या बँक खात्यात दर महिन्याला १५०० रुपयांची आर्थिक मदत पाठवली जाते, ज्यामुळे महिलांना मोठा आधार मिळतो. सध्या राज्य सरकारने सर्व लाभार्थी महिलांना ई-केवायसी करण्याचे आवाहन केले असून त्यासाठी संकेतस्थळही उपलब्ध करून दिले आहे.

मात्र, ही ई-केवायसी करताना येत असलेल्या अनेक तांत्रिक अडचणी दूर करण्यासाठी प्रशासकीय स्तरावर प्रयत्न केले जात आहेत. असे असतानाच, आता महिला व बालकल्याणमंत्री आदिती तटकरे यांनी सर्व लाभार्थी महिलांना एक महत्त्वाची माहिती देऊन मोठा दिलासा दिला आहे. मंत्री अदिती तटकरे यांनी महिती दिली की, लाडकी बहीण योजनेच्या संकेतस्थळामध्ये काही बदल होत आहेत, त्यामुळे वेळ लागत आहे. ज्या महिलेला पती आणि वडील नाही त्यांना केवायसी करता येत नाहीये. हीच अडचण लक्षात घेऊन आता संकेतस्थळात महत्त्वाचे बदल केले जात आहेत.

# पवार-सुळे एकत्र येण्याच्या चर्चेला राज्यात उधाण





◆ **पुणे, १२ नोव्हेंबर**

राज्यात २४६ नगरपालिका आणि १८ नगरपंचायतींसाठी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीची तारीख जाहीर झाल्यानंतर राजकीय घडामोडींना वेग आला आहे. या पृष्ठभूमीवर, काँग्रेसने मुंबई महापालिका स्वतंत्र लढवण्याचा निर्धार केला आहे, तर राष्ट्रवादी काँग्रेस भाजपला सत्तेपासून दूर ठेवण्यासाठी पक्षातील दोन्ही गटांमध्ये वेळ साधत असल्याचे दिसत आहे.

अजित पवारांच्या गटाला नेतृत्व देणाऱ्या शहराध्यक्ष योगेश बहल यांच्या माहितीनुसार, उपमुख्यमंत्री आणि राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते सुप्रिया सुळे यांनी अजित पवार यांच्याकडे एक प्रस्ताव ठेवला असून भाऊ-बहिणीच्या स्तरावर दोन्ही गट एकत्र येण्याबाबत संवाद झाला आहे. अजित पवार यांचा या प्रस्तावाविषयी अंतिम निर्णय घेण्यासाठी पक्षप्रमुख शरद पवार यांच्याशी चर्चा होणार असल्याचे बहल यांनी सांगितले. या पृष्ठभूमीवर, आगामी महापालिका निवडणुकीत दोन्ही राष्ट्रवादी गट एकत्र येण्याची शक्यता निर्माण झाली आहे. विधानसभा निवडणुकीनंतर अजित पवारांनी शरद पवार यांच्याविरोधात जाऊन पक्षातील काही आमदारांचा वेगळा गट तयार करून सत्तेत सहभाग घेतला होता. त्यामुळे राष्ट्रवादी काँग्रेस दोन गटांमध्ये विभागली गेली आहे. सध्या शरद पवार यांच्या नेतृत्वाखाली एक गट कार्यरत आहे तर दुसऱ्या गटाचे नेतृत्व अजित पवार करत आहेत. (वृत्तसंस्था)


# भारतीय टेक्टोनिक प्लेट फुटण्याच्या मार्गावर

### भारत-नेपाळ-चीनसाठी सतर्कतेचा इशारा

◆ **कोलोरॅडो, १२ नोव्हेंबर**

पृथ्वीच्या पृष्ठभागाचा नैसर्गिक प्रवाह सतत चालू असतो. मात्र अमेरिकेतील कोलोरॅडो विद्यापीठातील शास्त्रज्ञांनी भारतीय टेक्टोनिक प्लेटबाबत एक शोध लावला आहे. त्यांच्या अभ्यासानुसार, भारताची मुख्य टेक्टोनिक प्लेट (इंडियन प्लेट) तिबेटच्या खाली १०० किलोमीटर खोलीवर दोन स्वतंत्र भागांत विभागली जात आहे.

या विभागणीमुळे वरचा भाग हिमालयाकडे सरकत असून, खालचा भाग मंगोलियाकडे सरकत आहे. ही दरी सुमारे २००-३०० किलोमीटर लांब आहे आणि भविष्यात भूकंप, ज्वालामुखी उद्रेक व मोठ्या भूगर्भीय बदलांसाठी कारणीभूत ठरू शकते. पृथ्वीचे कवच अनेक टेक्टोनिक प्लेट्समध्ये विभागलेले आहे. ते हळूहळू सरकत असतात. भारतीय प्लेट आफ्रिका आणि ऑस्ट्रेलिया या प्लेटपासून वेगळी होऊन उत्तरेकडे सरकली आणि हिमालयाची निर्मिती झाली. सध्या, या प्लेटच्या तळाचा भाग वितळण्याच्या प्रक्रियेत असल्याचे शास्त्रज्ञांचे निरीक्षण आहे.




कोलोरॅडो विद्यापीठाच्या अभ्यासानुसार, खालचा भाग वितळत आहे. यामुळे मॅग्मा वाढतो आणि ज्वालामुखी सक्रिय होण्याची शक्यता आहे. शास्त्रज्ञांचे म्हणणे आहे की, जर प्लेट फुटण्याची ही प्रक्रिया वेगाने घडली तर ८ ते ९ रिश्टर स्केलच्या भूकंपांचा धोका उभा राहू शकतो. हिमालयीन प्रदेश, भारत, नेपाळ आणि चीनमध्ये लाखो लोकांचे जीवन धोक्यात येऊ शकते. भूकंपामुळे घरे कोसळण्याची, पूर येण्याची आणि आर्थिक नुकसान होण्याची भीती आहे.

मॅग्मा वाढल्यामुळे नवीन ज्वालामुखी उद्रेक होण्याची शक्यता आहे, तर हिमनद वितळल्याने गंगा-ब्रह्मपुत्र नद्यांमध्ये पूर येऊ शकतो. आर्थिक दृष्ट्या, संभाव्य नुकसान लाखो कोटी रुपये होऊ शकते. पर्यावरणीय दृष्टीने हिमालयातील जैवविविधतेला धोका, हवामान बदलाला गती आणि नद्या-पाणलोट यावर परिणाम होऊ शकतो. (वृत्तसंस्था)

### उपग्रह प्रतिमा, भूकंप मापन यंत्राचा वापर

भूकंपाच्या लाटा आणि प्लेटच्या हालचालींचा अभ्यास करण्यासाठी शास्त्रज्ञांनी उपग्रह प्रतिमा आणि भूकंप मापन यंत्रांचा वापर केला. त्यांनी निरीक्षण केले की तिबेटच्या खाली असलेली प्लेट हळूहळू फाटत आहे आणि दरवर्षी ५ मिमीने सरकणाऱ्या वरच्या भागामुळे खालच्या भागावर दबाव वाढतो. भारत सरकारने या संभाव्य धोक्याची जाणीव ठेवून भूगर्भीय सर्वेक्षण आणि राष्ट्रीय भूकंपशास्त्र केंद्राला निधी उपलब्ध करून दिला आहे.

# अमरावतीच्या डॉ. मंजूषा तांडेकर यांचा वर्ल्ड रेकॉर्ड ऑफ एक्सलन्समध्ये समावेश

◆ **पुणे, १२ नोव्हेंबर**

महाराष्ट्रातील अमरावती येथील डॉ. मंजूषा महेशकुमार तांडेकर (संचालक, व्हर्टेक्स हीलिंग सेंटर) यांचा आध्यात्मिक उपचार, रेकी मास्टरी आणि ध्यानधारणा या क्षेत्रात उल्लेखनीय योगदान दिल्याबद्दल इंग्लंडमधील प्रतिष्ठित वर्ल्ड रेकॉर्ड ऑफ एक्सलन्समध्ये समावेश करण्यात आला आहे. त्यांच्या समर्पणाचा आणि नेतृत्वाचा अनेकांच्या जीवनावर सकारात्मक परिणाम झाला आहे. संतुलन, निरोगीपणा आणि आंतरिक सुसंवाद वाढला आहे आणि उपचार आणि आध्यात्मिक सुसंवादाचे सार कायम ठेवण्यासाठी सतत प्रयत्न सुरू आहेत. पुणे येथील पत्रकार भवन येथे भव्य सत्कार समारंभ आयोजित करण्यात आला होता. या समारंभात, वर्ल्ड रेकॉर्ड ऑफ एक्सलन्सने व्हर्टेक्स हीलिंग सेंटरच्या संपूर्ण महाराष्ट्रातील १७१ विद्यार्थ्यांना प्रमाणपत्रे आणि मेडल देऊन सन्मानित केले.




मान्यवरांच्या हस्ते पुरस्कार स्वीकारताना डॉ. मंजूषा तांडेकर

या समारंभात इंडियन मेडिकल असोसिएशन आयपीचे अध्यक्ष डॉ. राजन संचेती, वर्ल्ड रेकॉर्ड ऑफ एक्सलन्सचे उपाध्यक्ष संजय पंजवानी, ऊर्जिता सेवक डॉ. नागेंद्र दीक्षित, डब्ल्यूआरईचे सरचिटणीस अम्बेड डॉ. नीलिमा, सामाजिक कार्यकर्ते शेखर शिंदे, ब्रेनवे फाऊंडेशनचे संचालक डॉ. अशोक एच. सोनवणे, आनंद सागर स्पिरिच्युअल हीलिंग इन्स्टिट्यूटचे संचालक डॉ. सुवर्णा सुर्वे, राज्य सरकारी कर्मचारी इंटरमीडिएट ऑर्गनायझेशनचे कोषाध्यक्ष सुधाकर बी. सुर्वे आणि मान्यवर उपस्थित होते.

डॉ. मंजुषा तांडेकर यांनी गेल्या १५ वर्षांत ऑफलाईन आणि ऑनलाईन आनंदी जीवनासाठी अनेक नि:शुल्क कार्यशाळा घेतल्या आहेत. नवी पिढी सकारात्मक घडावी यासाठी त्या शाळेत पालक बालक संवाद, ध्येय निश्चिती आणि मोबाईलचा अतिरिक्त वापर कसा टाळावा यावर नि:शुल्क त्या मार्गदर्शन करतात. (वृत्तसंस्था)

### शेअर बाजार

| | |
|---|---|
| सेन्सेक्स | ८४,४६६.५१ (+५९५.१९) |
| निफ्टी | २५,८७५.८० (+१८०.८५) |



### सराफा

| | |
|---|---|
| सोने (स्टॅण्डर्ड/१० ग्रॅम) | रु. १,२४,००० |
| चांदी (प्रतिकिलो) | रु. १,५७,८०० |

### तापमान

| | कमाल | किमान |
|---|---|---|
| सोलापूर | ३२.८ | १७.१ |
| अमरावती | ३१.६ | १२.० |
| भंडारा | २८.४ | १२.० |
| बुलडाणा | २९.२ | १३.४ |
| चंद्रपूर | ३०.६ | १३.६ |
| गडचिरोली | २९.८ | १३.० |
| गोंदिया | २८.८ | १०.५ |
| नागपूर | २९.६ | १२.६ |
| वर्धा | ३०.४ | १३.५ |
| वाशीम | २९.४ | ११.६ |
| यवतमाळ | ३०.४ | १०.६ |

# सल्फर गुहेत आहे कोळ्याचे जगातील सर्वांत मोठे जाळे

### दोन शत्रू प्रजाती राहतात एकत्र

◆ **वॉशिंग्टन, १२ नोव्हेंबर**

अल्बानिया आणि ग्रीसच्या सीमेवर असलेल्या सल्फर गुहेत शास्त्रज्ञांना जगातील सर्वात मोठे कोळ्याचे जाळे सापडले आहे. हे जाळे १०६ चौरस मीटर म्हणजेच सुमारे १०४० चौरस फूट पसरलेले आहे. याचा आकार साधारणपणे टेनिस कार्टच्या अर्धा आहे. यात दोन वेगवेगळ्या प्रजातींचे १ लाख ११ हजार हून अधिक कोळी आहेत. हे कोळी एकमेकांचे शत्रू आहेत, मात्र येथे ते एकत्र राहत असल्याचे पहिल्यांदा दिसून आले आहे.



हा शोध २०२२ मध्ये चेक स्पेलियोलॉजिकल सोसायटीच्या गुहेत काम करणाऱ्यांनी लावला आहे. ते व्रोमानोरोव्ह कॅन्यनमधील सल्फर गुहेचा शोध घेत होते. २०२४ मध्ये रोमानियातील ट्रान्सिल्व्हेनियाच्या सेपिएन्टिया हंगेरियन विद्यापीठाचे जीवशास्त्रज्ञ इस्तवान उराक आणि त्यांच्या टीमने नमुने गोळा केले. हे जाळे दोन प्रजातींचे असल्याचे डीएनए चाचणीतून दिसून आले आहे. हा अभ्यास १७ ऑक्टोबर २०२५ रोजी सबटेरेनियम बायोलॉजी नियतकालिकेमध्ये प्रकाशित झाला होता. निसर्गात अजूनही असंख्य आश्चर्यकारक घटना घडत आहेत. हे जाळे पाहिल्यानंतर मिळणारा अनुभव हा खूप वेगळा होता, असे उराक म्हणाले.

सल्फर गुहा अंधारी आणि धोकादायक आहे. ती हायड्रोजन सल्फाइड वायूने भरलेली आहे. यामुळे हवा विषारी होते. ही गुहा सल्फ्युरिक ॲसिडपासून तयार झाली आहे. गुहेच्या भिंतीवर कोळीचे जाळे पसरलेले आहे. ही एक गुंतागुंतीची रचना आहे. हे जगातील सर्वात मोठे जाळे असल्याचे मानले जाते. हे कोळी सहसा एकटे असतात. गुहेच्या पूर्ण अंधारात त्यांची नजर कमकुवत होत. परिणामी ते एकमेकांना इजा पोहचवत नाहीत. ते एकमेकांच्या सहकार्याने जाळे बांधतात. ही पहिलीच घटना आहे जिथे १ लाख ११ हजार कोळी महानगरी सारखी वसाहत करून राहत आहेत. (वृत्तसंस्था)

### वैज्ञानिक महत्त्व

या शोधामुळे कोळीचे वर्तन बदलेल. या प्रजातीचे एकत्र राहणे यापूर्वी कधीही दिसून आलेले नाही. अत्यंत प्रतिकुल वातावरणात नवीन सवयी कशा विकसित होतात हे यावरून दिसून येते. ही गुहा सीमेवर आहे, म्हणून अल्बानिया आणि ग्रीसने तिचे संरक्षण करण्यासाठी एकत्र काम केले पाहिजे. शास्त्रज्ञ पुढील अभ्यास करत आहेत. हे निसर्गाच्या रहस्यांचे एक उदाहरण आहे जिथे अंधारातही जीवन फुलू शकते.

# पुण्यासाठी इलेक्ट्रिक बस खरेदी करणार : मोहोळ

◆ **पुणे, १२ नोव्हेंबर**

केंद्र सरकारने पंतप्रधान ई-ड्राईव्ह योजनेंतर्गत पुण्यासाठी १,००० इलेक्ट्रिक बस खरेदी करण्यास मान्यता दिली आहे. त्यामुळे शहराच्या सार्वजनिक वाहतूक यंत्रणेला मोठी चालना मिळेल, असे केंद्रीय मंत्री मुरलीधर मोहोळ यांनी मंगळवारी सांगितले.

नवीन ई-बसच्या समावेशामुळे पुणे महानगर परिवहन महामंडळ लिमिटेडच्या (पीएमपीएमएल) ताफ्याला बळकटी मिळेल, गर्दी कमी होईल आणि वाहनांचे प्रदूषण कमी होण्यास मदत होईल, असे पुण्यातील भाजपाचे खासदार मोहोळ म्हणाले.

पीएम इलेक्ट्रिक ड्राईव्ह रिव्होल्यूशन इन इनोव्हेटिव्ह व्हेईकल एन्हान्समेंट (पीएम ई-ड्राईव्ह) योजनेत जनतेला परवडणारे आणि पर्यावरणपूरक सार्वजनिक वाहतूक पर्याय उपलब्ध करून देण्यावर भर देण्यात आला आहे. पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या अंतर्गत शहर, पिंपरी चिंचवड आणि लगतच्या भागात बस सेवा चालवणाऱ्या पीएमपीएमएलने सादर केलेल्या प्रस्तावाला केंद्रीय अवजड उद्योग मंत्री एच. डी. कुमारस्वामी यांनी अंतिम मान्यता दिली आहे, असे त्यांनी सांगितले. पीएमपीएमएल सध्या सुमारे २००० बसेस चालवते; त्यापैकी सुमारे ७५० बसेस त्यांच्या मालकीच्या आहेत आणि उर्वरित कंत्राटदारांमार्फत चालवल्या जातात. शहराचा विस्तार झपाट्याने होत असल्याने, प्रवाशांची मागणी पूर्ण करण्यासाठी प्रकल्पाला किमान ३,००० बसेसची आवश्यकता आहे, असे अधिकाऱ्यांनी सांगितले. (वृत्तसंस्था)



लग्नाला एक्सपायरी डेट असावी. कारण योग्य वेळी, योग्य व्यक्तीशीच तुमचे लग्न होईल, याची खात्री काय? त्यामुळे लग्नाला नूतनीकरणाचा पर्याय असणे योग्य ठरेल.
**काजोल**, अभिनेत्री

तरुण भारत
न मे कर्मफले स्पृहा
गुरुवार, १३ नोव्हेंबर २०२५




राहुल देशपांडे यांनी कट्यार नाटकाची निर्मिती केली आणि खरे म्हणजे तिथूनच चित्रपटाची कल्पना डोक्यात आली. बघता बघता सगळ्यांच्या साथीने तो पूर्ण झाला. हा चित्रपट म्हणजे भारतीय संगीताचा सोहळा, माणसाला माणसाशी जोडणारा, नव्या पिढीची आपल्या आधीच्या पिढीशी नाळ जोडणारा.
**सुबोध भावे**, अभिनेता, दिग्दर्शक

# चीन सीमेजवळ उड्डाण घेणार भारतीय लढाऊ विमाने

## न्योमा एअरबेस पूर्णपणे कार्यरत
## हवाई दलाची ताकद वाढली

◆ **नवी दिल्ली, १२ नोव्हेंबर**

भारतीय हवाई दलाने पूर्व लडाखमधील धोरणात्मकदृष्ट्या महत्त्वाचे असलेले न्योमा एअरबेस पूर्णपणे कार्यरत केला आहे. १३,७०० फूट उंचीवर असलेला, जगातील सर्वात उंच लढाऊ एअरबेस आता लढाऊ विमाने, हेलिकॉप्टर आणि वाहतूक विमाने चालविण्यास पूर्णपणे सक्षम आहे. चीन सीमेपासून फक्त ३० किलोमीटर अंतरावर असलेल्या या एअरबेसच्या कार्यान्विततेमुळे भारताच्या सीमा सुरक्षेत एक नवीन बुरुज निर्माण झाला आहे, ज्यामुळे प्रत्यक्ष नियंत्रण रेषेवर जलद प्रतिसाद आणि देखरेख शक्य झाली आहे.

हा एअरबेस पूर्वी फक्त एकच कच्चा धावपट्टी असलेला लँडिंग ग्राउंड होता. गेल्या वर्षी, बॉर्डर रोड्स ऑर्गनायझेशनने येथे एक पक्की धावपट्टी बांधली आणि यावर्षी ऑक्टोबरपर्यंत सर्व आवश्यक सहाय्यक पायाभूत सुविधा पूर्ण करण्याचे लक्ष्य होते. हवाई दल आता या तळावरून उड्डाण, लँडिंग आणि मर्यादित देखभाल करण्यास सक्षम आहे.





न्योमामध्ये आता विमाने चालवण्याची आणि टिकवून ठेवण्याची क्षमता आहे. लष्करी परिभाषेत, टिकाव म्हणजे विमान दुरुस्ती, इंधन भरणे, रडार ऑपरेशन्स, हवामान निरीक्षण आणि क्रू निवास व्यवस्था प्रदान करण्याची क्षमता.

न्योमा हवाई तळ हा लेहच्या आग्नेयेस अंदाजे १८० किलोमीटर अंतरावर, लडाखमधील सिंधू नदीच्या काठावर समुद्रसपाटीपासून १३,७०० फूट उंचीवर आहे. १९६२ च्या चीन-भारत युद्धानंतर निष्क्रिय पडलेली ही हवाई पट्टी २००९ मध्ये पुन्हा सक्रिय करण्यात आली. तेव्हापासून, सी-१३० जे सुपर हरक्यूलिस, एएन-३२ वाहतूक विमाने आणि एमआय-१७, सीएच-४७ एएफ चिनूक आणि एएच-६४ अपाचे सारखी हेलिकॉप्टर येथे यशस्वीरित्या कार्यरत आहेत, विशेषतः २०२० च्या गलवान संघर्षादरम्यान २०२० च्या तणावानंतर, सरकारने २०२१ मध्ये त्याच्या अपग्रेडसाठी २२० कोटी रुपये मंजूर केले. सीमा रस्ते संघटनेच्या (बीआरओ) प्रकल्प हिमांकने कठोर हिमालयीन परिस्थितीत हे काम पूर्ण केले.

**चौथा सक्रिय हवाई दल तळ**

हे लडाखमधील भारतीय हवाई दलाचे चौथे सक्रिय तळ बनले आहे. सध्या, लेहमध्ये एक प्रमुख हवाई तळ आधीच कार्यरत आहे, तर कारगिल आणि थोइस (सियाचीन तळ म्हणून ओळखले जाणारे) मध्ये पूर्ण क्षमतेने सुसज्ज हवाई पट्टे आहेत. याव्यतिरिक्त, दौलत बेग ओल्डी येथे मातीचा धावपट्टी आहे जिथे हवाई दलाची विमाने विशेष ऑपरेशन्ससाठी उतरतात.

न्योमा आता पूर्णतः फॉरवर्ड स्टेजिंग ग्राउंड म्हणून काम करेल. राफेल आणि सुखोई-३० एमकेआयसारखी लढाऊ विमाने येथून रोटेशनल आधारावर तैनात केली जातील. उंचीमुळे, जेट इंजिन कमी तापमानात सुरू होण्यासाठी सुधारित करण्यात आले आहेत. लडाखच्या उत्तरेकडील उप-सेक्टरमध्ये सैन्य तैनाती, देखरेख आणि पुरवठा ऑपरेशन्ससाठी हे एअरबेस क्रांतिकारी ठरेल. ◂(वृत्तसंस्था)

# पाकिस्तान बेकायदेशीर शस्त्रास्त्र तस्करीचे केंद्र

## संयुक्त राष्ट्र सुरक्षा परिषदेत भारताने सुनावले | सीमापार दहशतवाद्याला पाठबळ

◆ **न्यू यॉर्क, १२ नोव्हेंबर**



अनेक दशकांपासून भारत सीमापार दहशतवाद आणि बेकायदेशीर शस्त्रास्त्र तस्करीचा सामना करीत आहे आणि पाकिस्तान शस्त्रास्त्र तस्करीचे केंद्र बनले आहे. सीमेवरून ड्रोनद्वारे शस्त्रे पाठवली जात असून, भारत सीमापार दहशतवाद आणि बेकायदेशीर शस्त्रास्त्र तस्करीचा बळी ठरत आहे. सीमापार दहशतवाद्यांना पाठिंबा देणाऱ्या पाकिस्तानविरोधात जगाने एकत्र यावे असे खडेबोल भारताचे संयुक्त राष्ट्रांच्या सुरक्षा परिषदेतील स्थायी प्रतिनिधी पार्वतानेनी हरीश यांनी सुनावले.

**नियमांची काटेकोर अंमलबजावणी करावी**

हरीश म्हणाले की, सुरक्षा परिषदेने कोणत्याही प्रकारच्या दहशतवादाबद्दल किंवा त्याला पाठिंबा देणाऱ्यांबद्दल सहिष्णुता दाखवू नये. संघर्ष सुरू असलेल्या भागात शस्त्रांचा पुरवठा थांबवण्यासाठी शस्त्रास्त्र बंदी हा एक प्रभावी मार्ग आहे, परंतु तो निष्पक्षपणे आणि काटेकोरपणे अंमलात आणला पाहिजे. शस्त्रांची तस्करी केवळ सुरक्षेवरच नव्हे तर विकास आणि मानवतावादी पैलूंवरही परिणाम करते. ■

शस्त्रास्त्रांची बेकायदेशीर विक्रीवर बंदी आणण्यासाठी उपाययोजना करण्यासंदर्भात सुरक्षा परिषदेत चर्चा आयोजित करण्यात आली, यावेळी भारताची बाजू मांडताना पार्वतानेनी हरीश म्हणाले, सीमेवरून ड्रोनद्वारे भारतात शस्त्रे पाठवली जात असून, यामागे पाकिस्तानचा सहभाग आहे. शस्त्रांच्या हालचाली आणि वापराला प्रोत्साहन देणाऱ्यांविरुद्ध शून्यसहिष्णुता धोरण स्वीकारले पाहिजे. शस्त्रास्त्रे आणि दारूगोळ्याच्या बेकायदेशीर तस्करीमागे दहशतवादी संघटना आहे. राजधानी दिल्लीत झालेल्या स्फोटामागे सीमेपलीकडून होणारी शस्त्र तस्करी जबाबदार आहे. दहशतवादी गटांना आर्थिक रसद पुरवली जात असल्यानेच त्यांच्याकडे अत्याधुनिक शस्त्रे आहे. दहशतवाद्यांना आणि सशस्त्र गटांना शस्त्रे पुरवणाऱ्यांविरुद्ध कठोर कारवाई व्हायला हवी. ◂(वृत्तसंस्था)

# अटी मान्य झाल्यास बांगलादेशात परतणार

## शेख हसीना यांची स्पष्टोक्ती, युनूस यांच्यावर घणाघात

◆ **नवी दिल्ली, १२ नोव्हेंबर**

बांगलादेशात लोकशाहीची पुनर्स्थापना व्हायला हवी आणि अवामी लीग पक्षावरील बंदी उठवावी या अटी मान्य झाल्यास मायदेशी परतणार असल्याचे माजी पंतप्रधान शेख हसीना यांनी म्हटले आहे. त्यांनी बांगलादेशमधील अंतरिम सरकारचे सल्लागार मोहम्मद युनूस यांच्यावर टीका करताना म्हटले की, भारताशी संबंध बिघडवण्याची केलेला मुर्खपणा आत्मघातकी आहे.

वृत्तसंस्थेला दिलेल्या मुलाखतीत शेख हसीना यांनी म्हटले की, बांगलादेशात परतण्यासाठी सर्वात महत्त्वाची अट म्हणजे तेथे लोकशाहीची पुनर्स्थापना व्हायला हवी आणि अंतरिम सरकारने अवामी लीग पक्षावरील बंदी उठवावी, तसेच निवडणुका निष्पक्ष, समावेशक आणि मुक्त पद्धतीने होतील



याची खात्री करावी. माझ्या अटी मान्य झाल्यास मायदेशी परतेल आणि दाखल करण्यात आलेल्या खटल्याला सामोरे जाईल. भारत नेहमीच बांगलादेशचा सर्वात महत्त्वाचा आंतरराष्ट्री भागीदार राहिला आहे. मोहम्मद युनूस यांनी हुकूमशाही पद्धतीने निर्णय घेवून भारताशी संबंध बिघडवण्याचा मुर्खपणा केला. त्यांचा भारताप्रती द्वेष बांगलादेशचे नुकसान करणारा आहे. त्यांचे पद कट्टरपंथीयांच्या पाठिंब्यावर अवलंबून असून देशात अराजकता पसरविण्यासाठी त्यांनी कोणतीही कसर सोडलेली नाही. सध्याचे अंतरिम सरकार देशातील लोकांचे, विशेषतः बांगलादेशच्या महिलांचे प्रतिनिधित्व करत नाही. अवामी लीग फेब्रुवारीमध्ये होणाऱ्या निवडणुकांवर बहिष्कार टाकणार असल्याचे वृत्त निराधार आहे. अवामी लीगशिवाय कोणतीही निवडणूक वैध ठरणार नाही, असे त्या म्हणाल्या. विद्यार्थ्यांचे हिंसक आंदोलन हाताळण्यात चूक झाल्याचे त्यांनी मान्य केले. ◂(वृत्तसंस्था)

# भारत-भूतान यांच्यात जलविद्युत प्रकल्प करार

## पंतप्रधान मोदी, भूतान नरेशांची बैठक | ऊर्जा, व्यापार, तंत्रज्ञान सहकार्यावर सहमती



◆ **थिम्फू, १२ नोव्हेंबर**

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या भूतान दौऱ्याच्या अखेरच्या दिवशी दोन्ही देशात १२०० मेगावॅट क्षमतेच्या पुनत्संगचु-१ जलविद्युत प्रकल्पाच्या करारवर स्वाक्षरी झाली. मोदी यांनी भूतानचे चौथे राजा ड्रुक ग्याल्पो जिग्मे सिंग्ये वांगचुक यांच्याशी द्विपक्षीय बैठक घेतली त्यात ऊर्जा, व्यापार, तंत्रज्ञान आणि दळवळण क्षेत्रातील सहकार्यावर सहमती दर्शवली.

भारताच्या विदेश मंत्रालयाने जारी केलेल्या निवेदनात म्हटले की, पंतप्रधानांनी थिम्फूमध्ये भूतानच्या राजांसोबत कालचक्र अभिषेक समारंभाचे उद्घाटन केले. त्यानंतर द्विपक्षीय बैठक झाली. यावेळी मोदींनी भूतानच्या विकासाला चालना देण्यासाठी सर्वोतोपरी मदत करण्याचे आश्वासन दिले. भारत-भूतान संबंध अधिक मजबूत करण्यासाठी गेल्या काही वर्षांत केलेल्या व्यापक प्रयत्नांचे वांगचुक यांनी कौतुक केले. ऊर्जा, व्यापार, तंत्रज्ञान आणि दळणवळण क्षेत्रात सहकार्यावर सहमती झाली. पंतप्रधानांनी १०२० मेगावॅट पुनत्संगचु-२ जलविद्युत प्रकल्पाचे उद्घाटन देखील केले. हा प्रकल्प जलविद्युत क्षेत्रात भूतान आणि भारत यांच्यातील मैत्री आणि सहकार्यावर आधारित आहे. भारत आणि भूतान यांनी १२०० मेगावॅट क्षमतेच्या पुनत्संगचु-१ जलविद्युत प्रकल्पावर पुन्हा काम सुरू करण्यास सहमती दर्शविली आहे. पुनत्संगचु-१ हा दोन्ही सरकारांनी संयुक्तपणे विकसित केलेला सर्वात मोठा जलविद्युत प्रकल्प असेल. ◂(वृत्तसंस्था)

# तुर्कीचे लष्करी विमान कोसळून २० सैनिक ठार

◆ **इस्तांबूल, १२ नोव्हेंबर**

अझरबैजान सीमेजवळ जॉर्जिया भागात तुर्कीचे एक लष्करी मालवाहू विमान कोसळले, त्यात क्रू मेंबर्ससह २० लष्करी कर्मचाऱ्यांचा मृत्यू झाला. तुर्की आणि जॉर्जियन अधिकाऱ्यांनी मृत्यूची पुष्टी केली आहे.

तुर्कीच्या संरक्षण मंत्रालयाने समाज माध्यमावर केलेल्या पोस्टमध्ये म्हटले की, अझरबैजानहून तुर्कीला परतत असताना लष्कराच्या मालवाहू विमानात तांत्रिक बिघाड झाली आणि ते कोसळले. सी-१३० हरक्यूलिस विमान हे अमेरिकन कंपनी लॉकहीड मार्टिनने विकसित केलेले चार इंजिनांनी सुसज्ज असलेले टर्बोप्रॉप लष्करी वाहतूक विमान आहे. ते लहान धावपट्ट्यांवरून सहजपणे उड्डाण आणि उतरण्यासाठी डिझाइन केलेले आहे. त्याचे प्राथमिक कार्य सैन्य आणि उपकरणे वाहतूक करणे आहे. राष्ट्राध्यक्ष रेसेप तय्यिप एर्दोगान यांनी अपघाताबद्दल तीव्र शोक व्यक्त केला आणि मृतांना श्रद्धांजली वाहिली. अझरबैजान आणि जॉर्जियन अधिकाऱ्यांनी संयुक्त शोध आणि बचाव मोहीम सुरू केली आहे. ◂(वृत्तसंस्था)

# फार्मा कंपनीत स्फोट; ३ जणांचा मृत्यू, २४ जखमी

## गुजरातच्या भरूचमध्ये बॉयलर फुटल्याने घटना

◆ **भरूच, १२ नोव्हेंबर**

गुजरातमधील भरूच जिल्ह्यातील एमआयडीसी औद्योगिक क्षेत्रातील एका फार्मा कंपनीत मंगळवारी रात्री उशिरा झालेल्या स्फोटात तीन जणांचा मृत्यू झाला, तर २४ कर्मचारी जखमी झाले. जखमींना भरूचमधील विविध रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. यापैकी पाच कर्मचाऱ्यांची प्रकृती गंभीर आहे.

एका पोलिस अधिकाऱ्याने सांगितले की,सायखा गावाजवळील विशाल फार्मा या कंपनीत बॉयलरचा स्फोट झाला



आणि त्यानंतर आग भडकली. स्फोट इतका जोरदार होता की त्यामुळे जवळच्या चार कंपन्यांचे नुकसान झाले. या घटनेत तीन कर्मचाऱ्यांचा जागीच मृत्यू झाला, तर २४ जण जखमी आहे. घटनास्थळी बुधवारीदेखील बचाव आणि मदत कार्य सुरू आहे, ढिगारा हटवण्याचे काम सुरू असून मृतकांची संख्या वाढू शकते. या प्रकरणी कंपनीच्या संचालकांविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला. ◂(वृत्तसंस्था)

## चित्रपट वार्ता

### शहनाजचे शुभमनसोबत दूरच्या भावाचे नाते





**मुंबई** : छोट्या पडद्यावर गाजलेली अभिनेत्री शहनाज गिल तिच्या निरागसतेमुळे अनेकांची आवडती आहे. ती तिच्या आडनावामुळे आता चर्चेत आली आहे. शहनाज गिल आणि क्रिकेटपटू शुभमन गिल यांचे आपसात काहीतरी नाते असल्याची चर्चा जोर धरू लागली आहे. यावर एका पॉडकास्टमध्ये शहनाज म्हणाली की, मला ही चर्चा खूपच आवडली. तो अतिशय प्रेमळ आहे. खूप चांगला क्रिकेटपटू आहे. मुळात, शुभमन मूळचा माझ्या शहराजवळचाच आहे. कदाचित तो माझा दूरचा भाऊ किंवाचुलत भाऊ असेल. तो आमच्या अमृतसरमधलाच आहे. जेव्हा जेव्हा समाज माध्यमांवर तो ट्रेंड होतो तेव्हा मी सुद्धा चर्चेत असते. आमच्यात कदाचित भाई-बहिणीचे नाते असावे. ■

### रुग्णालयात दाखल प्रेम चोप्रांना धर्मेंद्र यांची काळजी



**मुंबई** : प्रेम चोप्रा यांना शनिवारी मुंबईतील लीलावती रुग्णालयात दाखल करण्यात आले. कुटुंबीयांनी सांगितले की काळजी करण्याची गरज नाही आणि ही फक्त एक नियमित तपासणी होती. त्यांना एक-दोन दिवसांत डिस्चार्ज दिला जाईल. तथापि, प्रेम चोप्रा धर्मेंद्र यांच्या प्रकृतीबद्दल चिंतेत आहेत आणि ते सतत त्यांच्या मित्राची चौकशी करत आहेत. प्रेम चोप्रा यांचे जावई आणि अभिनेता विकास भल्ला यांनी मुंबई मिररशी बोलताना सांगितले की, वयाशी संबंधित गुंतागुंत आणि संसर्गामुळे त्यांना (प्रेम चोप्रा) नियमित तपासणीसाठी रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. डॉक्टरांनी सर्व चाचण्या केल्या आणि सुदैवाने सर्व काही ठीक असल्याचे आढळून आले. आज सकाळी मी त्यांना भेटायला गेलो तेव्हा ते पूर्णपणे ठीक आणि आनंदी होते. ■

### प्राजक्ताच्या सौंदर्याचे रहस्य एका ज्यूसमध्ये!



**मुंबई** : अभिनेत्री प्राजक्ता माळी हिने हास्यजत्रा सोबतच अनेक चित्रपटांमधूनदेखील आपल्या अभिनयाची आणि सौंदर्याची छाप मराठी रसिकांच्या मनावर सोडली आहे. फुलवंती या तिच्या चित्रपटात तर तिचे सौंदर्य आणखीनच खुलून दिसले. तिला नुकतेच एका मुलाखतीत या सौंदर्याचे रहस्य विचारले असता प्राजक्ता म्हणाली, मी रोज सकाळी उपाशीपोटी एक विशेष ज्यूस पिते. त्यात दोन आवळे, एक काकडी, सात ते आठ पुदिन्याची पाने, अर्धे लिंब याचा वापर करून मी स्वत:च हा सुपरहेल्दी ज्यूस तयार केला आहे. हा ज्यूषस शरीराला डिटॉक्स करतो आणि दिवसभर ऊर्जा टिकवून ठेवण्यासाठी मदत करतो. अर्थात, प्राजक्ता आपल्या सौंदर्य आणि आरोग्याचे श्रेय या ज्यूसला देत असली तरी प्रत्यक्षात ती व्यायाम आणि आहार याबाबतीत अतिशय काटेकोर आहे. दररोज तासभर सूर्यनमस्कार आणि अन्य व्यायाम ती न चुकता करते. ■

# लहान मुलांच्या रेल्वे तिकीट बुकिंगचे नियम बदलले

## वेगळे आसन हवे असल्यास भरावे लागणार पूर्ण भाडे

◆ **नवी दिल्ली, १२ नोव्हेंबर**

भारतीय रेल्वेने प्रवाशांच्या सोयी लक्षात घेऊन मुलांच्या तिकीट बुकिंगच्या नियमांमध्ये महत्त्वपूर्ण बदल केले आहेत. आता पाच वर्षांखालील मुले तिकिटशिवाय प्रवास करू शकतात, परंतु एक विशेष अट आहे. जर तुम्हाला तुमच्या मुलासाठी वेगळी सीट किंवा बर्थ हवी असेल तर तुम्हाला पूर्ण भाडे द्यावे लागेल.

पूर्वी, मुलांचे तिकीट कसे बुक करायचे, अर्धे भाडे कधी आवश्यक आहे आणि 'नो सीट/नो बर्थ'पर्याय काय आहे याबद्दल अनेक लोक गोंधळलेले होते. बुकिंग करताना प्रवाशांना कोणत्याही अडचणी येऊ नयेत म्हणून आयआरसीटीसीने आता हे सर्व नियम स्पष्ट केले आहेत. नवीन नियमांमुळे, प्रवाशांना मुलाचे वय, सीट पर्याय आणि भाडे वर्ग यावर अधिक लक्ष द्यावे लागेल, अन्यथा त्यांना तिकीट रद्द किंवा दंड होऊ शकतो.

**रेल्वे बाल तिकीट नियम**



भारतीय रेल्वेने बालक तिकीट बुकिंगसाठी विशिष्ट वय-आधारित नियम स्थापित केले आहेत जेणेकरून प्रवाशांना बुकिंग करताना कोणतीही अडचण येऊ नये. जर तुमचे मूल पाच वर्षांपेक्षा कमी वयाचे असेल, तर त्यांना ट्रेनमध्ये तिकिटाशिवाय प्रवास करण्याची परवानगी आहे, परंतु जर तुम्ही त्यांच्यासाठी वेगळी सीट किंवा बर्थची विनंती केली नसेल तरच. याचा अर्थ असा की जर त्यांना तुमच्या मांडीवर घेऊन जाण्यात आले तर तिकिटाची आवश्यकता नाही. जर तुम्हाला तुमच्या मुलासाठी वेगळी सीट किंवा बर्थ द्यायची असेल, तर तुम्हाला पूर्ण प्रौढ भाडे द्यावे लागेल.

तथापि, ५ ते १२ वर्षे वयोगटातील मुलांसाठी नियम थोडे वेगळे आहेत. जर या वयापेक्षा कमी वयाच्या मुलाला बर्थची आवश्यकता नसेल (म्हणजे, तुम्ही 'नो सीट/नो बर्थ' पर्याय निवडला असेल), तर त्यांना अर्ध्या तिकिटावर प्रवास करण्याची परवानगी आहे. तथापि, जर त्याच मुलाला स्वतंत्र बर्थची आवश्यकता असेल, तर पूर्ण प्रौढ भाडे आकारले जाईल.

१२ वर्षांपेक्षा जास्त वयाच्या मुलांना रेल्वे पूर्ण प्रौढ मानते आणि त्यांच्यासाठी तिकिटाचे दर नियमित प्रौढ प्रवाशांसारखेच असतात. बुकिंग करताना मुलांसाठी योग्य वय आणि सीट पर्याय निवडणे अत्यंत महत्त्वाचे आहे, कारण यामुळे तिकीट रद्द होऊ शकते किंवा दंड होऊ शकतो. ◂(वृत्तसंस्था)

**पालकांसाठी सूचना**

जर तुम्ही मुलांसोबत ट्रेनने प्रवास करण्याचा विचार करत असाल, तर प्रवास सुरळीत आणि त्रासमुक्त करण्यासाठी काही महत्त्वाचे मुद्दे लक्षात ठेवणे महत्त्वाचे आहे. प्रथम, तिकीट बुक करताना मुलाचे योग्य वय प्रविष्ट करा. आयआरसीटीसी वेबसाइट किंवा ॲपवर बुकिंग करताना चुकीचे वय प्रविष्ट केल्यास तिकीट अवैध ठरू शकते. प्रवास करताना मुलांसाठी नेहमीच वयाचे प्रमाणपत्र किंवा आधार कार्ड सोबत ठेवा, कारण ट्रेनचे तिकीट निरीक्षक मुलाच्या वयाचा पुरावा मागू शकतात. ■

# हिंदू धर्म रक्षणासाठी सनातन धर्म परीक्षण मंडळ स्थापन करावे : पवन कल्याण

◆ **हैदराबाद, १२ नोव्हेंबर**

आंध्रप्रदेशातील तिरुपती बालाजी मंदिरात लाडू (प्रसाद) मध्ये बनावट तूप वापरल्याच्या कथित वादाच्या पृष्ठभूमीवर, उपमुख्यमंत्री पवन कल्याण यांनी हिंदू धर्म आणि सनातन धर्माचे रक्षण करण्यासाठी सनातन धर्म चाचणी मंडळ स्थापन करण्याची मागणी केली आहे.

एक्स या सोशल मीडिया प्लॅटफॉर्मवर शेअर केलेल्या पोस्टमध्ये पवन कल्याण म्हणाले की, सनातन्यांच्या भावना आणि पद्धतींची खिल्ली उडवली जात आहे आणि त्यांना कमी लेखले जात आहे, ज्यामुळे भक्तांचा विश्वास कमी होत आहे. उपमुख्यमंत्र्यांनी लिहिले की, जागतिक हिंदू समुदायासाठी, तिरुपती तिरुपती देवस्थानम हे तीर्थक्षेत्रापेक्षा जास्त आहे; ते एक पवित्र आध्यात्मिक ठिकाण आहे. तिरुपती लाडू हे केवळ गोड पदार्थ नाही; ते एक सामायिक भावना आहे. आम्ही ते मित्र, कुटुंब आणि अनोळखी लोकांमध्येही सामायिक करतो, कारण ते आपल्या श्रद्धेचे प्रतीक आहे.

**२५ दशलक्ष भाविक तिरुमलाला भेट देतात**

त्यांनी पुढे लिहिले, सरासरी, दरवर्षी अंदाजे २५ दशलक्ष भाविक तिरुमलाला भेट देतात आणि जेव्हा सनातनींच्या भावना आणि पद्धतींची थट्टा केली जाते किंवा त्यांना कमी लेखले जाते. ते केवळ दुखावणारेच नाही तर जगभरातील लाखो लोकांच्या श्रद्धा आणि भक्तीलाही धक्का पोहोचवते. धर्मनिरपेक्षता हा दुतर्फा मार्ग असला पाहिजे.

**सर्व भागधारकांच्या संमतीने स्थापन केलेले मंडळ**

सनातन धर्मासाठी एक संवर्धन संस्था स्थापन करण्याचे आवाहन करताना त्यांनी सांगितले की सर्व भागधारकांच्या संमतीने हे मंडळ स्थापन केले पाहिजे. आपला सनातन धर्म हा सर्वात प्राचीन आणि सतत विकसित होत असलेल्या संस्कृतींपैकी एक आहे आणि आता सर्व भागधारकांच्या संमतीने सनातन धर्म चाचणी मंडळ स्थापन करण्याची वेळ आली आहे. ◂(वृत्तसंस्था)

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले. विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



## अग्रलेख...

# धोका दारात आणि घरातही!

देशाच्या आत्म्याचे, सार्वभौमत्वाचे प्रतीक असलेल्या दिल्लीतील अगदी वर्दळीच्या ठिकाणी सोमवारी सायंकाळी उभ्या कारमध्ये स्फोट झाला, नव्हे तो घडवून आणला गेला. गेल्या काही दिवसांच्या वर्तमानपत्रांची मुखपृष्ठं बघितली तर देशात ठिकठिकाणी लहान मोठ्या आतंकी घटना घडताना दिसत आहेत. दिल्लीतल्या कार स्फोटाच्या बातमीने तर संपूर्ण देशाला हादरवून सोडले. या घटनेत 'व्हाईट कॉलर्ड' प्रोफेशनल्स म्हणून गणल्या जाणाऱ्या डॉक्टरांचा सहभाग असल्याचे निदर्शनास येणे आणि स्फोटाची घटना थेट दहशतवादी संघटनेशी जोडली जाणे, ही गोष्ट राष्ट्रीय सुरक्षेच्या दृष्टीने अत्यंत गंभीर अशी धोक्याची घंटा आहे. राष्ट्रीय तपास यंत्रणा या प्रकरणाची सखोल चौकशी करेल यात शंका नाही. पण भारतासारख्या खंडप्राय देशात ठिकठिकाणी अशा दहशतवादाचा वाढता धोका पाहता, केवळ आणि केवळ सरकारी यंत्रणांच्या भरवशावर राहणे पुरेसे नाही. प्रत्येक नागरिकाची सावधगिरी, सतर्कता आणि जबाबदारी यातूनच दहशतवादाविरोधी लढ्याचा प्रभाव वाढविता येईल.

एक काळ होता, जेव्हा बहुतांशी दहशतवादी हल्ले सीमेपलीकडील शक्तीकडून प्रायोजित केले जायचे आणि त्यांचे स्वरूपही उघडपणे लष्करी किंवा निमलष्करी असायचे. ते तसे आता राहिलेले नाही, असेही नाही. तसे प्रकार थांबलेले नाहीत. मात्र, आता दहशतवादाने आणखी एक नवे रूप धारण केले आहे. आताचे दहशतवादी हल्ले 'हायब्रीड' आणि 'लोन वुल्फ' स्वरूपाचे जास्त दिसतात. दिल्लीच्या कार स्फोटातून हे स्पष्ट होते की, उच्चशिक्षित आणि समाजाच्या मुख्य प्रवाहात सामील असलेले लोकही कट्टरपंथी इस्लामींच्या देशविघातक विचारधारेचे बळी ठरत आहेत. आधीच्या हल्ल्यांमध्ये दहशतवादी संघटनांची थेट ओळख असायची. दहशतवादी संघटना जाहीर जबाबदारीच घ्यायच्या. दिल्लीच्या घटनेत असे दिसले की, अशा कारवायांसाठी 'व्हाईट कॉलर्ड' व्यक्तींचा वापर होतोय. याचा अर्थ असा की, दहशतवादी संघटनांनी आपली विषाक्त मुळे खोलवर रुजवली आहे. 'स्लिपर सेल' हा त्यातलाच एक प्रकार. दहशतवादी संघटनांचा हा गुप्त सदस्यांचा गट असतो, जो कोणत्याही देशात सामान्य नागरिकांप्रमाणे शांतपणे राहण्याचे ढोंग करतो. साधारणतः त्यांच्या 'आकां'कडून आलेला गुप्त आदेश मिळेपर्यंत तो अजिबात सक्रिय नसतो. आपली ओळख गुप्त ठेवणे हे त्याचे वैशिष्ट्य असते. या सेलचे सदस्य कुणीही असू शकतात. दिल्लीच्या घटनेत डॉक्टर्स सापडले. त्यांच्यात डॉक्टर, इंजिनीअर, शिक्षक, सॉफ्टवेअर प्रोफेशनल्स किंवा अगदी रोजंदारी करणारा सामान्य कामगारही असू शकतो. अशा लोकांना वरकरणी ओळखणे फार कठीण आहे, कारण आपले सामाजिक जीवन प्रामुख्याने परस्पर विश्वासावर चालते. स्लिपर सेलशी संबंधित लोकांचे जीवनही सामान्यांसारखेच असते. पण, संधी मिळाली तर ते किती भयंकर घडवू शकतात, हे दिल्लीत दिसले आणि त्या व आधीच्या घटनांच्या चौकशीदरम्यान स्फोटके तयार व गोळा करण्याच्या कामातील उच्चशिक्षितांच्या सहभागातही दिसले. असे लोक एरवी कोणत्याही संशयास्पद कृतीपासून दूर राहतात. बहुतांश वेळा त्यांना ऑनलाईन माध्यमातून किंवा स्थानिक गुप्त समन्वयकांच्या मार्फतच प्रशिक्षण दिले जाते. आयडी बॉम्ब बनवण्याचे साहित्य, गुप्त संवाद साधण्याचे मार्ग आणि कारवायांची योजना त्यांना गोपनीय पद्धतीनेच पोहोचविली जाते. योग्य वेळ, ठिकाण आणि संघटनेकडून 'हिरवी झेंडी' मिळाल्याबरोब्बर हा 'स्लिपर सेल' सक्रिय होतो. गुप्त माहिती गोळा करणे, घातपात करणे, बॉम्बस्फोट घडवणे किंवा दहशतवादी हल्ल्यासाठी 'लॉजिस्टिक' पुरवठा करणे आदी त्यांचे काम असते. हे लोक समाजाच्या मुख्य प्रवाहात असल्याने त्यांचा शोध घेणे तपास यंत्रणांसाठी वाटते तेवढे सोपे नाही. अटक होईपर्यंत त्यांचा साधा संशयही येत नाही. मात्र, तोपर्यंत मोठा घातपात घडलेला असतो आणि म्हणून सर्वसामान्य जनतेची सावधगिरी यापुढच्या काळात अत्यंत महत्त्वाची ठरणार आहे. आपल्या आसपासच्या, भोवतालच्या लोकांकडून देशविरोधी, समाजविघातक कारवाया होत असल्याचा साधा संशय जरी आला तरी ते तातडीने सुरक्षा यंत्रणांचा लक्षात आणून देणे ही एक प्रकारे देशभक्तीच आहे, असे समजून आपण काम केले पाहिजे.

केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनी जाहीर केलेल्या आकडेवारीनुसार, २००४ ते २०१४ या काळात देशात ७,२१७ दहशतवादी हल्ले झाले, तर २०१४ ते २०२४ दरम्यान हा आकडा २,२४२ पर्यंत खाली आला, जो सरकारी सुरक्षा यंत्रणांच्या प्रयत्नांचे यश दर्शविणारा आहे. तरीही, २०२४ मध्ये ८५ हून अधिक दहशतवादी हल्ले झालेत आणि त्यांत २६ नागरिकांना आणि ३१ जवानांना आपले प्राण गमवावे लागले. हे आकडे असे सांगतात की, धोका कमी झाला असला तरी तो पूर्णपणे संपलेला नाही. उलट अशा हल्ल्यांचे स्वरूप अधिक कपटी आणि पाताळयंत्री झालेले आहे. दहशतवाद्यांचे लक्ष्य आता केवळ लष्करी तळ किवा महत्त्वाची सरकारी ठिकाणे नाहीत. ती तर त्यांच्या हिटलिस्टवर आहेतच. परंतु, आता लोकांची वर्दळ असलेली सार्वजनिक ठिकाणे हे त्यांचे लक्ष्य आहे. सामान्यांना लक्ष्य करणे व त्यातून व्यापक दहशत निर्माण करणे ही या दहशतवादी संघटनांची नवी रणनीती आहे. भारताचे लष्कर, सुरक्षा यंत्रणा जेवढ्या अधिक सक्षम होतील, तेवढी या दहशतवादी संघटनांची ही धूर्त रणनीती वाढत जाईल. या भ्याड संघटना भारतीय जवानांसमोर टिकूच शकत नाहीत, याची पुरेपूर कल्पना त्यांनाही आहे.

२००६ मध्ये झालेले मुंबई बॉम्बस्फोट आठवा. लोकल ट्रेनमध्ये अवघ्या ११ मिनिटांत झालेल्या स्फोटांच्या मालिकेत २०९ निरपराध माणसं ठार झाली होती किंवा २००८ च्या २६/११ ला झालेला मुंबई हल्ला आठवा. त्यात हॉटेल, रेल्वेस्थानक आणि रुग्णालयांसारख्या ठिकाणांना लक्ष्य केले गेले आणि १७१ लोक मारले गेले. त्याच वर्षी जयपूर आणि २०१० मध्ये पुण्याच्या बाजारपेठेत झालेले स्फोटही त्याच धर्तीचे. हे सारे हल्ले हेच स्पष्ट करतात की, धोका केवळ सीमेपुरता मर्यादित राहिलेला नाही, तर तो आता आपल्या घराच्या दारावर उभा आहे. नव्या तंत्रज्ञानामुळे तो अगदी घरातही शिरू लागला आहे. पाणीपुरवठ्यातून, तुमच्या घरी होणाऱ्या इंधन पुरवठ्यातून किंवा खाद्य पुरवठ्यातूनही तो तुमच्या-आमच्या घरात येऊ शकतो. आपल्या उत्सवांतून, यात्रेतून, मॉल्समधून किंवा मग शाळेतूनही तो आपल्या आयुष्याची राखरांगोळी करू शकतो. सरकार आणि सुरक्षा यंत्रणा चौकस आहेतच. पण, एवढ्या विशालकाय देशात सामान्यांची जागरूकता तेवढीच महत्त्वाची आहे.

प्रत्येक नागरिकाने आपल्या आजूबाजूला घडणाऱ्या गोष्टींबाबत जागरूक राहणे काळाची गरज आहे. अपरिचित व संशयास्पद वस्तूंबाबत सुरक्षा यंत्रणांना तात्काळ सूचना देणे, आपल्या भागात किंवा सोसायटीमध्ये अचानक आलेल्या अनोळखी व्यक्ती, त्यांची असामान्य हालचाल किंवा संशयास्पद वर्तन आढळल्यास त्याची नोंद घेणे आणि पोलिसांना तातडीने कळविणे हेही देशाच्या सीमेवर सतर्क राहणाऱ्या सैनिकासारखीच देशाची सेवा आहे, हे आम्ही जाणले पाहिजे. ज्याप्रमाणे कोविड महामारीत प्रत्येक नागरिकाने मास्क घालून आणि नियम पाळून आपले योगदान दिले, त्याचप्रमाणे दहशतवादाविरुद्धच्या या लढ्यातही अत्यंत सावध राहणे मोलाचे आहे. दिल्लीतील दहशतवादी घटना वा मुंबईवरचा हल्ला असो, प्रत्येकच घटनेने हे सिद्ध केले आहे की, दहशतवादाचा धोका ही छुपी आग आहे. ती केव्हाही होत्याचे नव्हते करू शकते. अशा घटनांना सामान्य मानून त्याकडे दुर्लक्ष करणे धोकादायक ठरू शकते. सामान्य नागरिकांनी दाखवलेली जागरूकता अनेक हल्ले घडण्यापूर्वीच थांबवू शकते. आपली सतर्कता हेच आपल्या कुटुंबाचे, देशाचे सर्वांत मोठे सुरक्षा कवच आहे. देशविरोधी, विघातक शक्तींना सळो की पळो करून सोडा, आम्ही सरकार सोबत आहोत, असे सांगणेही गरजेचे आहे. हा संदेश प्रत्येक लोकशाहीवादी देशासाठी महत्त्वाचा आहे. 'जन सहभाग' आणि 'जन सहयोग' हाच दहशतवादाचा अंत करण्यासाठीचा प्रभावी 'मंत्र' आहे, हे समजून घेतले पाहिजे. रात्रच नव्हे तर सध्याचा अख्खा काळच वैऱ्याचा आहे, याची खूणगाठ बांधली पाहिजे.

## प्रासंगिक

# भारताची संवाद भाषा काय असावी?

**श्रीश देवपुजारी**

काहींचे उत्तर येईल हिंदी. पण तामिळनाडूमध्ये हिंदी? शक्यच नाही. मग उत्तर येईल इंग्रजी. तेही खरे नाही. कारण सगळ्या भारतीयांना इंग्रजी बोलता येत नाही. किमान नोव्हेंबर महिन्याच्या ७, ८, ९ दिनांकांना कोईम्बतूरला एकत्र आलेल्या सर्व राज्यातील नागरिकांना तर नाहीच नाही. कारण त्यात अधिक शिकलेले, कमी शिकलेले, ग्रामीण, नगरीय, स्त्री, पुरुष, युवक, वृद्ध असे सगळेच होते. मग ते कुठल्या भाषेत संवाद साधत असतील?

वास्तविक ते सगळे संस्कृत भाषेत संवाद करीत होते. खरंच? हो अगदी खरं! शप्पथ! हे अघटित कसे घडले? हे घडले संस्कृतभारती नावाच्या संघटनेच्या कारणाने. झाले असे की कोईम्बतूरला संस्कृतभारतीचे अखिल भारतीय त्रैवार्षिक अधिवेशन होते. पहिल्यांदाच तामिळनाडूमध्ये होणाऱ्या ह्या संमेलनाला सर्व म्हणजे ४३ प्रांतांतून २४७२ प्रतिनिधी उपस्थित होते. एवढेच नाही तर इंडोनेशिया व दुबईहून देखील काही कार्यकर्ते आले होते. संपूर्ण संमेलनाची भाषा संस्कृत होती. केवळ विविध सत्रांचीच नाही तर रात्री होणाऱ्या मंचीय कार्यक्रमांची सुद्धा. परस्परांचा संवाद संस्कृत भाषेत असल्याने विचारांची, मैत्रीची, खेळण्याची, गाण्याची भाषा पण संस्कृतच. परिसरही या दिव्य भाषेला पोषक असाच होता. माता अमृतानन्दमयी यांच्या विचारांचे पोषण करणाऱ्या विश्वविद्यालयाच्या भव्य, सुंदर, स्वच्छ व प्रदूषणरहित परिसरात हे संमेलन संपन्न झाले. इतक्या दूर असूनही मणिपूर सोडून सर्व प्रांतांचे प्रतिनिधित्व होते.

या अधिवेशनाचा भर होता भारतीय ज्ञान परंपरा या विषयावर. भारत सरकारच्या शिक्षण मंत्रालयात भारतीय ज्ञान परंपरा हा विभाग सांभाळणारे प्रो. गंटी सूर्यनारायण मूर्ती यांचे संस्कृत भाषेत पीपीटीच्या साहाय्याने अत्यंत सोप्या शब्दांत प्रतिपादन झाले. ते आधुनिक विषयांचे ज्ञाता. शिवाय आय. आय. टी.सारख्या प्रतिष्ठित संस्थेत प्रोफेसर. त्यांच्या सोबत पारंपरिक चतुष्शास्त्र पंडित श्रीमान देवदत्त पाटील यांचे पण प्रबोधन झाले. हा दुग्धशर्करा योग होता. डॉ. देवदत्त पाटील गोव्यात स्वतःचे गुरुकुल चालवतात. येणाऱ्या पिढीला




संस्कृत शिकविण्याचा चंग बांधलेल्या प्रो. बी. एस. मूर्ती यांचा विशेष सत्कार करण्यात आला. कारण त्यांनी आय. आय. टी. हैदराबाद येथे संस्कृत क्रेडिट कोर्स प्रारंभ केला.

भारतीय ज्ञान परंपरा या विषयावर सैद्धांतिक प्रतिपादनानंतर पुढच्या सत्रात शास्त्रे प्रत्यक्ष जगणाऱ्यांच्या कार्याचा गौरव करणारे सत्र झाले. त्यात चतुष्शास्त्र पंडित प्रो. मणिद्रविड शास्त्री (चेन्नै), वैद्य सेतुमाधवन् (ओट्टपालम्, केरळ), लोखंडापासून दर्पणाची काच निर्माण करणारे सेल्वराज, भारतीय पाकशास्त्राधारित भोजन निर्माण करणारे बालाजी पट्टप्पा, लोकनाथ (कांचीपुरम्, वस्त्र निर्माता) शांतीश्री (अभिनेत्री, नर्तकी), केलैवेन्दर वीरमंगलम् (अभिनेता), वीळ्ळीनाथाचार्य (स्थपति, मन्दिरनिर्माण), राजीवन् पणिकर (मरुत्कल्ली) इत्यादी जनांचा सन्मान केल्या गेला. सर्व तामिळनाडू व केरळमध्ये राहणारे आहेत.

एक विस्तृत प्रदर्शन अधिवेशन स्थळी आयोजित केले होते. तीन तळांवर स्थापित प्रदर्शन भारतीय ज्ञान परंपरा, तामिळ व संस्कृत भाषेचे साम्य, संस्कृतभारतीच्या विभिन्न गतिविधी यावर आधारित होते. अधिवेशनाचे उद्घाटन राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे सरकार्यवाह दत्तात्रेय होसबळे यांनी केले. एका सत्रात सुरेश सोनी यांनी संस्कृत कुटुंबाची कल्पना अधिक विशद केली. अधिवेशनात उपस्थित असलेल्या संस्कृत कुटुंबांचे अनुभव कथन अत्यंत रोचक होते. संस्कृत कुटुंब म्हणजे ज्या घरी माता-पिता संस्कृत भाषेत संवाद करतात व त्यामुळे अपत्यांची मातृभाषा संस्कृत आहे. अशी कुटुंबे स्वाभाविक आकर्षणाचे केंद्र होती. दर तीन वर्षांनी होणाऱ्या या संमेलनात संस्कृतभारतीच्या अखिल भारतीय अध्यक्षांची निवडणूक होते. त्याप्रमाणे अधिवेशनाच्या पहिल्या दिवशी ती झाली. प्रो. रमेश कुमार पाण्डेय (मनेसर, हरयाणा) हे बिनविरोध पुढील तीन वर्षांसाठी अध्यक्ष निर्वाचित झाले. पूर्व अध्यक्ष प्रो. गोपबन्धु मिश्र (काशी) यांनी सन्मानपूर्वक नवीन अध्यक्षांना आसनस्थ केले. रमेश कुमार हे निवृत्तीपूर्वी लालबहादूर शास्त्री केंद्रीय संस्कृत विद्यापीठाचे (दिल्ली) कुलपती होते. त्यावेळी ते दिल्ली प्रांताचे संस्कृतभारतीचे अध्यक्षसुद्धा होते. दुसऱ्या दिवशी नवीन अध्यक्षांनी अखिल भारतीय समिती व क्षेत्रीय अधिकाऱ्यांच्या घोषणा केल्या. विशेष कार्यक्रम म्हणजे रात्री बंगाल प्रांताच्या कलाकारांनी प्रस्तुत केलेल्या भाण रूपकाचे मंचन. पात्रे दोन. दोघेही नर्तक. एक नृत्य करतानाच संस्कृत भाषेत निवेदन पण करीत होता. निवेदनात व्याकरण, दर्शन, साहित्य इत्यादी गंभीर विषयांचे प्रतिपादन लीलया केले गेले. अद्भुत असा हा भाण प्रकार संस्कृत साहित्यात वर्णित आहे. पण त्याची प्रत्यक्ष प्रस्तुती अनेकांना पहिल्यांदाच पाहायला मिळाली. विलक्षण असलेले हे नृत्य नाट्य सर्वांच्याच स्तुतीला पात्र ठरले.

अधिवेशनात सहभागी प्रतिनिधींचे गटशः सामूहिक खेळ पण झाले. त्याला क्रीडोत्सव असे नाव दिले होते. अशा प्रकारे तीन दिवस उत्साह, ज्ञान चर्चा, आनंद यात कसे संपले काही कळले नाही. अधिवेशन खरंच एक सुशोभित, समृद्ध अनुभव होता, जणू संस्कृत गंगेचा प्रवाह! संस्कृत कुंभमेळाच वाटला! संपूर्ण समारंभाची व्यवस्था अत्यंत शिस्तबद्ध आणि नीटनेटकी होती. प्रत्येक कार्यकर्ता झऱ्यासारखा आपल्या कार्यात प्रेमाने, भक्तीने, सेवेच्या भावनेने, थकवा न जाणता गुंतलेला होता.

जयतु सस्कृतं विश्वपोषकम्!

संस्कृत भारती
shreeshdeopujari@gmail.com

## वेध

**नीलेश जोशी**

# विकृत मनोवृत्ती, उदासीन प्रशासन

'यत्र नार्यस्तू पूज्यन्ते रमन्ते तत्र देवता:' असा संस्कृत श्लोक आहे. जिथे स्त्रीचे पूजन होते तिथे देवता वास करतात असा त्याचा अर्थ. आमच्या संस्कृतीत मातृपूजनाचे मोठे महत्त्व आहे. आश्विन नवरात्र तर मातृपूजनाचा मोठा उत्सवच. एकीकडे हजारो वर्षांपासूनची ही समृद्ध परंपरा असतानाच दुसरीकडे महिलांचे लैंगिक शोषण, विनयभंग, अत्याचार या मन सुन्न करणाऱ्या घटना वारंवार समोर येतात. या घटना कायद्याने गुन्हा या श्रेणीत येत असल्या तरी खरं म्हणजे हा मानवी सभ्यतेवर असलेला काळाकुट्ट डागच.

माहिती तंत्रज्ञान, शिक्षण आणि जागतिकीकरणाच्या या युगात आपण भौतिक प्रगती तर झपाट्याने करीत आहोत पण त्याच गतीने दिवसेंदिवस कमी होत असलेली नैतिकता ही समाजासमोर असलेली मोठी समस्या आहे. त्यातही ज्याने नैतिकतेचे, चांगुलपणाचे, चारित्र्याचे शिक्षण देणे अपेक्षित आहे असा शिक्षकच जेव्हा विद्यार्थिनींचा विनयभंग करतो तेव्हा मात्र स्वाभाविक आत्यंतिक चीड निर्माण होते. अकोला जिल्ह्यातील पातूर तालुक्यात असलेल्या एका आडवळणाच्या गावात जिल्हा परिषद शाळेतील शिक्षकाने पाच चिमुकल्या मुलींचा विनयभंग केल्याची घटना उघडकीस आली आणि पुन्हा याबाबतची चर्चा सुरू झाली. देशात महिला, मुलींवर अत्याचाऱ्याच्या घटना नेहमीच घडतात. या संदर्भातील नोंद झालेली आकडेवारी भयावह आहे. २०२४ च्या आकडेवारीनुसार दररोज ९० पेक्षा अधिक बलात्काराच्या घटना नोंदविल्या जातात. केवळ अकोला जिल्ह्याचा आणि त्यातही शाळांमधील प्रकरणाचा विचार केला तर गत दोन वर्षांत पातूर तालुक्यात उघडकीस आलेली ही चौथी घटना आहे. एप्रिल २०२३ मध्ये बार्शिटाकळी तालुक्यातील धामणदरी येथील जिल्हा परिषद शाळेत दोन शिक्षकांनी चार मुलींवर अत्याचार केला होता. तर दुसरी घटना जुलै २०२४ रोजी गुडधी जिल्हा परिषद शाळेत घडली होती. पोषण आहार मदतनिसाने येथे मुलीचा विनयभंग केला होता. तिसऱ्या घटनेत बाळापूर तालुक्यातील काझीखेड जिल्हा परिषदेत शाळेतील विद्यार्थिनींनी शिक्षकाकडून छळ होत असल्याचा आरोप केला होता. या चारही घटनांमधील आरोपींना अटक करून गुन्हे देखील दाखल करण्यात आले. पण केवळ गुन्हे दाखल करून या समस्येचे निराकरण शक्य आहे का? हा खरा प्रश्न आहे. महिला, मुलींचे लैंगिक शोषण, विनयभंग हे मानवी मूल्यांच्या अध:पतनासह एक विकृती आहे. ही विकृती थांबविण्यासाठी केवळ कायद्याच नव्हे तर नैतिक मूल्य, संस्कारांची रुजवण आवश्यक आहे आणि त्यासाठी समाजातील विविध व्यक्ती, संघटनांना सकारात्मक पुढाकार घ्यावा लागेल. शासन देखील याबाबत गंभीर आहेच. शिक्षणासारख्या पवित्र क्षेत्रात यापूर्वी घडलेल्या घटनांमधून धडा घेत शासनाने विविध उपाययोजना त्या-त्या स्तरावर केल्या आहेत. यात शालेयस्तरावर सखी-सावित्री समितीचे गठन करून या समितीद्वारा संवाद आणि समुपदेशनाच्या माध्यमातून जाणीव जागरणाचे काम व्हावे अशी अपेक्षा व्यक्त केली आहे. स्त्री, मुली यांना आधार वाटावा याकरिता पोलिस प्रशासनाचे दामिनी पथक देखील कार्यरत आहे. पण मुळात सर्वच ठिकाणी या समिती, पथकाची क्रियाशीलता किती असा प्रश्न आहे. बहुतांश ठिकाणी सखी-सावित्री समिती केवळ कागदावर तर दामिनी पथक शहर, तालुकास्तरावर असलेल्या शाळा-महाविद्यालयांपर्यंत पोहोचून फोटो काढण्यात धन्यता मानते. काही ठिकाणी चिडीमारांचा बंदोबस्त होतो हे मान्य असले तरी स्वत:हून आवश्यक असलेला पुढाकार या समिती, पथकाद्वारे घेतल्या जात असल्याचे दिसून येत नाही. प्रशासकीय कोडगेपणाचे आणखी एक उदाहरण म्हणजे अकोला जिल्ह्यातील शाळांमधील घटनांनंतर राज्य शासनाने जिल्ह्यातील ९१२ शाळांमध्ये सीसीटीव्ही लावण्यासाठी तब्बल ४.१० कोटींचा निधी जानेवारी महिन्यात मंजूर केला. पण तब्बल ९ महिन्यांनंतरही शाळांमध्ये सीसीटीव्ही लागले नाहीत. जेमतेम दोन दिवसांपूर्वी त्याची निविदा प्रकाशित करण्यात आली आहे. शिक्षण क्षेत्रातील घटनांमुळे विकृतांबद्दल चीड निर्माण होणे स्वाभाविक आहे. पण याबाबत शासनाने योजिलेल्या उपाय योजनांची प्रशासनाने केवळ खानापूर्ती करावी हेही संतापजनक नव्हे का?

९४२२८६२४८४

## दिल्ली वार्तापत्र

# लाल किल्ला किती वेळा 'लाल' होणार?

**श्यामकांत जहागीरदार**

राजधानी दिल्लीत लाल किल्ला मेट्रो स्थानकाजवळ सोमवारी सायंकाळी झालेल्या शक्तिशाली स्फोटाने दिल्लीच नाही तर संपूर्ण देशाला जबर धक्का बसला आहे. लालकिल्ला आणि चांदनी चौकचा भाग हा अतिशय गर्दीचा भाग आहे. सकाळपासून रात्रीपर्यंत या भागात हजारो लोक फिरत असतात. या भागात दिवसा कोणत्याही वेळी पायी चालणेही कठीण होते, एवढी गर्दी या भागात असते. त्यात सायंकाळची वेळ म्हटली तर विचारायलाच नको. त्यामुळे कार बॉम्बस्फोटासाठी दहशतवाद्यांनी या भागाची निवड का केली, याची कल्पना आपल्याला येईल.

या स्फोटाबाबत जी माहिती समोर येत आहे, ती अतिशय धक्कादायक आहे. या स्फोटाची जबाबदारी अद्याप कोणत्याही दहशतवादी संघटनेने स्वीकारली नसली तरी अनेक दहशतवादी संघटनांचा यात सहभाग आहे, यात शंका नाही. या स्फोटप्रकरणी उत्तरप्रदेशच्या फरिदाबाद येथून ज्यांना अटक करण्यात आली, ते सर्व उच्चशिक्षित म्हणजे डॉक्टर आहेत. अशिक्षित वा अल्पशिक्षित लोकांचे ब्रेनवॉशिंग करणे सोपे असते, असे आतापर्यंत मानले जात होते, पण या स्फोटाने तर उच्चशिक्षित लोकांचेही ब्रेनवॉशिंग करणे कठीण नाही, हे दिसून आले.

शहरी नक्षलवादी या संकल्पनेसारखी आता शहरी दहतशवादी ही नवी संकल्पना समोर आली असे म्हणावे लागेल. देशाची राजधानी सर्वांत सुरक्षित मानली जाते. पण राजधानीत स्फोट घडवून दहशतवादी संघटनांनी आपले खतरनाक मनसुबे जाहीर केले आहेत. देशात मोदी सरकार सत्तेवर येऊन ११ वर्षे पूर्ण झाली आहेत. पण या ११ वर्षांच्या काळात देशाच्या राजधानीत एकही मोठा असा बॉम्बस्फोट झाला नव्हता. पण यावेळी स्फोट घडवून दहशतवाद्यांनी

एकप्रकारे मोदी सरकारला आव्हान दिले आहे. सरकारच्या विश्वसनीयतेवर प्रश्नचिन्ह उपस्थित करण्याचा प्रयत्न केला. त्यामुळेच या हल्ल्यातील सूत्रधारांना सोडणार नाही, कट रचणाऱ्यांना याची जबर किंमत चुकवावी लागेल, असा इशारा पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी दिला आहे, तर केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनी हल्लेखोरांना शोधून काढा, कुणालाही सोडू नका, असे निर्देश सुरक्षा दलांना दिले आहेत.

दिल्लीत झालेला हा पहिला स्फोट नाही. मागील २९ वर्षांत अनेक स्फोटांनी दिल्ली हादरली आहे. अशा स्फोटांनी काही काळ अस्वस्थता पसरत असली तरी दिल्ली घाबरली कधीच नाही. दिल्लीच्या लोकांनी हिंमत सोडली नाही. गेल्या २९ वर्षांत दिल्लीत १६ लहान मोठे स्फोट झाले. २५ मे १९९६ ला दिल्लीच्या लाजपतनगर बाजारात पहिला स्फोट झाला. यात १६ जण मृत्युमुखी पडले. त्यानंतर १ ऑक्टोबर १९९७ ला दिल्लीच्या सदर बाजारात दोन स्फोट झाले. या स्फोटात ३० जण जखमी झाले, पण सुदैवाने कोणाचा बळी गेला नाही. याच महिन्यात दिल्लीच्या वेगवेगळ्या भागांत आणखी तीन बॉम्बस्फोट झाले. १० ऑक्टोबर, १८ ऑक्टोबर आणि २६ ऑक्टोबरला बॉम्बस्फोट झाले. या बॉम्बस्फोटात प्राणहानी मोठ्या प्रमाणात झाली नसली तरी काही जण जखमी झाले. १० ऑक्टोबरला शांतिवन, कौडिया पूल आणि किंग्जवे कॅम्प या भागात बॉम्बस्फोट झाले. यात १६ जण जखमी झाले. १८ ऑक्टोबरला राणी बाग मार्केटमध्ये दोन स्फोट झाले. यात १ जण ठार, २३ जण जखमी झाले. २६ ऑक्टोबरला करोलबाग बाजारात पुन्हा दोन बॉम्बस्फोट झाले. यात एक जण ठार तर ३४ जण जखमी झाले.

३० नोव्हेंबरला १९९७ ला लाल किल्ला परिसरात दोन स्फोट झाले. यात ३ जण ठार, ७० जखमी झाले. ३० डिसेंबर १९९७ ला पंजाबीबाग परिसरात झालेल्या बसस्फोटात ४ जण ठार, तर ३० जखमी झाले. २७ जानेवारी २००० ला पहाडगंज भागात एक स्फोट झाला. १६ मार्चला सदर बाजार परिसरात बॉम्बस्फोट झाला, यात ७ जण जखमी झाले. १८ जून २००० ला लाल किल्ला परिसरात दोन शक्तिशाली स्फोट झाले. यात दोन जण ठार तर अनेक जण जखमी झाले. यावेळी पुन्हा लाल किल्ला परिसरात बॉम्बस्फोट झाला, याचाच अर्थ लाल किल्ला परिसर हे तेव्हाही दहशतवाद्यांचे सॉफ्ट टार्गेट होते आणि आताही आहे. कारण हा परिसर अतिशय गर्दीचा आणि संवेदनशील आहे.

डिसेंबर २००१ मध्ये अतिरेकी संघटनांनी संसदेवर हल्ला केला होता. यात संसदेचे कर्मचारी आणि सुरक्षा जवान मिळून ९ जण हुतात्मा झाले होते. सतर्क सुरक्षा यंत्रणांनी अतिरेकी हल्ल्याचा हा प्रयत्न हाणून पाडला, अन्यथा त्या दिवशी संसदभवन परिसरात काय अनर्थ घडला असता, याची कल्पना करवत नाही. कारण त्या दिवशी संसदभवन परिसरात अनेक अतिमहत्त्वाच्या व्यक्ती उपस्थित होत्या. संसदेवरील अतिरेकी हल्ला हा लोकशाहीच्या सर्वोच्च मंदिरावर झालेला हल्ला मानला जात होता. २२ मे २००५ ला लिबर्टी आणि सत्य चित्रपटगृह परिसरात दोन बॉम्बस्फोट झाले. यात एक जण ठार तर ६० जखमी झाले. २९ ऑक्टोबर २००५ ला सरोजिनीनगर, पहाडगंज आणि गोविंदपुरी या तीन भागांत तीन शक्तिशाली बॉम्बस्फोट झाले. यात ५९ जण मृत्युमुखी पडले तर शंभरावर जखमी झाले. राजधानी दिल्लीतील हा सर्वांत शक्तिशाली स्फोट मानला जातो. १४ एप्रिल २००६ ला लाल किल्ला परिसरातील जामा मशीद जवळ दोन स्फोट झाला. यात १४ जण जखमी झाले. १३ सप्टेंबर २००८ ला करोल बाग (गफ्फारबाग), कॅनॉटप्लेस आणि ग्रेटर कैलाश १ मध्ये एकूण पाच स्फोट झाले. यात ३० च्या जवळपास माणसे मृत्युमुखी पडली. २७ सप्टेंबर २००८ ला मेहरौली परिसरातील फुल बाजारात स्फोट झाला. २५ मे २०११ ला दिल्ली उच्च न्यायालयाच्या पार्किंगमध्ये स्फोट झाला. यात कोणतीही प्राणहानी झाली नसली तरी यामुळे सुरक्षाव्यवस्थेवर गंभीर प्रश्नचिन्ह उपस्थित झाले.

हे सर्व बॉम्बस्फोट संपुआ शासनकाळात झाले होते. २०१४ मध्ये मोदी सरकार आल्यानंतर राजधानी दिल्लीत एकही बॉम्बस्फोट झाला नाही. मोदी सरकारच्या ११ वर्षांत देशाच्या काही भागांत स्फोट झाले असले तरी राजधानी दिल्लीत एकही स्फोट नव्हता. त्याची कसर यावेळी अतिरेकी संघटनांनी भरून काढली. मोदी सरकारच्या काळात राजधानी दिल्लीही सुरक्षित नाही, असा संदेश यातून अतिरेकी संघटनांना द्यायचा असावा. त्यामुळे त्यांनी लाल किल्ला परिसरात यावेळी कार बॉम्बस्फोट घडवून आणले, असे म्हणायला जागा आहे. लाल किल्ला हा राजधानी दिल्लीचाच नाही तर देशाचा मानबिंदू म्हणायला पाहिजे. देशाला स्वातंत्र्य मिळाल्यानंतर पहिल्यांदा झेंडावंदन याचठिकाणी झाले होते. ती परंपरा कायम ठेवण्यासाठी दरवर्षी १५ ऑगस्टला लाल किल्ल्यावरच स्वातंत्र्यदिनाचा मुख्य शासकीय कार्यक्रम होत असतो. पंतप्रधान लाल किल्ल्यावरच तिरंगा फडकवून देशाला संबोधित करत असतात. त्यावरून लाल किल्ला परिसराचे महत्त्व आपल्या लक्षात येते. लाल किल्ल्याचा परिसरात निरपराध लोकांचे लाल रक्त सांडण्यासाठी दहशतवाद्यांनी यावेळी पुन्हा एकदा या परिसरात शक्तिशाली बॉम्बस्फोट घडवले. या स्फोटप्रकरणी अटक करण्यात आलेले सर्व जण मुस्लिम आहेत. देशातील सर्व मुस्लिम अतिरेकी नसले तरी जे अतिरेकी आतापर्यंत वेगवेगळ्या बॉम्बस्फोट प्रकरणात पकडले गेले, ते सर्व मुस्लिम आहेत, याकडे आपल्याला दुर्लक्ष करता येणार नाही. त्यामुळे यावेळी देशातील मुस्लिम समाजावरील जबाबदारी वाढली आहे. आपण राष्ट्रभक्त आहोत, आपली श्रद्धा आणि निष्ठा या देशाच्या मातीवर आहे, भारत हीच आपली मातृभूमी आहे, या देशाच्या मातीला वंदन करत वंदे मातरम् म्हणायला आपण तयार आहोत, हे सिद्ध करण्याची शेवटची संधी मुस्लिम समाजाला मिळाली आहे. या संधीचे त्यांनी सोने केले पाहिजे, माती करू नये. अन्यथा त्यांच्यावरच मातीत जाण्याची वेळ आल्याशिवाय राहणार नाही. या देशातील राष्ट्रभक्त जनता आणि मोदी सरकार असला प्रकार खपवून घेणार नाही. याला जशास तसे उत्तर दिले जाईल, याची जाणीव त्यांनी ठेवली पाहिजे.

९८८१७१७८१७

### आपणही सतर्क हवे

भारताची राजधानी असलेल्या दिल्लीत स्फोट झाला ही बाब अतिशय गंभीर आहे. या घटनेमुळे संपूर्ण देश हादरला आहे. याच्या मुळाशी कोण आहे याचा अंदाज व्यक्त केला जातो आहे. तपास यंत्रणेचे कार्य सुरू असताना यात उच्चशिक्षित व्यावसायिकांचा हात असल्याचा अंदाज वर्तवला जातो आहे. याचा अर्थ दहशतवादी हे आतापर्यंत कट्टरपंथी किंवा अशिक्षित लोक असतात अशी धारणा होती ती खोटी ठरली आहे. ज्या व्यावसायिकांकडे जनता आदराने आणि विश्वासाने बघते ती साफ खोटी ठरली आहे. स्फोट मोठा असो वा मोठा ही बाब गौण ठरली आहे. ज्यांच्या कुटुंबावर हा आघात झाला त्यांच्या दुःखाला पारावार नाही. या घटनेमुळे देशविदेशात दहशत पसरली आहे. मोठ्या मेट्रो शहरात कुठेही घराबाहेर पडताना सामान्य माणसाच्या मनात सुरक्षितता राहील काय? गेल्या दशकात मोदी सरकारच्या काळात निर्माण झालेल्या सुरक्षिततेच्या भावनेला धक्का बसला आहे. देशभरात भीतीचे सावट निर्माण झाले आहे. सरकार आणि तपास यंत्रणा अव्याहतपणे परिश्रम घेत आहेत तरी केव्हा, कुठे, कधी दुर्घटना घडवल्या जाईल याबद्दल सामान्य नागरिकांमध्ये दहशत पसरली आहे आणि हेच दहशतवाद्यांना हवे आहे त्यामुळे आपणही सतर्क व्हायला हवे.

**स्नेहल प्रकाश खंडागळे**/नागपूर

## वाचक पत्रे

### बालकांच्या हक्कांचे रक्षण सर्वांची जबाबदारी

बालके ही राष्ट्राची अमूल्य संपत्ती आहे. देशाच्या या अनमोल राष्ट्रीय संपत्तीचे लालनपालन, पोषण सुव्यवस्थित, निकोप, निरोगी, चारित्र्यसंपन्न व्हावे. उद्याचे ते एक जबाबदार नागरिक घडावेत, आदर्श नागरिक घडावेत ही सर्वांची अपेक्षा असते. यास्तव आई-वडील, शिक्षक, समाज व पालक या सर्वांनी बालकांबाबत अत्यंत जागरूक व संवेदनशील असायला हवे. त्यांना उत्तम शिक्षण मिळावे, उत्तम आरोग्य आहार मिळायला हवा. त्यांची सुरक्षितता ही अत्यंत महत्त्वाची आहे. या सर्व बाबी बालकांना अगदी प्रारंभापासून उत्तमरीत्या व नियमित मिळाल्या तर उद्याच्या देशाचा हा बालक देशाची धुरा सांभाळण्यास सक्षम, सुदृढ असेल. अलिकडे बालक व बालकांच्या हक्कांकडे सर्वच स्तरावर दुर्लक्ष होत आहे. बालकांचे जीवन सर्वच स्तरावर सुरक्षित असावे व त्यांच्या हक्कांवर कुणीही गदा आणू नये असे वाटते.

**धोंडिरामसिंह राजपूत**/९४२१३१२२४४

### श्री कालभैरव जयंती!

कार्तिक कृष्ण पक्ष अष्टमीला श्री कालभैरव जयंती साजरी केली जाते. या दिवशी भगवान कालभैरवाचा जन्म झाला होता, म्हणून ही जयंती साजरी करतात. भैरव हा भगवान शंकराचा एक रौद्र अवतार मानला जातो. पुराणानुसार, एकदा ब्रह्मा, विष्णू आणि महेश या तिघांमध्ये श्रेष्ठत्वाचा विवाद झाला.

त्या वेळी भगवान शंकरांनी रौद्र रूप धारण करून कालभैरव या स्वरूपात अवतार घेतला. या रूपाने त्यांनी ब्रह्मदेवाच्या अहंकाराचा नाश केला. म्हणून या दिवसाला कालभैरव जयंती म्हणतात. या दिवशी भगवान कालभैरवाचे पूजन केले जाते. कालभैरवाचे वाहन कुत्रा असल्याने त्याला नैवेद्य दाखवला जातो. 'भैरव' म्हणजे 'भयाचा नाश करणारा', जो भक्तांच्या सर्व प्रकारच्या भीतीचा नाश करतो.

या दिवशी भक्त 'कालभैरवाष्टक स्तोत्र' पठन करतात व भगवान कालभैरवाचा मंत्रजप करतात. या स्तोत्राच्या जपाने सर्व प्रकारचे भय नाहीसे होते. असे मानले जाते की, या दिवशी भगवान शंकराच्या भैरवरूपाचे स्मरण करून साधना प्रारंभ केल्यास जीवनातील संकटे, भय आणि अडचणी दूर होतात आणि यश, आरोग्य, शांतता प्राप्त होते.

**रेणुका हरदास**/नागपूर

## आजचे संघगीत-४१

गुरुवार, १३ नोव्हेंबर २०२५

### रक्षणार्थ ठाकुनी उभे चहूकडे

रक्षणार्थ ठाकुनी उभे चहूकडे
करु समर्थ हा समाज होउनी पुढे ॥धृ.॥

अन्नवस्त्र अल्पसे आसरा नसे पुरा
जाहला नसे प्रबुद्ध देश हा खराखुरा
सिद्धीस्तव कष्टांचे शिंपुनी सडे ॥१॥

भक्तिहीन वृत्तिचे शक्तिहीन बापुडे
जन्मती नांदती नष्ट होति बुडबुडे
जागत्या जनार्दनास घालु साकडे ॥२॥

सद्गुणी पराक्रमी आपुल्या पिढ्या पिढ्या
दुर्दिनास पचवुनी राहिल्या सदा खड्या
सांगतात नौबती सांगतात चौघडे ॥३॥

व्यक्ति व्यक्ति भिन्नता, ती मतस्वतंत्रता
घडवु त्यातुनी समर्थ स्नेहशील एकता
एकसूत्र सर्व लोक करुनिया खडे ॥४॥

नांदवून शांतता, फुलवुनी समृद्धता
नाव सार्थ हे करू सुवर्णभूमि भारता
चालणे चालणे चालणे पुढे पुढे ॥५॥

# महापालिकेकडून विमानतळ परिसरातील सर्वेक्षण सुरु

## नियमांचे उल्लंघन करणाऱ्यांवर कारवाई करणार : वीणा पवार

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.१२ नोव्हेंबर-**

सोलापूर विमानतळ परिसराची सुरक्षितता अबाधित राहण्यासाठी या भागातील रहिवासी व व्यापारी यांनी केलेल्या अतिक्रमण, अस्वच्छतेसह इतर बाबींसंदर्भात सोलापूर महापालिका पथकाद्वारे सर्वेक्षण सुरू करण्यात आले आहे. अतिरिक्त आयुक्त वीणा पवार अतिरिक्त आयुक्त यांच्या मार्गदर्शनाखाली हे सर्वेक्षण सुरू आहे.

सोलापूर विमानतळ परिसराची सुरक्षितता अबाधित राहण्यासाठी जिल्हाधिकारी आशीर्वाद, महापालिका आयुक्त डॉ. सचिन ओम्बासे, पोलीस आयुक्त राजकुमार यांच्या उपस्थितीत विमान प्राधिकरण व संबंधित सर्व विभागांची बैठक घेण्यात आली होती. या बैठकीतील सूचनांच्या अनुषंगाने सोलापूर महापालिकेच्या वतीने विमानतळ परिसर लगत राहणाऱ्या सर्व नागरिक, व्यापारी, दवाखाने, मांसाहारी पदार्थ विक्रेते तसेच गॅरेज व्यावसायिक यांना महत्वाच्या सूचना देण्यात



आल्या आहेत. सोलापूर विमानतळाच्या कंपाऊंड वॉल लगतच्या भागामध्ये काही नागरिक व व्यापारी यांच्याकडून वारंवार कचरा थेट विमानतळाच्या परिसरात टाकण्याचे प्रकार निदर्शनास आले आहेत. या कचऱ्यातील खाद्यपदार्थांच्या वासामुळे पाळीव व भटके प्राणी, पक्षी, घारी मोठ्या प्रमाणात त्या भागाकडे आकर्षित होत असून त्यामुळे विमानतळ परिसराच्या सुरक्षिततेला गंभीर धोका निर्माण होऊ शकतो, असे महानगरपालिकेच्या निरीक्षणात आले आहे. तसेच परिसरातील गॅरेजधारकांकडून टायर जाळल्यामुळे निर्माण होणारा धूर व प्रदूषण यामुळे वातावरण दूषित होत असल्याचे देखील निदर्शनास आले आहे. त्याचप्रमाणे विमानतळाच्या लगतच्या परिसरात काही ठिकाणी नागरिकांकडून गच्चीवरून, शौचालयाच्या भिंतीवरून अथवा उंचावरून पतंग उडविण्याचे प्रकारही दिसून आले असून यामुळे विमान सुरक्षेला धोका निर्माण होऊ शकतो. तसेच अनधिकृत बांधकामे, पत्रा शेड, शौचालये व अतिक्रमणाची प्रकरणे देखील समोर आली आहेत. या पार्श्वभूमीवर अतिरिक्त आयुक्त वीणा पवार यांनी त्या ठिकाणी सर्व रहिवासी व व्यापाऱ्यांनी आपला कचरा फक्त घंटागाडीतच टाकावा. विमानतळाच्या कंपाऊंडच्या आत किंवा परिसरात कचरा फेकू नये.मटन, चिकन, मच्छी आदी मांसाहारी पदार्थ आदी कचरा उघड्यावर फेकता कामा नये. गॅरेज व्यावसायिकांनी टायर, रबर वा अन्य वस्तू जाळून धूर निर्माण करू नये.विमानतळ परिसरातील कोणत्याही घरातून पतंग उडवू नये.विमानतळ कंपाऊंड लगत कोणतेही अनधिकृत बांधकाम, पत्रा शेड, शौचालय उभारू नये; विद्यमान बांधकामे तात्काळ काढून घ्यावीत.कोणतेही अतिक्रमण, शेड, टपऱ्या इ. तात्काळ हटविण्यात याव्यात.विमानतळ कंपाऊंड लगत कोणतेही वाहन, ट्रक इत्यादी उभे करू नये.परिसरातील सर्व दवाखाने यांनी आपला बायोमेडिकल वेस्ट योग्य पद्धतीने नष्ट करावा; तो उघड्यावर टाकल्यास कठोर कारवाई केली जाईल.

या नियमांचे उल्लंघन करणाऱ्यांवर कठोर कायदेशीर कारवाई करण्यात येईल. त्यामुळे सर्व नागरिकांनी, व्यापाऱ्यांनी, गॅरेज व मांसाहारी पदार्थ विक्रेत्यांनी या सूचनांचे गांभीर्याने पालन करून विमानतळ परिसराची स्वच्छता व सुरक्षितता अबाधित ठेवावी, असे आवाहन अतिरिक्त आयुक्त वीणा पवार यांनी केले आहे.

---

## महत्वाचे...




### बार्शीत इच्छुक उमेदवारांची नगरपालिकेत गर्दी, तिसऱ्या दिवशी एकही अर्ज दाखल नाही

**बार्शी, दि. १२ नोव्हेंबर-**

आचारसंहिता लागू झाल्यानंतर बार्शी नगरपरिषदेच्या महसुलात वाढ झाली असून, घरपट्टी विभागात तब्बल ४० लाखांची वसुली झाली आहे. बार्शी नगरपरिषद निवडणुकीसाठी दि. ४ नोव्हेंबरपासून आचारसंहिता लागू झाल्यानंतर नगरपरिषदेच्या घरपट्टी विभागात बुधवार दि. १२ नोव्हेंबर अखेरीस सुमारे ४० लाख रुपयांची कर वसुली झाल्याची माहिती मिळाली आहे. निवडणुकीत उमेदवारी दाखल करण्याच्या पार्श्वभूमीवर अनेक इच्छुकांनी थकबाकीची रक्कम पूर्णपणे जमा केली आहे. कारण उमेदवारांसाठी कर थकबाकी नसणे ही अत्यावश्यक अट असल्याने, निवडणुकीपूर्वी घरपट्टी विभागात वसुलीचा ओघ वाढलेला दिसतो. दरम्यान, महसुली आकडेवारीत वाढ होत असतानाच, शहरात उमेदवारी निश्चितीसाठी नेत्यांकडून अंतिम हिरवा कंदील मिळण्याची प्रतीक्षा उमेदवारांना लागली आहे. त्यामुळे एकीकडे नगरपरिषदेच्या तिजोरीत वाढ होत असताना, दुसरीकडे राजकीय समीकरणे अजूनही गोंधळलेल्या अवस्थेत आहेत. त्यामुळे आज अखेर एकही अर्ज दाखल करण्यात आलेला नाही.

### लास्ट स्टॉप खांदा चित्रपटाचा ट्रेलर लाँच; २१ नोव्हेंबरला प्रेक्षकांच्या भेटीला

**सोलापूर, दि. १२ नोव्हेंबर-**

सध्या जोरदार चर्चेत असलेल्या लास्ट स्टॉप खांदा... या चित्रपटातून प्रेमाचा इमोशनल, कॉमेडी ड्रामा उलगडणार आहे. उत्तम लेखन, अभिनय, संगीत असलेला,पुरेपूर मनोरंजन करणारा हा चित्रपट २१ नोव्हेंबरला प्रदर्शित होणार असून, चित्रपटाचा ट्रेलर लाँच करण्यात आला आहे.शिवम फिल्म क्रिएशन सिग्नेचर ट्यून्स, स्नेहा प्रॉडक्शन्स यांनी ''लास्ट स्टॉप खांदा... '' प्रत्येकाच्या प्रेमाची गोष्ट या चित्रपटाची निर्मिती केली आहे. सचिन कदम आणि सचिन जाधव यांनी या चित्रपटाती प्रस्तुती केली आहे. प्रदीप मनोहर जाधव हे या चित्रपटाचे निर्माते असून सचिन कदम, अमृता सचिन जाधव सहनिर्माते आहेत. श्रमेश बेटकर लिखित या चित्रपटाचं दिग्दर्शन विनित परुळेकरनी केलं आहे.चित्रपटात अभिनेता श्रमेश बेटकर अभिनेत्री जुईली टेमकर, निखिल बने,मंदार मांडवकर, शशिकांत केरकर,सुदेश जाधव, महेश कापरेकर, प्रियांका हांडे, डॉ.सचिन वामनराव, गणेश गुरव, निशांत जाधव, गिरीश तेंडुलकर, जयश्री गोविंद अशी तगडी स्टारकास्ट आहे. तर पाहुणे कलाकार म्हणून प्रभाकर मोरे,धनश्री काडगावकर,अशोक ढगे हे आपल्या भेटीस येणार आहेत. चित्रपटाचं छायांकन हरेश सावंत यांचं असून कलादिग्दर्शक केशव ठाकुर आहेत.

---

# रेल्वे पेन्शनधारकांसाठी सोलापुरात डिजिटल जीवन प्रमाणपत्र शिबिर

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.१२ नोव्हेंबर-**

रेल्वे पेन्शनधारक आणि कुटुंब पेन्शनधारकांना त्यांचे डिजिटल लाईफ सर्टिफिकेट सहज, सोयीस्कर आणि मोफत मिळण्यात मदत व्हावी यासाठी मध्य रेल्वेच्या सोलापूर विभागातील विविध प्रमुख स्थानकांवर डिजिटल लाईफ सर्टिफिकेट (जीवन प्रमाण) शिबिरांचे आयोजन करण्यात येत आहे.

या उपक्रमाचे उद्दिष्ट प्रत्येक पेन्शनधारकाला कोणत्याही अडचणीशिवाय त्यांचे लाईफ सर्टिफिकेट वेळेवर मिळावे हेच आहे. ज्यामुळे पेन्शनचे अखंड वितरण सुनिश्चित होईल.ज्यांनी अद्याप त्यांचे डिजिटल जीवन प्रमाणपत्र सादर केले नाही अशा सर्व पेन्शनधारकांना आणि कुटुंब पेन्शनधारकांना वेळापत्रकानुसार जवळच्या कॅम्प स्थानाला भेट देऊन या सुविधेचा लाभ घेण्याचे आवाहन केले जात आहे. सोलापूर विभाग आपल्या निवृत्त कर्मचाऱ्यांच्या कल्याणासाठी वचनबद्ध आहे आणि रेल्वे सेवा अधिक सुलभ, पारदर्शक आणि पेन्शनधारक-अनुकूल बनवणारे डिजिटल उपक्रम अवलंबत आहे.

**असे आहे शिबिराचे वेळापत्रक**

- **सोलापूर** - परीक्षा हॉल, विभागीय रेल्वे व्यवस्थापक कार्यालय, येथे दि. १७ आणि २० नोव्हेंबर रोजी सकाळी १० ते सायंकाळी ५ या वेळेत
- **कुर्डुवाडी** - स्टेशन मॅनेजर ऑफिस, कुर्डुवाडी रेल्वे स्टेशन दि.१८ नोव्हेंबर रोजी सकाळी १० ते सायंकाळी ५
- **पंढरपूर** - स्टेशन मॅनेजर ऑफिस, पंढरपूर रेल्वे स्टेशन दि. १९ नोव्हेंबर रोजी स. १० ते सायं. ५
- **लातूर** - स्टेशन मॅनेजर ऑफिस, लातूर रेल्वे स्टेशन येथे दि. २२ नोव्हेंबर रोजी स. १० ते सायंकाळी ५
- **वाडी** - स्टेशन मॅनेजर ऑफिस, वाडी रेल्वे स्टेशन येथे दि. २४ नोव्हेंबर रोजी स. १० ते सायंकाळी ५
- **कलबुरगि** - स्टेशन मॅनेजर ऑफिस, कलबुरगि रेल्वे स्टेशन येथे दि. २५ नोव्हेंबर रोजी स. १० ते सायंकाळी ५

**आवश्यक कागदपत्रे**

शिबिराला उपस्थित राहणाऱ्या पेन्शनधारकांनी

१. पेन्शन पेमेंट ऑर्डर (पीपीओ) ची प्रत
२. आधार कार्ड
३. बँक पासबुक (पेन्शन खाते)
४. आधारशी लिंक असलेला मोबाईल फोन (ओटीपी पडताळणीसाठी)

---



# मंगळवेढा तालुका समविचारी आघाडी बैठक

## आगामी नगरपरिषद, जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणुका लढविण्यासाठी ठरली रणनिती

**तभा वृत्तसेवा,**
**मंगळवेढा दि. १२ नोव्हेंबर-**

मंगळवेढा तालुका समविचारी आघाडीची महत्त्वपूर्ण बैठक युवक नेते सिध्देश्वर आवताडे यांचे संपर्क कार्यालयात उत्साहात पार पडली. आगामी नगरपरिषद, जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणुकांमध्ये एकत्रितपणे लढण्याचा निर्णय या बैठकीत घेण्यात आला. या बैठकीस माजीमंत्री लक्ष्मणराव ढोबळे,सरकार महर्षी बबनराव आवताडे, भैरवनाथ शुगरचे चेअरमन अनिल सावंत, भगीरथ भालके, दामाजी शुगरचे संचालक सिध्देश्वर आवताडे, कॉंग्रेस तालुकाध्यक्ष प्रशांत साळे, राष्ट्रवादी शरदपवार गट तालुकाध्यक्ष पांडुरंग चौगुले, रामभाऊ वाकडे, ॲड. राहुल घुले, मुरलीधर सरकळे, सोमनाथ माळी, प्रतिक किल्लेदार, सोमनाथ बुरजे, प्रशांत गायकवाड उपस्थित होते.

बैठकीचे अध्यक्षस्थान आघाडीचे प्रमुख सरकार महर्षी बबनराव आवताडे यांनी भूषविले. यावेळी सर्व वक्त्यांनी एकमुखाने मत व्यक्त केले की, मंगळवेढा तालुक्यात जनतेच्या मूलभूत प्रश्नांवर काम करणारी, विकासाभिमुख आणि भ्रष्टाचारमुक्त सत्ता निर्माण करण्यासाठी सर्व समविचारी घटकांनी एकत्र येणे काळाची गरज आहे.

बैठकीदरम्यान मंगळवेढा नगरपरिषद निवडणूक लक्षात घेऊन प्रभागनिहाय आढावा, संभाव्य उमेदवारांची चर्चा, तसेच प्रचाराची प्रारंभिक रूपरेषा ठरविण्यात आली. याशिवाय जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणुकांमध्ये देखील एकच पॅनेल, एकच धोरण ठेवण्याचा निर्णय घेण्यात आला.

बैठकीत बोलताना काही वक्त्यांनी सांगितले की, मंगळवेढ्यात विकासाच्या नावाखाली केवळ राजकारण झाले, प्रत्यक्षात जनतेच्या प्रश्नांकडे कोणी लक्ष दिले नाही. आता बदलाची वेळ आली आहे. युवक, शेतकरी, महिला व कामगार यांच्या आशा-आकांक्षा पूर्ण करणारी सत्ता आणण्यासाठी समविचारी आघाडी पुढाकार घेईल. या बैठकीत आघाडीच्या कार्यकारिणीची प्राथमिक रचना, प्रचार समिती तसेच संवाद व समन्वय समिती स्थापन करण्यात आली. पुढील काही दिवसांत गावनिहाय बैठका घेऊन जनतेचा अभिप्राय जाणून घेण्याचे ठरले.

---



# वंचित घटकातील विद्यार्थ्यांना ज्ञान देण्याचे कार्य अमूल्य : कादर शेख

## प्राथमिक शिक्षक सहकारी पतसंस्थेच्या आदर्श शिक्षक पुरस्काराचे वितरण

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.१२ नोव्हेंबर-**

वंचित घटकातील विद्यार्थ्यांना ज्ञान देण्याचे शिक्षकांचे कार्य अमूल्य आहे. शिक्षक विद्यार्थ्यांना घडवतात. विद्यार्थी देशाचे भवितव्य आहेत. असे प्रतिपादन जिल्हा परिषदचे प्राथमिक विभागाचे शिक्षणाधिकारी कादर शेख यांनी केले. महानगरपालिका प्राथमिक शिक्षक सहकारी पतसंस्थेच्या शताब्दी महोत्सवानिमित्त आदर्श शिक्षक पुरस्कार वितरण करण्यात आले. प्रथम शंभर वर्षाच्या कालावधीतील कार्याचा उल्लेख असलेला स्मरणिकेचे प्रकाशन करण्यात आले. त्याप्रसंगी ते बोलत होते.

त्याचप्रमाणे सन २०२५ महापालिकेच्या मराठी, कन्नड, उर्दू,तेलगू कार्यरत असणाऱ्या शिक्षकापैकी १२ शिक्षकांना आदर्श शिक्षक पुरस्कार व एका शिक्षकास विशेष गौरव पुरस्कार देण्यात आला. पुरस्कार प्राप्त शिक्षकांना सन्मानचिन्हव व गौरव पत्र देऊन गौरव करण्यात आले. उपस्थित सर्व सभासदांना शताब्दी महोत्सवी वर्षानिमित्त १५ ग्रॅम चांदीचे नाणे भेटवस्तू म्हणून देण्यात आले.

या पुरस्काराचे वितरण जिल्हा परिषदचे प्राथमिक विभागाचे शिक्षणाधिकारी कादर शेख व महाराष्ट्र राज्य मागासवर्गीय शिक्षक संघटनेचे राज्याध्यक्ष शामराव जवंजाळ , संस्थेचे संस्थापक कै.ग बा पारखे गुरुजी यांचे नातू राजेश पारखे यांच्या हस्ते वितरण करण्यात आले. या कार्यक्रमास महाराष्ट्र राज्य मागासवर्गीय शिक्षक संघटनेचे जिल्हाध्यक्ष शशिकांत खुडे,सचिव किरण सगेल उपस्थित होते. संस्थेचे चेअरमन नागेश गोसावी यांनी प्रास्ताविक केले. सूत्रसंचालन संचालक गंगाधर कांबळे व स्नेहा पुजारी यांनी केले तर आभार संचालक श्रीकृष्ण परमेश्वर सुतार यांनी मानले. यावेळी व्हाईस चेअरमन शाहीन शेख, संचालक गंगाधर कांबळे, कृष्ण परमेश्वर सुतार, इम्रान जमादार, अफरोज बागवान, मुद्देसर पाशा पिरजादे, केशव गलगली, भास्कर मदनाल,जहारा नगदेकर हे उपस्थित होते. कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी किरण शेळगे,अझर पंजेवाले. व्यवस्थापक समर्थ जाधव,लिपिक शाकीर शेख, संदीप घोळवे, प्रसन्न निकंबे, स्वप्निल चाबुकस्वार, आप्पासाहेब ककमारेंनी परिश्रम घेतले.

**या मान्यवरांचा झाला सन्मान** : आनंद रामलू सामल, संतोष चंद्रकांत सुतार, दत्तात्रेय चौगुले, उमा चंदनशिवे, लक्ष्मी हळगोदे, गणेश नागेंद्रप्पा उप्पळम, मंगल शिंगे, फुरकानुलक अ. जब्बार पानगल, शबाना शेख, शुगुप्ता प्यारे, रहिमा शेख, आयेशा शहापुरे, विशाल बब्रू मनाळे

---

**मूळ खरेदीखत, पावती व त्याची सूची क्र. २ हरवलेबाबत जाहीर नोटीस**

तमाम लोकांस विशेषतः शहर शिरूर व ता. शिरूर, जि. पुणे येथील आसपासचे परिसरातील लोकांना कळिवण्यात येते कि, मिळकतीचे वर्णन डि. पुणे, सब डी व ता. शिरूर पैकी शहर शिरूर येथील म्यू, पल हद्दीतील **सर्वे नं. ३२५/२/२ब** याचे क्षेत्र हे. ०१-०१ आर यापैकी कच्च्या नकाशातील **प्लॉट नं. ३१,** याचे क्षेत्र २०००.०० चौ. फुट. १८५.८७ चौमी. व **प्लॉट नं. ३०** पैकी, याचे क्षेत्र **२०००.०० चौ. फुट. १८५.८७ चौमी असे एकूण प्लॉट नं. ३० व ३१ याचे प्लॉट चे एकूण क्षेत्र ४०००.०० चौ. फुट. ३७१.७४** चौमी येणे प्रमाणे चतुःसीमा पूर्वक प्लॉट तदंगभूत वस्तू हक्कासह.

सदरची मिळकत हि श्री. मनोज रामराव सोनवणे यांच्या स्वसंपादित खरेदी मालकीची असून तो प्लॉट प्रत्यक्ष कब्जे वाहिवाटीस आहे व सदर प्लॉटच्या ७/१२ हक्कपत्रको त्यांच्या नावाची नोंद आहे. परंतु पूर्वी चे **खरेदीदस्त क्र. १) ३९६९/२०१२ २) ११२४/२०१८, ३) १२१८/२००० आणि ४) ९९३/२००० ची मूळखरेदीखत, पावती व त्याची सूची क्र. २. हे श्री. मनोज रामराव सोनवणे** याच्या कडून दि. १४/१०/२०२५ रोजी सायं. ०६.३० वा. च्या सुमारास कात्रज बस थांबा पुणे येथील परिसरात गहाळ झाली आहे, त्याबाबत त्यांनी भारती विद्यापीठ शहर पोलीस स्टेशन येथे दि. १९/११/२०२५ रोजी तक्रार दिली असून त्याचा गहाळ रजि. नं. १८११५०/२०२५, असा पडला आहे.

तरी मुळ खरेदीदस्त क्र. **खरेदीदस्त क्र. १) ३९६९/२०१२ २) १९२४/२०१८, ३) १२१८/२०००** आणि ४) **९१३/२००० ची मूळखरेदीखत, पावती व त्याची सूची क्र. २.,** हरवल्याने यदाकदाचित कोणास मिळाल्यास खालील दिलेल्या पत्त्यावरती संपर्क साधुन परत द्यावी अथवा आमचे अशील याच्या दुय्यम प्रत आधारे कर्ज प्रकरण करतील, यदाकदाचित याबाबत कोणाची काही हरकत अथवा त्या प्लॉट बाबत हक्क, हितसंबंध, लीज, दान, गहाण, टाच, बोजा, अशाप्रकारे हक्क, हितसंबंध असल्यास सदरची नोटीस प्रसिध्द झाले पासुन ०७दिवसाचे आत आमचे वकिलांना खाली दिलेल्या पत्त्यावरती प्रत्यक्ष भेटून कागदोपत्री पुराव्यानिशी आपला हक्क शाबित करावा, अन्यथा मुदतीनंतर आमचे अशील कोणाची कसलीही हरकत नाही असे गृहीत धरुन सदर मिळकत बँकेकडे तारण ठेवतील, नंतर कोणाची कसलीही हरकत आलेस आमचे अशीलाच्या व बँकेच्या हक्कावर व अधिकारावर तो बंधनकारक राहणार नाही. कोणाचीही फसगत होऊ नये याकरिता हि जाहिर नोटीस दिली. दि. १२/११/२०२५.

सही/-
**श्री. मनोज रामराव सोनवणे**
रा. शिरुर, ता. शिरुर

सही -
**ॲड. कुलदिप संजय क्षीरसागर,**
ऑफिस पत्ता :- 'कुलदिप लीगल असोसिएटस'
गाळा नं. ५१, डॉ. बाबासाहेब आंबेडकर कॉम्प्लेक्स, बाशी. ता. बार्शी, जि. सोलापुर
(अशिला तर्फे ॲडव्होकेट)

---

**सिव्हील किरकोळ अर्ज नं. २९६/२०२५**
**नि. ७**

**सोलापूर येथील मे. जिल्हा न्यायाधीश सो, यांचे कोर्टात**

**१) अनिता धनाजी कृपाळ** - अर्जदार
वय-३४ वर्षे, धंदा घरकाम
रा. आष्टी, ता. मोहोळ, जि. सोलापूर
**२) तनुजा धनाजी कृपाळ**
वय-१२ वर्षे, धंदा-शिक्षण
रा. आष्टी, ता. मोहोळ, जि. सोलापूर
नं.१ स्वतः करीता व अ.पा.क
म्हणुन लिहून देणार नं.२
विरुध्द
जिल्हाधिकारीसो, सोलापूर
(जिल्हाधिकारीसो सोलापूर यांचे
वतीने अर्जाची नोटीस मा. जिल्हासरकारी - सामनेवाला
वकील यांचेवर बजावणेत यावी)

ज्याअर्थी, अर्जदार नं १ हिने अर्जात नमुद अज्ञान अर्जदार नं २ तनुजा धनाजी कृपाळ हिचे नांवे असलेली शेतजमीन (प्लॉट) मिळकत विक्रीस परवानगी मिळण्यासाठीचा अर्ज या मे. कोर्टात दाखल केलेला असून सदर मिळकतीचे वर्णन डि. व सब डि. सोलापूर पैकी तालुका मोहोळ पैकी मौजे आष्टी येथील शेतजमीन (प्लॉट) गट नं ५८८/३/ब यांसी एकुण क्षेत्र ४ हे ७३ आर पो. ख ० हे १३ आर एकुण क्षेत्र ४ हे ८६ आर यासी आकार ५ रु. ०५ पैसे या शेतजमीनीपैकी अविभक्त क्षेत्र हे ०२ आर, यासी आकार रु ०२ पैसे या शेतजमीन (प्लॉट) मिळकतमध्ये अज्ञानाचा अविभक्त हिस्सा असुन सदरची शेतजमीन (प्लॉट) मिळकत विक्री करण्यास परवानगी मिळण्याकामी अर्जदार नं १ (जनक माता) अनिता धनाजी कृपाळ हिने या मे. न्यायालयात अर्ज दाखल केलेला आहे.

त्याअर्थी या नोटीसीने तमाम लोकांस कळिवण्यात येते की, वर नमूद शेतजमीन (प्लॉट) मिळकत विक्रीबाबत कोणाचीही हरकत असल्यास सदरची नोटीस प्रसिध्द झाल्यापासून १ महिन्याच्या आत किवा नेमलेली ता. १६/१२/२०२५ रोजी हजर राहून हरकत नोंदवावी. मुदतीत कोणाचीही हरकत न आल्यास मे. न्यायालय अर्जदाराचे म्हणणे ऐकून घेऊन योग्य ते आदेश करतील. त्यानंतर कोणाचीही तक्रार चालणार नाही ही जाहिर नोटीस दिली. ता. ७/११/२०२५

कोर्टाचा शिक्का

सही-
**अधिक्षक**
जिल्हा न्यायाधिश सो, कोर्ट सोलापूर

---

**खरेदीपूर्व जाहीर नोटीस**

तमाम लोकांना या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की,

**परिशिष्ठ 'अ' - मिळकतीचे वर्णन** :- डि व सब डि सोलापूर पैकी तालुका उत्तर सोलापूर पैकी शहर सोलापूर महानगरपालिकेच्या हद्दीतील दक्षिण कसबा पेठ येथील सिटी सर्व्हे नं. ६३०/१ या मिळकतीवर बांधण्यात आलेल्या गणेश अपार्टमेंट मधील

| सदनिका (फ्लॅट) नं | मजला | चटई क्षेत्र | फ्लॅट नं.१ ची चतुःसीमा | फ्लॅट नं. २ ची चतुःसीमा |
|---|---|---|---|---|
| १ | **तळमजला** | **२२.०७ चौ.मी.** | पुर्वेस : रस्ता | पुर्वेस : रस्ता |
| २ | **तळमजला** | **२२.०७ चौ.मी.** | पश्चिमेस : ओपन स्पेस | पश्चिमेस : ओपन स्पेस |
| | | | दक्षिणेस : श्री पुराणिक यांची जागा | दक्षिणेस : फ्लॅट नं. १ |
| | | | उत्तरेस : फ्लॅट नं. २ | उत्तरेस : सि.स.नं. ६३०/३ |

येणेप्रमाणे चतुसीमेतील वर्णनाचे ओनरशीप तत्त्वांवरील फ्लॅट जागा व आतील बांधकाम वगैरे इतर सर्व तद्ंगभूत वस्तूसह व कायम वहिवाटीचे इजमेंट हक्कासह आणि नळ नळाचे कनेक्शन व लाईट मीटर कंझुमरसह. तसेच सदर फ्लॅट जागा यास मिळणारे स्वतंत्रातील व घोषणापत्राप्रमाणे सामाईकातील प्रमाणित हक्क व अधिकारासह संपूर्ण फ्लॅट जागा.

वर नमुद परिशिष्ठ अ मधील नमुद संपूर्ण मिळकत ही श्री सुनिल पद्माकर दाते यांनी आमचे अशिल श्री. गौरव नागेश गोरे यांना कायम खूश खरेदी देण्याची ठरवून त्यापोटी इसाऱ्याची रक्कम देखील स्विकारलेली आहे. सदरील मिळकत ही निर्वेध व निजोखमी असल्याची खात्री व हमी श्री. सुनिल पद्माकर दाते यांनी आमचे अशिलांस दिलेली आहे.

तरी वर नमूद मिळकतीवर कोणतेही कसल्याही प्रकारचे गहाण, दान, लिज, भाडे, लिव्ह ॲण्ड लायसेन्स, बक्षीस, साठेखत, पोटगी, टाच, जप्ती, (Right Title Interest) या व इतर अन्य कोणत्याही स्वरूपाचे बोजा, हक्क व हितसंबंध कोणाचेही कोणत्याही न्यायालयात वाद विषय प्रलंबित असल्यास त्यांनी प्रस्तुतची नोटीस प्रसिद्ध झालेपासून ७ दिवसांचे आत आम्हाकडे खालील नमूद पत्त्यावर लेखी कागदोपत्री पुराव्यानिशी लेखी हरकत घ्यावी. मुदतीत कोणाचेही तक्रार व हरकत न आल्यास सदरची संपूर्ण निर्वेध, निजोखमी व बिनबोजाची आहे, असे गृहीत धरून आमचे अशिल पुढील खरेदीखताचा व्यवहार पूर्ण करतील, तद्नंतर कोणाचेही हरकत आल्यास ते आमचे अशिलावर व सदर संपूर्ण मिळकतीवर बंधनकारक राहणार नाही याची या खरेदीपूर्व जाहीर नोटीसीद्वारे नोंद घ्यावी.

ही खरेदीपूर्व जाहीर नोटीस दिली. ता. १२/११/२०२५

सही/-
**ॲड. सागर सुनिल मालप**
बी.एस.एल.एलएल.एम.,
२६/ब सिद्धीजीन हौसिंग सोसायटी,
मुरारजी पेठ, जुना पुना नाका जवळ,
सोलापूर- ४१३००२ मो. ९५४५५८००११.

---

**PRECISION CAMSHAFTS LIMITED**
Regd. Office : D5, M.I.D.C. Chincholi, Solapur, MH, 413255
CIN: L24231PN1992PLC067126

**Extract of unaudited Consolidated Financial Results for the Quarter and Half Year ended 30th September 2025 [(Regulation 47(1)(b) of the SEBI (Listing Obligations and Disclosure Requirements) Regulations, 2015]**

(Rs. in lakhs),except Earnings Per Share)

| Sr. No. | Particulars | Consolidated | | |
|---|---|---|---|---|
| | | Quarter ended Sept. 30, 2025 | Half Year ended Sept. 30, 2025 | Quarter ended Sept. 30, 2024 |
| | | (Unaudited) | (Unaudited) | (Unaudited) |
| 1. | **Revenue From Operations** | **19,818.27** | **39,318.60** | **22,506.65** |
| 2. | Profit Before Exceptional Item & Tax | 874.72 | 3,596.48 | 1,966.94 |
| 3. | Profit Before Tax | 1,824.41 | 4,546.17 | 1,966.94 |
| 4. | Profit for the Period | 1,316.26 | 3,197.89 | 840.18 |
| 5. | Total Comprehensive Income/(loss) (after tax) | 2,584.93 | 3,979.41 | 696.14 |
| 6. | Paid up Equity Share Capital (Equity Share of 10/- each) | 9,498.58 | 9,498.58 | 9,498.58 |
| 7. | Earnings per share (of Rs.10/- each) | - | | |
| | Basic : | 1.39 | 3.37 | 0.89 |
| | Diluted : | 1.39 | 3.37 | 0.89 |

**Notes:**

1. The above financial results for the quarter and half year ended September 30, 2025 have been reviewed and approved by the Audit Committee and the Board of Directors of the Holding Company at the meeting held on November 11, 2025. The financial results are subjected to limited review by the statutory auditors of the Group and have issued unmodified opinion on the same.
2. The above is an extract of the detailed format of Quarterly Financial Results filed with the Stock Exchanges under Regulation 33 of the Securities and Exchange Board of India ('SEBI') (Listing Obligations and Disclosure Requirements ('LODR')) Regulations, 2015. The full format of the unaudited Standalone & Consolidated Financial Results of the Company are available on the Stock Exchange's website **(www.bseindia.com and www.nseindia.com)** and also on the Company's website - **www.pclindia.in.**
3. These Financial Results have been prepared in accordance with Indian Accounting Standards ("Ind AS") prescribed under Section 133 of the Companies Act, 2013 read with relevant rules issued there under and in terms of Regulation 33 of SEBI (Listing Obligations and Disclosure Requirements) Regulations, 2015 read with SEBI circular no. CIR/CFD/FAC/62/2016 dated 5th July, 2016.
4. Key Standalone Financial information.

(Rs. in Lakhs)

| Sr. No. | Particulars | Standalone | | |
|---|---|---|---|---|
| | | Quarter ended Sept.. 30, 2025 | Half Year ended Sept. 30, 2025 | Quarter ended Seot. 30, 2024 |
| | | (Unaudited) | (Unaudited) | (Unaudited) |
| 1 . | **Revenue From Operations** | **14,046.56** | **27,716.63** | **16,789.36** |
| | Profit Before Exceptional Item and Tax | 1,211.35 | 4,606.97 | 2,937.68 |
| | Profit Before Tax | -3,764.60 | -368.98 | 2,937.68 |
| | Profit for the period/Year | -4,265.00 | -1,702.16 | 1,836.32 |
| 2. | Total Comprehensive Income (after tax) for the period | -4,261.76 | -1,695.68 | 1,843.33 |

**Place : Pune**
**Date : November 13, 2025**

**For and on behalf of the Board of Directors**
**Sd/-**
**Ravindra R. Joshi**
**Whole-time Director & CFO**

CMYK
सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



## महत्त्वाचे



राष्ट्रीय टेबल टेनिस स्पर्धेत

### बार्शीच्या राजवर्धन तिवारीस कांस्य पदक

**बार्शी, दि. १२ नोव्हेंबर-**

पंचकुला (हरियाणा) येथे झालेल्या बार्शी टेबल टेनिस अकॅडमीचा छोटा चॅम्पियन राजवर्धन विजयकुमार तिवारीने राष्ट्रीय मानांकन टेबल टेनिस स्पर्धेत कांस्य पदकांची कमाई केली. राजवर्धनने यंदा दुसऱ्यांदा राष्ट्रीय स्तरावर पदक जिंकण्याची कामगिरी बजावली आहे. तो येथील सेंट जोसेफ शाळेत तिसरीत शिकत असून, निवृत्त नेव्ही अधिकारी विजयकुमार तिवारी यांचा मुलगा आहे. गत साडेतीन वर्षांपासून अखंड सराव, शिस्त आणि जिद्दीच्या जोरावर राजवर्धन सतत प्रगती करत आहे. त्याचे प्रशिक्षण कॉमनवेल्थ टेबल टेनिस फेडरेशन सर्टिफाईड कोच गणेश स्वामी यांच्या मार्गदर्शनाखाली रोटरी क्लब, सुभाषनगर बार्शी टेबल टेनिस अकॅडमी येथे सुरू आहे. इनडोअर सुविधांचा अभाव असूनही, मेहनत आणि इच्छाशक्तीच्या जोरावर त्याने ही भरारी घेतली आहे. राजवर्धनच्या या उल्लेखनीय यशाबद्दल सोलापूर जिल्हा टेबल टेनिस असोसिएशनचे अध्यक्ष राजीव प्रधान व सचिव झेड. एम. पुणेकर यांनी अभिनंदन केले आहे.

### आर्या सावंतची विभागीय फुटबॉल चाचणीसाठी निवड

**पंढरपूर, दि. १२ नोव्हेंबर-**


येथे नुकत्याच झालेल्या जिल्हास्तरीय फुटबॉल स्पर्धेमध्ये वाखरी, पंढरपूर येथील एमआयटी विश्वशांती गुरुकुल स्कूलची विद्यार्थिनी आर्या सावंत हिची १३ वर्षाखालील गटात विभागीय चाचणीसाठी निवड झाली. आर्याला प्रशिक्षक कविता कटारिया यांचे मार्गदर्शन लाभले. तिचे प्राचार्य शिवाजी गवळी यांनी अभिनंदन करून शुभेच्छा दिल्या.



### विभागीय रोलर स्केटिंग स्पर्धेत सुयश सेंट्रल स्कूलचा असित कांबळे द्वितीय

**सोलापूर, दि. १२ नोव्हेंबर-**

पुणे विभागीय शालेय रोलर स्केटिंग स्पर्धेत सुयश सेंट्रल स्कूलचा स्केटर असित कांबळे हा ११ वर्षांखालील गटात द्वितीय आला. श्री शिवछत्रपती शिवाजी महाराज क्रीडा संकुल, बालेवाडी आणि इंटरनॅशनल स्केटिंग रिंक विमान नगर पुणे येथे ही स्पर्धा पार पडली. त्यास क्रीडा शिक्षक नितीन खांडेकर, सागर राठोड व सिद्ध सुतार यांचे मार्गदर्शन लाभले. त्यांचे मुख्याध्यापिका विद्या शिंदे, संस्थापक केशव शिंदे, वृषाली शिंदे व सुयश शिंदे यांनी अभिनंदन केले.



### कुमठे प्रशालेचा आरमान शेख राज्य मैदानी स्पर्धेत पाच किमी चालण्याच्या शर्यतीत तृतीय

**सोलापूर, दि. १२ नोव्हेंबर-**

रत्नागिरी येथे झालेल्या राज्य मैदानी स्पर्धेमध्ये कुमठे प्रशालेचा आरमान अशपाक शेख याने पाच किलोमीटर चालण्याच्या शर्यतीत तृतीय स्थान मिळविले. त्यास मार्गदर्शक शिक्षक विक्रम पवार व क्रीडा शिक्षक संजय घोडके यांचे मार्गदर्शन लाभले. त्यांचे संस्थेचे विश्वस्त जयकुमार माने, स्वातीताई माने, मुख्याध्यापक जयसिंग गायकवाड, पर्यवेक्षक वसंत गुंगे यांनी अभिनंदन करून पुढील स्पर्धेस शुभेच्छा दिल्या.



दक्षिण आफ्रिकेविरुद्ध पहिली कसोटी

# नितीश रेड्डीऐवजी ध्रुव जुरेल खेळणार



**◆ कोलकाता, १२ नोव्हेंबर**

भारतीय संघात स्थान मिळवणारा यष्टिरक्षक-फलंदाज ध्रुव जुरेल दक्षिण आफ्रिकेविरुद्धच्या पहिल्या कसोटीत खेळणार असून अष्टपैलू नितीश रेड्डी बाहेर राहण्याची शक्यता आहे, असे भारताचे सहायक रायन टेन डोइशाटे यांनी बुधवारी सांगितले. पहिली कसोटी शुक्रवारपासून येथे सुरू होत आहे.

आम्हाला संघाची चांगली कल्पना आहे. गत सहा महिन्यांत ध्रुव ज्या पद्धतीने खेळला, ते कौतुकास्पद आहे. त्याने गत आठवड्यात बंगळुरूमध्ये दक्षिण आफ्रिका अ संघाविरुद्ध दोन शतके झळकावली आहेत. तो या आठवड्यात खेळेल हे निश्चित आहे, असे टेन डोइशाटे यांनी सांगितले.

मुख्य गोष्ट म्हणजे सामना जिंकण्यासाठी रणनीती आखणे. नितीशबद्दलची आमची भूमिका निश्चितच बदललेली नाही. त्याला ऑस्ट्रेलियामध्ये जास्त वेळ मिळाला नाही.

या मालिकेचे महत्त्व व ज्या परिस्थितीचा आपल्याला सामना करावा लागणार आहे ते पाहता नितीश कुमार रेड्डी या आठवड्यात या कसोटीत खेळू शकणार नाही, असे ते म्हणाले. यष्टिरक्षकाची जागा तंदुरुस्त झालेल्या ऋषभ पंतकडे आहे, त्यामुळे ध्रुव जुरेलला शुद्ध फलंदाज म्हणून संधी मिळेल.घरच्या हंगामाच्या सुरुवातीपासून जुरेलच्या धावांचा क्रम १४०, १ आणि ५६, १२५, ४४ आणि ६, १३२ आणि १२७ असा आहे.

गत आठ प्रथम श्रेणी सामन्यांमध्ये एक कसोटी शतक, एक अर्धशतक आणि एक ४० पेक्षा जास्त धावा अशा तीन शतकांसह, जुरेलकडे दुर्लक्ष करता येणार नाही.

◂(वृत्तसंस्था)

## आम्ही इतिहास घडवू शकतो : शुक्री कॉनराड

**◆ कोलकाता, १२ नोव्हेंबर**



आम्ही इतिहास घडवू शकतो, यावर माझा विश्वास आहे, असे दक्षिण आफ्रिका संघाचे मुख्य प्रशिक्षक शुक्री कॉनराड म्हणाले.

आगामी कसोटी मालिकेत भारताच्या अनुभवी खेळाडूंशी दोन हात करण्यासाठी ते केशव महाराज, सेनुरन मुथुसामी आणि सायमन हार्मर या आपल्या फिरकी गोलंदाजांना प्रोत्साहित करीत आहेत. त्यांनी भारताविरुद्धच्या कसोटी सामन्याची तुलना जागतिक कसोटी अजिंक्यपद स्पर्धेतील ऑस्ट्रेलियाविरुद्धच्या अंतिम सामन्याशी केली. त्यांनी आयसीसी स्पर्धेत दुर्मिळ गौरवासाठी विजय मिळवला.

शुक्रवारपासून ईडन गार्डन्स येथे होणाऱ्या मालिकेच्या पहिल्या कसोटी सामन्यानंतर, गुवाहाटी २२ नोव्हेंबरपासून आपला दुसरा कसोटी सामना खेळणार आहे. दक्षिण आफ्रिकेचे फिरकी गोलंदाज अलीकडेच पाकिस्तानमध्ये दाखवलेला त्यांचा चांगला फॉर्म भारतातही आणण्याचा प्रयत्न करतील.

आमच्या संघात चांगले फिरकी गोलंदाज आहे, त्यामुळेसामन्याची रोमांचकता वाढली आहे व आम्हालाही खूप आत्मविश्वास मिळतो, असे कॉनराड बुधवारी पत्रकार परिषदेत म्हणाले.

पूर्वी आमच्याकडे चांगले फिरकीपटू नव्हते असे म्हणत नाही, पण आता केशव, सायमन आणि सेन यांच्या रूपात आमच्याकडे चांगले फिरकीपटू आहेत.जर परिस्थिती अनुकूल असेल तर आमच्याकडे भारताला आव्हान देण्यासाठी प्रभावी गोलंदाज आहेत, त्यामुळे आम्हाला खूप आत्मविश्वास मिळतो, असेही ते म्हणाले. आम्ही ईडन गार्डन्स आणि भारतात आमचा स्वतःचा इतिहास घडवू शकतो, असा विश्वासही त्यांनी व्यक्त केला.

हो, आम्ही जागतिक कसोटी अजिंक्यपद स्पर्धेचा ऑस्ट्रेलियाविरुद्धचा अंतिम सामना जिंकला होता,मी या मालिकेची व या सामन्याची तुलना त्या अंतिम सामन्याशी करतो, असेही ते म्हणाले.

कॉनराड यांना भारतासारख्या मजबूत प्रतिस्पर्ध्याशी त्यांच्याच भूमीवर खेळण्याचे महत्त्व समजते.

भारताकडे पहा, जगात आव्हान कठीण आहे आणि जेव्हा तुम्ही ईडन गार्डन्ससारख्या प्रतिष्ठित ठिकाणी येता तेव्हा ते आणखी कठीण होते. पाकिस्तानविरुद्ध खेळलेल्या संघांच्या गुणवत्तेची तुलना भारताशी करू शकता आणि हे आमचे सर्वात मोठे आव्हान असेल, असे ते शेवटी म्हणाले. ◂(वृत्तसंस्था)

# पाच भारतीय पुढील फेरीसाठी शर्यतीत



अर्जुन एरिगासी व आर. प्रज्ञानंद

### फिडे बुद्धिबळ विश्वचषक

**◆ पणजी, १२ नोव्हेंबर**

येथे सुरु असलेल्या फिडे बुद्धिबळ विश्वचषक स्पर्धेत सर्व भारतीय स्पर्धकांनी चौथ्या फेरीतील लढती बरोबरीत राखल्या. संभाव्य १६ पैकी केवळ दोन निर्णायक डाव झाले. आर्मेनियन-अमेरिकन लेव्हॉन अॅरोनियनने पोलंडच्या रॅडोस्लाव्ह वोज्टास्झेकचा पराभव केला, तर जोस मार्टिनेझने स्लोव्हेनियाच्या अॅलेक्सी सरनाला पराभूत केले.

३२ पैकी केवळ पाच भारतीय विजयाच्या शोधात राहिले. ग्रॅण्डमास्टर अर्जुन एरिगाईसीने पहिला गेम बरोबरीत सोडवला आणि तो यादीत आघाडीवर आहे. त्याला अद्याप कठीण दिवस सहन करावा लागलेला नाही. चौथ्या फेरीच्या पहिल्या डावांत अर्जुनला पांढऱ्या सोंगट्यांसह पीटर लेकोविरुद्ध फारशा समस्यांना तोंड द्यावे लागले नाही.

आता परतीच्या सामन्यात भारतीय खेळाडू जोरदार पुनरागमन करण्याची शक्यता आहे. ग्रॅण्डमास्टर पी. हरिकृष्णने स्वीडनच्या निल्स ग्रॅण्डेलियसशीही बरोबरी साधली. डॅनिल दुबोव्ह व आर. प्रज्ञानंद यांच्यादरम्यानची लढतही बरोबरीत राहिली. ◂(वृत्तसंस्था)

# लक्ष्य सेनची आगेकूच

कुमामोटो मास्टर्स बॅडमिंटन

**◆ कुमामोटो, १२ नोव्हेंबर**

भारताच्या लक्ष्य सेनने बुधवारी येथे कोकी वातानाबेवर सरळ गेममध्ये विजय मिळवत कुमामोटो मास्टर्स जपान बॅडमिंटन स्पर्धेत पुरुष एकेरीच्या दुसऱ्या फेरीत प्रवेश केला.

येथे सातव्या मानांकित सेनने केवळ ३९ मिनिटांत त्याच्या जागतिक क्रमवारीत २६ व्या क्रमांकाच्या जपानी प्रतिस्पर्ध्याला २१-१२, २१-१६ असे हरवले. जागतिक क्रमवारीत १५ व्या क्रमांकाचा सेन पुढील सामना सिंगापूरच्या जिया हेंग जेसन तेह व कॅनडाच्या व्हिक्टर लाई यांच्यादरम्यानच्या सामन्यातील विजेत्याशी करणार आहे.



परंतु मलेशियाच्या जिंग हाँग कोककडून २०-२२, १०-२१ असा पराभव पत्करावा लागल्यानंतर आणखी एक भारतीय किरण जॉर्ज याची स्पर्धेतील घोडदौड थांबली.

रोहन कपूर आणि ऋत्विका शिवानी गड्डे या मिश्र दुहेरी जोडीनेही धाडसी झुंज दिली परंतु त्यांना पहिल्या फेरीतून बाहेर व्हावे लागले. भारतीय संघाला प्रेस्ली स्मिथ आणि जेनी गाई या अमेरिकन जोडीकडून १२-२१, २१-१९, २०-२२ असा पराभव पत्करावा लागला.

नंतर, एच. एस. प्रणॉयचा सामना मलेशियाच्या जुन हाओ लिओंगशी होईल, आयुष शेट्टीचा सामना चौथ्या मानांकित कोडाई नारावकाशी होईल, तर थरुन मन्नेपल्लीचा सामना कोरियाच्या ह्योक जिन जिओनशी होईल. ◂(वृत्तसंस्था)

# न्यूझीलंडविरुद्धच्या पराभवातून भारतीय खेळाडूंनी धडे गिरविले : टेड डोइशेट

**◆ कोलकाता, १२ नोव्हेंबर**

आमच्या फलंदाजांनी गत वर्षी न्यूझीलंडविरुद्धच्या घरच्या मैदानावर झालेल्या मालिकेतील पराभवातून धडा घेतला असेल, अशी आशा भारतीय संघाचे सहाय्यक प्रशिक्षक रायन टेन डोइशेट यांनी व्यक्त केली.

यजमान भारतीय संघ शुक्रवारपासून सुरू होणाऱ्या दोन कसोटी सामन्यांच्या मालिकेत फिरकीपटूंनी भरलेल्या दक्षिण आफ्रिकेविरुद्ध खेळण्यास सज्ज झाला आहे.

न्यूझीलंडविरुद्धच्या मालिकेतून आपण शिकलो आहोत अशी आशा आहे. फिरकी गोलंदाजांना कसे खेळवायचे याविरुद्ध आम्ही काही योजना आखल्या आहेत. या दोन सामन्यांमध्ये ते खूप महत्त्वाचे ठरणार आहे. विशेषतः चार आठवड्यांपूर्वी त्यांनी पाकिस्तानमध्ये किती चांगली कामगिरी केली, असे डोइशेट म्हणाले.

दक्षिण आफ्रिकेच्या पाकिस्तानमधील अलिकडच्या कसोटी मालिकेत केशव महाराज, सायमन हार्मर, सेनुरन मुथुसामी आणि प्रेनेलन सुब्रायन या फिरकीपटूंनी ३५ बळी घेत दोन सामन्यांची मालिका १-१ अशी बरोबरीत राखली.

त्यांच्याकडे चार (तीन) स्पेशालिस्ट फिरकी गोलंदाज आहेत. बहुधा ते तीन फिरकी गोलंदाज खेळवतील आणि ते उपखंडातील संघाविरुद्ध खेळण्यासारखे आहे, असे डोइशेट यांनी पहिल्या कसोटी सामन्यापूर्वी पत्रकारांशी बोलताना सांगितले.

दक्षिण आफ्रिकेतील संघ वेगवान आणि फिरकी गोलंदाजी दोन्ही बाबतीत संतुलित आहे.

जर कॅगिसो रबाडा व मार्को जानसेन वेगवान गोलंदाजी विभागाचे नेतृत्व करत असतील, तर त्यांच्याकडे महाराज, सायमन आणि मुथुसामी असे तीन तज्ज्ञ फिरकी गोलंदाज आहेत. हार्मर (१३), मुथुसामी (११) आणि महाराजने (९) दोन कसोटी सामन्यांमध्ये ३३ बळी घेतले. मुथुसामीने १०६ धावा सुद्धा केल्या आणि त्याला मालिकावीर म्हणून निवडण्यात आले.

भारताला गत वर्षी न्यूझीलंडविरुद्ध घरच्या मैदानावर ०-३ असा अभूतपूर्व पराभव सहन करावा लागला होता, त्यामुळे ही चिंता रास्त वाटते. अजाज पटेल (१५), मिशेल सँटनर (१३) आणि ग्लेन फिलिप्सने (८) एकूण ३६ बळी घेतल्याने ही घसरण मुख्यत्वे फिरकी गोलंदाजांविरुद्ध झाली. ◂(वृत्तसंस्था)

# कर्णधार बावुमाचा तंदुरुस्तीसाठी सराव

### दक्षिण आफ्रिकेला दमदार सुरुवातीची अपेक्षा

**◆ कोलकाता, १२ नोव्हेंबर**

दुखापतीतून पुनरागमन करणारा कर्णधार टेम्बा बावुमाने शुक्रवारपासून भारताविरुद्ध सुरू होणाऱ्या पहिल्या कसोटी सामन्यापूर्वी बुधवारी सकाळी ईडन गार्डन्सवर दक्षिण आफ्रिकेचे प्रशिक्षक, फिजिओ आणि मुख्य प्रशिक्षक शुक्री कॉनराड यांच्या देखरेखीखाली फिटनेस ड्रिल केले.

या ड्रिलमध्ये तीन मार्कर कोनमध्ये लहान स्प्रिंट होते आणि सुमारे २० मिनिटे चालले. त्याचे सहकारी नेट सेशनमध्ये व्यस्त असताना, बावुमाने धावण्याचा दिनक्रम पूर्ण केला आणि नंतर नेटमध्ये सहभागी झाला.

सप्टेंबरमध्ये इंग्लंडमध्ये झालेल्या दुखापतीमुळे दक्षिण आफ्रिकेच्या जागतिक कसोटी अजिंक्यपदाच्या बचाव सामन्यात पाकिस्तानविरुद्ध सुरुवात करू न शकलेला बावुमा गत आठवड्यात बंगळुरूमध्ये भारत अ विरुद्धच्या दुसऱ्या अनधिकृत कसोटी सामन्यात पुनरागमन केले.

पहिल्या चेंडूवर शून्य धावा काढल्यानंतर त्याने दुसऱ्या डावात १०१ चेंडूत ५९ धावा केल्या आणि दक्षिण आफ्रिका अ संघाला पाच गड्यांनी विजय मिळवून दिला.

तो डेव्हाल्ड ब्रेव्हिसची जागा घेईल अशी अपेक्षा कॉनराडने बावुमाचे संघाचा प्रमुख खेळाडू म्हणून कौतुक केले आणि म्हटले की त्याच्याशिवाय पाकिस्तानमध्ये त्यांची मालिका अनिर्णित राहणे हे एक मोठे प्रोत्साहन होते.

टेम्बा आमच्यासाठी मोठा खेळाडू आहे, तो आमचा सर्वोत्तम खेळाडू आहे. पाकिस्तानमध्ये कसोटी सामना जिंकणे आमच्यासाठी चांगले होते. आम्ही आमच्या सर्वोत्तम खेळाडूशिवाय ते करू शकलो, असे कॉनराड म्हणाले.

खूप चांगले वाटते, खूप आत्मविश्वास वाढला. जर तुम्ही गेल्या दोन वर्षांचा विचार केला तर कदाचित तो जगातील सर्वोत्तम खेळाडूंपैकी एक आहे. तो फलंदाजी विभागाचे नेतृत्व उत्तम करतो, त्यामुळे आम्हाला खूप आनंद मिळतो आणि तो नक्कीच खूप आत्मविश्वास आणतो. त्याने अ सामन्यात जितक्या चांगल्या प्रकारे खेळ केला तितक्या चांगल्या पद्धतीने तो खेळला, असे कॉनराड म्हणाला.

ट्रिस्टन स्टब्सने उत्तम फलंदाजी व फिरकी गोलंदाजी केली, त्यामुळे केशव महाराज, सायमन हार्मर आणि सेनुरन मुथुसामी यांना पूरक म्हणून अतिरिक्त फिरकीचा पर्याय मिळाला. त्यांनी दक्षिण आफ्रिकेला पाकिस्तानमध्ये १-१ असा बरोबरी साधण्यात महत्त्वाची भूमिका बजावली.

वेगवान गोलंदाज कॅगिसो रबाडाने हलकासा सराव केला, तर या हंगामात मुंबई इंडियन्ससोबत प्रथम श्रेणी शतक आणि आयपीएल पदार्पणाचा

### भारतीय तिरंदाज मिश्र कम्पाऊंडच्या अंतिम फेरीत

**◆ ढाका, १२ नोव्हेंबर**

बुधवारी येथे झालेल्या आशियाई तिरंदाजी अजिंक्यपद स्पर्धेत भारताची पदकांची लाट कायम राहिली. अभिषेक वर्मा व दीपशिखा यांच्या मिश्र कम्पाऊंड संघाने अंतिम फेरीत धडक मारली, तर रिकर्व्ह तिरंदाजांनी कांस्य प्लेऑफमध्ये प्रवेश केल्यानंतर पदकांच्या शर्यतीत कायम राहिले.

दुसऱ्या मानांकित भारतीय कम्पाऊंड जोडीने एकतर्फी उपांत्य फेरीत कझाकस्तानचा १५६-१५३ असा पराभव करून आणखी एक पदक निश्चित केले. त्यांचा सामना यजमान बांगलादेशशी होईल. बांगलादेशने दक्षिण कोरियाला १५८-१५३ असा पराभव केला होता. या स्पर्धेत भारताचे सलग दुसरे मिश्र कम्पाऊंड संघ सुवर्णपदक जिंकण्याची त्यांची इच्छा आहे. आदिती स्वामी आणि प्रियांश या जोडीने बँकॉक २०२३ च्या आवृत्तीत मिश्रित जोडीचे सुवर्णपदक जिंकले होते. ◂(वृत्तसंस्था)

# श्रीलंका संघाची सुरक्षा वाढविली

**◆ रावळपिंडी, १२ नोव्हेंबर**

इस्लामाबाद आणि वाना येथे झालेल्या दहशतवादी हल्ल्यांनंतर श्रीलंका क्रिकेट संघाची सुरक्षा वाढवण्यात आली आहे. रावळपिंडीमध्ये तीन एकदिवसीय सामने खेळल्यानंतर श्रीलंका १७ ते २९ नोव्हेंबर दरम्यान झिम्बाब्वेसह होणाऱ्या टी-२० तिरंगी मालिकेत भाग घेणार आहे.

दौऱ्यावर येणाऱ्या खेळाडूंना 'राज्य पाहुणे' म्हणून सन्मान केला जाईल असे आश्वासन श्रीलंकेचे उच्चायुक्तांना दिले आहे.

श्रीलंका संघाच्या सुरक्षेच्या मुद्यावर श्रीलंकेचे उच्चायुक्त, अॅडमिरल (निवृत्त) फ्रेड सेनेविरत्ने, पाकिस्तान क्रिकेट मंडळाचे अध्यक्ष मोहसीन नक्वी व इस्लामाबादमधील सरकारी अधिकाऱ्यांमध्ये बैठक झाली. नक्वी हे गृहमंत्री सुद्धा आहे, त्यांनी यापूर्वी श्रीलंकेच्या संघाच्या अधिकाऱ्यांची भेट घेतली होती व त्यांना पूर्ण सुरक्षेचे आश्वासन दिले होते.

पाकिस्तान सैन्य व निमलष्करी दलांसह सुरक्षा वाढवण्यात आली



असून त्यांना पाहुण्या खेळाडू व अधिकाऱ्यांवर लक्ष ठेवण्यासाठी तैनात करण्यात आले आहे, असे सूत्रांनी सांगितले. पाहुण्या संघाचे खेळाडू आणि अधिकारी पाकिस्तानमध्ये राज्य पाहुणे आहेत, त्यांच्या सुरक्षेसाठी चोख बंदोबस्त करण्यात आला आहे, असे नक्वी यांनी सिरीविरत्ने यांना सांगितले.

पाकिस्तानने दहशतवादी हल्ल्यांसाठी तहरीक-ए-तालिबान पाकिस्तानला (टीटीपी) जबाबदार धरले आहे.

मंगळवारी इस्लामाबादमधील न्यायालयीन संकुलाबाहेर एका आत्मघातकी हल्लेखोराने स्वतःला उडवून दिले व यामध्ये १२ जणांचा मृत्यू झाला आणि अनेक जण जखमी झाले, तर उत्तर पाकिस्तानच्या वाना भागात वाना कॅडेट कॉलेजवर होणारा दहशतवादी हल्ला सुरक्षा दलांनी उधळून लावला आणि सुमारे ३०० विद्यार्थ्यांना सुरक्षितपणे बाहेर काढण्यात आले. तीन वर्षांपूर्वी न्यूझीलंड संघाने रावळपिंडी येथे मालिका रद्द केली आणि पाहुण्यांना लक्ष्य करून दहशतवादी हल्ल्याची विश्वसनीय गुप्तचर माहिती मिळाल्यानंतर सामना न खेळताच घरी परतला. ◂(वृत्तसंस्था)




# इंग्लिश स्कूलच्या खो-खो संघाचा सन्मान

**तभा वृत्तसेवा,**
**वेळापूर, दि. १२ नोव्हेंबर-**

पुणे विभागीय स्पर्धेतील कामगिरीमुळे येथील इंग्लिश स्कूल वेळापूर प्रशालेतील १७ वर्ष मुले व १९ वर्ष मुली व मुले खोखो संघातील सर्व खेळाडूंचा सन्मान स्कूल कमिटी चेअरमन प्रतापराव पाटील, शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष दिलीपराव जगदाळे यांच्या हस्ते करण्यात आला.

यावेळी सतिश कदम यांना पुरस्कार मिळाल्याबद्दल तसेच शिवाजी जाधव यांचा सुयश मिळवलेले खो खो खेळाडू यांचाही सन्मान करण्यात आला. या वेळी शाळा व्यवस्थापन समितीच्या उपाध्यक्षा प्रियंका पोरे, प्राचार्य रमेश पवार, उपमुख्याध्यापक पठाण शिवशरण, पर्यवेक्षक बापूसाहेब सावळे आदी उपस्थित होते. कार्यक्रमाचे सुत्रसंचालन सौ. रामगडे व रुपाली बाबर यांनी केले. नामदेव बावचे यांनी आभार मानले.

# संगमेश्वर कॉलेजच्या पाच खेळाडूंना अजिंक्यपद

किकबॉक्सिंग स्पर्धेतील कामगिरी

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १२ नोव्हेंबर-**

शालेय शहर किकबॉक्सिंग स्पर्धेत संगमेश्वर कनिष्ठ महाविद्यालयाच्या ५ खेळाडूंनी विविध गटांमध्ये अजिंक्यपद पटकाविले. या खेळाडूंना शारीरिक शिक्षण संचालक डॉ. आनंद चव्हाण, शारीरिक शिक्षण शिक्षक प्रा. संतोष खेंडे, प्रा. विक्रांत विभुते, प्रा.शरणबसवेश्वर वांगी यांचे मार्गदर्शन लाभले.

त्यांचे श्री संगमेश्वर एज्युकेशन सोसायटीचे चेअरमन धर्मराज काडादी, सचिव ज्योती काडादी, प्राचार्य डॉ. ऋतुराज बुवा, उपप्राचार्य प्रसाद कुंटे आदींनी अभिनंदन केले. **कामगिरी**



: सुवर्ण : श्रावण वालीकर (४८ किलो), संगमेश्वर शिरोळकर (६५ किलो), नक्षत्रा भोसले (४५ किलो), आनंदी सांगमठ (४८ किलो), संस्कृती अंजीखाने (५१ किलो).

CMYK

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

सोलापूर तरुण भारत

https://epaper.dainiktarunbharat.com/



## महत्वाचे...



### मनपा प्रशासनाधिकारी मल्हारी माने यांचा राज्य प्राथमिक शिक्षक संघातर्फे सत्कार

**सोलापूर, दि. १२ नोव्हेंबर-**

मनपा प्राथमिक शिक्षण विभाग, सोलापूर येथे नुकतेच पदोन्नतीने माननीय मल्हारी माने यांनी प्रशासनाधिकारी म्हणून पदभार स्वीकारला आहे. श्री. माने हे मूळचे धाराशिव जिल्ह्यातील असून, यापूर्वी त्यांनी तुळजापूर येथे उपशिक्षणाधिकारी म्हणून यशस्वीपणे कार्यभार सांभाळला आहे. त्यांच्या कार्यकाळात त्यांनी शैक्षणिक प्रशासनात पारदर्शकता, शिक्षकवर्गातील समन्वय आणि विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक गुणवत्तेकडे विशेष लक्ष केंद्रित केले होते. पदोन्नतीनंतर सोलापूर मनपा शिक्षण विभागात रुजू होताच, महाराष्ट्र राज्य प्राथमिक शिक्षक संघ यांच्या वतीने त्यांचा स्वागत सत्कार करण्यात आला.या प्रसंगी शिक्षक संघाचे पदाधिकारी, शिक्षकवर्ग आणि शिक्षण विभागातील अधिकारी उपस्थित होते.कर्तव्यदक्ष, नियोजनबद्ध आणि शिक्षकहितासाठी नेहमी तत्पर अधिकारी म्हणून श्री. माने यांची ओळख आहे. मनपा शाळांमधील पट वाढीसाठी तसेच शैक्षणिक गुणवत्ता वाढविण्यासाठी त्यांनी विशेष लक्ष केंद्रित केले असून, शाळांचा दर्जा उंचावण्यासाठी ठोस पावले उचलण्याचा त्यांचा संकल्प आहे.



### नगरपालिका नगरपंचायत निवडणुकीच्या संदर्भात काँग्रेसची मुंबईत आढावा बैठक

**सोलापूर, दि. १२ नोव्हेंबर-**

काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ, माजी केंद्रीय गृहमंत्री सुशीलकुमार शिंदे, खासदार प्रणिती शिंदे, जिल्ह्याचे प्रभारी मोहन जोशी, सहप्रभारी के. संदीप यांच्या आदेशानुसार सोलापूर जिल्ह्यातील तालुका निहाय नगरपालिका व नगरपंचायत निवडणूकीसाठी इच्छुक उमेदवारांच्या मुलाखती घेण्यात आल्या होत्या. त्याची माहिती महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीत सर्व जिल्ह्यांच्या आढावा बैठकीमध्ये टिळक भवन मुंबई येथे जिल्हाध्यक्ष सातलिंग शटगार यांनी प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांना दिली. यावेळी माजी गृहराज्यमंत्री सतेज पाटील, माजी विधान परिषद सदस्य रामहरी रुपनर, आमदार अमित देशमुख, नशीब खान, विश्वजीत कदम, माजी शिक्षण मंत्री वसंतराव पुरके उपस्थित होते. जिल्ह्याच्या सर्व नगरपालिका व नगरपालिका इच्छुक उमेदवारांच्या बाबतीत जिल्हाध्यक्ष सातलिंग शटगार यांनी माहिती दिली. ज्या ठिकाणी आघाडी आहे, त्या ठिकाणी आघाडीने लढायचे आणि काही ठिकाणी स्वबळाने लढायचे असे आदेश प्रदेशाध्यक्षांनी दिले. खासदार प्रणिती शिंदे यांच्या नेतृत्वाखाली जिल्ह्यातील सर्व निवडणूका पार पाडणार असल्याचे जिल्हाध्यक्ष शटगार यांनी सांगितले.

### संभाजी ब्रिगेडचे कार्य सतत चालू राहिले पाहिजे : विभागीय अध्यक्ष सुनील पालसकर

**सोलापूर, दि. १२ नोव्हेंबर-**

कुठल्याही सामाजिक आंदोलनात कोणीही मागे राहू नका, संभाजी ब्रिगेडचे कार्य हे सतत चालू राहिलं पाहिजे. त्यासाठी मी कायम तुमच्या पाठीमागे आहे, असा विश्वास संभाजी ब्रिगेड सामाजिक संघटनेचे विभागीय अध्यक्ष सुनील पासलकर यांनी व्यक्त केला. सोलापूर जिल्हा व शहर पदाधिकाऱ्यांचा गौरवप्रसंगी ते बोलत होते. संघटनेची आढावा बैठक प्रदेश संघटक दीपक वाडदेकर व प्रदेश संघटक प्रदीप कणसे यांच्या प्रमुख उपस्थितीत पासलकर यांच्या अध्यक्षतेखाली झाली. यावेळी संभाजी भोसले, शिरीष जगदाळे, मीनलदास, अँड गणेश कदम, मनीषा कोळी, शेखर भोसले, सिद्धराम सावळे आदी पदाधिकारी उपस्थित होते.

## निधन वृत्त...

### मल्लिनाथ बिराजदार



**अक्कलकोट, दि. १२ नोव्हेंबर-**

येथील प्रसिद्ध छोटु गॅरेजचे मालक मल्लिनाथ जगन्नाथ बिराजदार (वय ५५) यांचे निधन झाले आहे. त्यांच्या पश्चात आई, वडील, भाऊ, पत्नी, दोन मुली, एक मुलगा असा परिवार आहे. मल्लिनाथ बिराजदार यांचे बुधवार दि. १२ रोजी दुपारी निधन झाले असून गुरुवार दि.१३ रोजी सकाळी १० वाजता उकळे गल्ली येथील त्यांच्या राहत्या घरापासून अंत्ययात्रा निघणार आहे.

### शांताबाई सालीमठ



**सोलापूर, दि. १२ नोव्हेंबर-**

दुधनी येथील शांताबाई गुरुमोर्तय्या सालीमठ ( वय ८६) यांचे निधन झाले. त्यांची अंत्ययात्रा गुरुवारी १३ नोव्हेंबर रोजी दुपारी १२.३० वाजता भाजीपाला मार्केट येथील निवासस्थानपासून निघून अंत्यसंस्कार मल्लय्या इरय्या पुराणिक यांच्या शेतात होणार आहेत. त्यांच्या पश्चात चार मुले, चार मुली, सुना, नातवंडे असा परिवार आहे. ते खेडगी विरक्त मठाचे मठाधीपती पूज्य श्री शिवबसवराजेंद्र महास्वामीजी यांच्या मातोश्री होत.

### चंद्रभागा कोंडूर



**सोलापूर, दि. १२ नोव्हेंबर-**

अक्कलकोट रोड गांधीनगर येथील रहिवासी श्रीमती चंद्रभागा बलराम कोंडूर (वय ७०) यांचे बुधवारी १२ नोव्हेंबर रोजी निधन झाले. त्यांच्या पश्चात दोन मुले, तीन मुली व नातवंडे असा परिवार आहे. त्यांची अंत्ययात्रा गुरुवारी १३ नोव्हेंबर रोजी सकाळी १० वाजता त्यांच्या निवासस्थानापासून निघणार आहे.

# पंढरपुरातील सराईत गुन्हेगार 'एमपीडीए' अंतर्गत स्थानबध्द

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि. १२ नोव्हेंबर-**

येथील शहर पोलीस ठाणे परिसरात गुन्हे करणारा सराईत गुन्हेगार तसेच धोकादायक व्यक्ती रोहित उध्दव कडलासकर (रा. व्यासनारायण झोपडपटटी, पंढरपुर) याला एक वर्षासाठी येरवडा कारागृहात स्थानबद्ध करण्यात आले आहे. त्याच्या विरोधात गंभीर शरीराविषयीचे गुन्हे करणे, अवैधरित्या वाळु चोरी करणे, ती विक्री करणे सोयीचे व्हावे या करीता दहशत माजवुन वाळुचे कारणावरून जिव घेणे हल्ले करणे तसेच पंढरपूर शहर व पंढरपूर शहरा लगतच्या परीसरातील लोकांना दमदाटी, मारहाण करून, गौण खनिज (वालु) चोरी करणे असे गुन्हे नोंद आहेत. त्याचेविरूध्द वरिष्ठ पोलीस निरीक्षक विश्वजीत घोडके यांनी महाराष्ट्र झोपडपट्टी दादा, हातभट्टी व औषधी द्रव्य विषयक गुन्हेगार व धोकादायक व्यक्ती, द्रकश्राव्य कलाकृतींचे विनापरवाना प्रदर्शन करणारे व्यक्ती, अत्यावश्यक वस्तूंचा काळाबाजार करणारे व्यक्ती, वाळू तस्कर यांच्या विघातक कृत्यांना आळा घालणे विषयीचा कायदा १९८१ (एम.पी.डी.ए) मधिल कलम ३(१) अन्वये स्थानबध्द करणेबाबतचा प्रस्ताव. पोलीस अधिक्षक , सोलापुर ग्रामीण यांचे मार्फतीने मा. जिल्हाधिकारी तथा जिल्हादंडाधिकारी कुमार आशिर्वाद सोलापुर यांना पाठविणेत आला होता. त्याअनुशंगाने स्थानबध्दतेचे कामकाज चालवुन जिल्हाधिकारी यांनी एम.पी. डी.ए कायदयांर्गत स्थानबध्दतेचे आदेश पारीत केलेने स्थानबध्द इसमास ताब्यात घेवुन येरवडा मध्यवर्ती कारागृह, पुणे येथे एक वर्षाकरीता स्थानबध्द करणेत आलेले आहे.

तसेच सध्या पंढरपुर शहरामध्ये आदर्श निवडणुक आचारसंहिता लागू असुन नगरपालिका निवडणुकीचे अनुशंगाने पंढरपूर शहरातील गुन्हेगारी पार्श्वभुमी असणारे गुन्हेगारांवर एम.पी.डी.ए. महाराष्ट्र पोलीस कायदा कलम ५५,५६,५७ व बीएनएसएस १६३(२) अन्वये तडीपार करणेचे कामकाज सुरू आहे तसेच बी.एन.एस.एस १२९ व १२६ प्रमाणे पंढरपुर शहर पोलीस ठाणेचे गुन्हे अभिलेखावरील जवळपास २०० गुन्हेगारांवर निवडणुक कालावधीमध्ये गुन्हेगारी कृत्य करू नये याकरीता त्यांचेवर परिणामकारक प्रतिबंधक कडक कारवाई करणेची प्रक्रिया चालू आहे. सदरची कामगीरी पोलीस अधिक्षक अतुल कुलकर्णी सो (भा.पो.से), अप्पर पोलीस अधिक्षक प्रितमकुमार यावलकर उपविभागीय पोलीस अधिकारी पंढरपूर विभाग, प्रशांत डगळे पोलीस निरीक्षक संजय जगताप, स्थानिक गुन्हे शाखा, वरिष्ठ पोलीस निरीक्षक पंढरपूर शहर पोलीस ठाणे विश्वजीत घोडके यांचे मार्गदर्शनाखाली गुन्हे प्रकटीकरण शाखेचे सपोनि आशिष कांबळे, कल्याण ढवणे, सचिन इंगळे तसेच सिरमा गोडसे, प्रसाद औटी, सचिन हॅबाडे, शहाजी मंडले अनिस शेख तसेच रतन जाधव यांनी केली आहे.

## १४ ते २० नोव्हेंबरपर्यंत बालकामगार प्रथा विरोधी सप्ताह

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १२ नोव्हेंबर-**



१४ नोव्हेंबर हा देशभर बालदिन म्हणून साजरा केला जातो. या विशेष दिनाचे औचित्य साधून सहाय्यक कामगार आयुक्त कार्यालय, सोलापूर यांच्यातर्फे बालकामगार प्रतिबंध करण्याच्या दृष्टीने १४ नोव्हेंबर २०२५ ते २० नोव्हेंबर २०२५ या कालावधीत बालकामगार प्रथा विरोधी सप्ताह साजरा करण्यात येणार आहे, अशी माहिती सहाय्यक कामगार आयुक्त निलेश येलगुंडे यांनी दिली आहे.

जिल्हा कृती दलामार्फत सोलापूर जिल्ह्यात, २० नोव्हेंबर २०२५ पर्यंत, कारखाने, आस्थापना, हॉटेल, गॅरेज आणि धोकादायक उद्योगांना भेटी देऊन बालकामगार प्रथा विरोधी मोहिम राबवली जाईल. या मोहिमेत पोस्टर चिकटविणे, बालकामगार विरोधी पत्रके वाटप करणे, आणि जनजागृती करणे यांचा समावेश असेल. कृती दलाची स्थापना करण्यात आली आहे. त्यांच्या मार्फत आस्थापनांची तपासणी करून बालकामगार आढळल्यास त्यांची मुक्तता केली जाईल आणि बालकामगार अधिनियम अंतर्गत कार्यवाही करण्यात येईल. बालकामगार आस्थापनांमध्ये ठेवणे कायद्याने गुन्हा असलेले आहे. त्यामुळे, १४ वर्षाखालील बालकामगार काम करत नाहीत याची हमी संबंधितांकडून घेतली जाईल.

हॉटेल असोसिएशन, दुकाने, व्यापारी संघटना, आणि औद्योगिक क्षेत्रातील मॅन्युफॅक्चरिंग असोसिएशन्ससह बैठका आयोजित करून, बाल व किशोरवयीन कामगार (प्रतिबंध व नियमन) अधिनियम, १९८६ मधील तरतुदींची माहिती देण्यात येईल. या बैठकींमधून सामुदायिक शपथ घेणे आणि हमी पत्र भरून घेणे यांचा समावेश असेल. सहाय्यक कामगार आयुक्त, निलेश येलगुंडे यांनी सर्वांना आवाहन केले आहे की, कारखाना, आस्थापना, हॉटेल, गॅरेज आणि धोकादायक उद्योगांमध्ये बालकामगार ठेवू नये.

## उपमुख्यमंत्री अजित पवारांनी राजीनामा द्यावा

## भीमशक्ती संघटनेच्यावतीने रास्तारोको

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १२ नोव्हेंबर-**

पार्थ पवार यांनी केलेल्या पुणे येथील महार वतन जमीन प्रकरणी उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी राजीनामा द्यावा या मागणीसाठी भीमशक्ती संघटनेच्यावतीने जुना पुना नाका येथे रास्ता रोको आंदोलन करण्यात आले. या सर्व प्रकरणांला पार्थ पवार हे कारणीभूत असून त्याची नैतिक जबादारी स्वीकारून अजित पवार यांनी मंत्रीपदाचा राजीनामा द्यावा अशी मागणी केली आहे.




यावेळी प्रदेश सरचिटणीस सुबोध वाघमोडे, प.म. सरचिटणीस राजा कदम, शहर अध्यक्ष उमेश सुरते, प्रदेश चिटणीस संजय रणदिवे, शहर कार्याध्यक्ष मनोज लोंढे, महिला शहर अध्यक्ष ज्योती गायकवाड, रमाबाई लालसरे, रुपाली कोळी, युवक अध्यक्ष मयूर तळभडारे, मेजर सुखदेव साबळे, सलीम मुल्ला, प्रकाश सीताफळे, चंद्रशेखर गायगावळी, सोमनाथ होतकर, कीर्ती शिवशरण, प्रकाश बनसोडे, राजा नागटिळक, अशोक नागटिळक, इब्राहिम शेख, रवी चंद्रकर, शशिकांत विरसूर, मिलिंद कांबळे, सचिन सुरवसे, अशोक व्होतकर, छाया इर्केरे, सतीश ढवरे उपस्थित होते.



## बेवारस वाहन हटाव मोहिमेत पाच वाहनांवर कारवाई; विविध तीन ठिकाणी राबवली मोहीम

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १२ नोव्हेंबर-**

महापालिका व पोलिसांच्या संयुक्त विद्यमाने बेवारस वाहन हटाव मोहिम सुरू झाली आहे. या मोहिमेंतर्गत बुधवारी विभागीय कार्यालय क्र. ८ हद्दीत पाच वाहनांवर कारवाई करण्यात आली.

महापालिका आयुक्त डॉ. सचिन ओम्बासे आणि पोलीस आयुक्त एम. राजकुमार यांच्या आदेशानुसार ही मोहीम सुरू आहे. शानदार चौक येथे उभे असलेले आयशर ट्रक जप्त करण्यात आले, तर गुरुनानक चौक पोस्ट ऑफिस, कुर्बान हुसेन नगर परिसरातील दोन रिक्षा उचलून दंडात्मक कारवाई करण्यात आली. भद्रावती पेठ आणि मोदी कब्रस्तान येथील चारचाकी वाहने त्यांच्या मालकांनी स्वतः काढून घेतली. ही कारवाई अतिरिक्त आयुक्त वीणा पवार यांच्या नियंत्रणाखाली महापालिका मुख्य सफाई अधीक्षक नागनाथ बिराजदार, सफाई अधिक्षक वाहन अनिल चारटे, आरोग्य निरीक्षण निरीक्षक व वाहतूक पोलिसांच्या संयुक्त टीममार्फत पार पडली.

सार्वजनिक रस्त्यावर दीर्घकाळ उभी ठेवलेली वाहने त्वरित हलवावीत, अन्यथा १० हजार दंड, टोविंग खर्च आणि लिलावाची कारवाई होईल, असा इशारा मनपाने दिला आहे.

## जैन गुरुकुलच्या शिबिरात १३५ जणांचे रक्तदान

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १२ नोव्हेंबर-**

श्रीमान भाऊसाहेब गांधी प्रतिष्ठान व श्री दिगंबर जैन गुरुकुल परिवार यांच्या संयुक्त विद्यमाने संस्थेचे भूतपूर्व सचिव स्व. श्रीमान भाऊसाहेब गांधी यांच्या जन्मशताब्दीचे औचित्य साधून आयोजित १९ वे रक्तदान शिबीर जैन गुरुकुल प्रशालेच्या प्रांगणात उत्साहात संपन्न झाले. यावेळी एकूण १३५ जणांनी रक्तदान केले.

या शिबिराचे उद्धाटन कार्यक्रमाचे अध्यक्ष तथा संस्थेचे मानद सचिव डॉ. रणजित गांधी व फौजदार चावडी पोलीस स्टेशनचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक महादेव राऊत यांच्या शुभहस्ते प्रतिमापूजन व दीपप्रज्वलनाने करण्यात आले. यावेळी डॉ. हेडगेवार रक्तपेढीचे सचिव मिलिंद फडके, एच.डी.एफ. सी. बँकेचे विजय पाटील, मुख्याध्यापक राजकुमार काळे, उपमुख्याध्यापक शैलेश पांगळ, पर्यवेक्षक प्रवीण कस्तुरे, प्राथ. विभागाच्या मुख्याध्यापिका पुष्पा झुंजुर्डे, बालकमंदिर विभाग प्रमुख विभावरी रणदिवे यांची प्रमुख उपस्थिती होती. या शिबिराच्या जनजागृतीसाठी प्रशालेतील विद्यार्थ्यांनी जनजागृती रॅली काढली. त्यांना कीडा विभागप्रमुख संजय पंडित, कीडा शिक्षक प्रसन्न काटकर, सुभाष उपासे यांनी मार्गदर्शन केले.

स्काऊट गाईडच्या उत्कृष्ट संचलनासाठी तृप्ती माणिकशेटे, रोहिता शहा, जितेंद्रकुमार डहाळे, आर्दींनी परिश्रम घेतले तर आर. एस.पी. स्वयंसेवकांनी मिलिंद खोबरे व तृप्ती दुर्गे यांच्या मार्गदर्शनाखाली रक्तदात्यांची सेवा केली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन पूजा काटकर यांनी केले. मिलिंद खोबरे यांनी आभार मानले.

## नगरसेवक पदासाठी दुधनीत चार तर अक्कलकोटमध्ये एक अर्ज दाखल

### मैंदर्गीमध्ये एकही अर्ज दाखल नाही

**तभा वृत्तसेवा**
**अक्कलकोट, दि. १२ नोव्हेंबर-**



दूधनी नगर पालिका नगरसेवक पदासाठी शिवसेना शिंदे गटाकडून चार जणांनी उमेदवार अर्ज दाखल केले असून अक्कलकोट येथे नगरसेवक पदासाठी भाजपा कडून एक अर्ज दाखल केले आहे. मैंदर्गी येथे आत्ता पर्यंत एकही अर्ज दाखल केले नाहीत.

अक्कलकोट भाजपकडून आरती उत्तम गायकवाड या प्रभाग क्र. ११ अ मध्ये नगरसेवक पदासाठी उमेदवारी अर्ज दाखल केल्या आहेत. दूधनी नगर पालिकासाठी शिवसेना कडून सुनंदा चिंचोली या प्रभाग क्र. ६ ब मध्ये, प्रभावती चंद्रकांत पावली या प्रभाग क्र.६ ब मध्ये, ऐश्वर्या सुरेश म्हेत्रे या प्रभाग क्र. ४ अ मध्ये, श्रीदेवी दत्तात्रय कोळी या प्रभाग क्र. १० मध्ये अर्ज दाखल केल्या आहेत. इच्छुकांची संख्या मोठ्या प्रमाणात आहे. परंतु अर्ज दाखल करण्याची पद्धत ऑनलाइन असल्याने ते दिसून येत नाही. अनेक इच्छुक उमेदवारांनी ऑफलाइन पद्धत असावी, अशी इच्छा व्यक्त केली आहे. ऑनलाइन भरण्यासाठी गेल्यानंतर सव्र्हर डाऊन, वीज जाणे असे प्कार सायबर कॅफेमध्ये दिसून येत आहेत. या समस्या असल्याने ऑफलाइन पद्धत चांगली असल्याचे मत अनेक इच्छुकांनी व्यक्त केले. नामनिर्देशन ऑनलाइन पद्धतीने भरून पीठासन अधिकाऱ्याकडे सादर करायचा आहे. राजकीय पक्षाच्या उमेदवाराला दोन सूचक तर अपक्ष उमेदवाराला पाच सूचक असणे आवश्यक आहेत. राखीव गटासाठी पाचशे रुपये तर सर्वसाधारण गटासाठी एक हजार रुपये इतकी अनामत रक्कम ठेवावी लागणार आहे. उमेदवारांनी शौचालय वापराचा दाखला, घरगुती कर, वीज बिल, पाणीपट्टी, टेलिफोन बिल इत्यादी करांची थकबाकी नसल्याचे प्रमाणपत्र सादर करणे बंधनकारक आहे. तसेच उमेदवाराची गुन्हेगारी पार्श्वभूमी नसावी, अशी अटही नमूद करण्यात आली आहे.

नगरपरिषदेच्या कार्यक्षेत्रात आचारसंहिता लागू झाली आहे. नगराध्यक्ष आणि नगरसेवक पदांसाठी नामनिर्देशन दाखल करण्याची मुदत १० ते १७ नोव्हेंबर अशी निश्चित करण्यात आली आहे. १८ नोव्हेंबर रोजी नगरपालिका सभागृहात प्रभागनिहाय अर्जाची छाननी होईल तर २१ नोव्हेंबर रोजी नामनिर्देशन माघार घेण्याची शेवटची तारीख राहील. त्यानंतर २४ नोव्हेंबर रोजी चिन्ह वाटप करण्यात येणार असून २ डिसेंबर रोजी सकाळी साडेसात ते सायंकाळी साडेपाच या वेळेत मतदान पार पडेल. ३ डिसेंबर रोजी मतमोजणी होऊन निकाल जाहीर केला जाईल.

## लातूर-कुर्डूवाडीमार्गे नांदेड-हडपसर रेल्वे धावणार

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. १२ नोव्हेंबर-**

रेल्वेने नांदेड आणि हडपसर दरम्यान विशेष गाड्या चालवण्याचा निर्णय घेतला आहे. यामध्ये नांदेड-हडपसर विशेष गाड्या ०७६०७ साप्ताहिक विशेष गाड्या दर मंगळवारी १८ आणि २५ नोव्हेंबर रोजी नांदेडहून सकाळी ०८:३० वाजता सुटतील आणि त्याच दिवशी रात्री ०९:४० वाजता हडपसर येथे पोहोचतील.

०७६०८ साप्ताहिक विशेष गाड्या दर मंगळवारी १८ आणि २५ नोव्हेंबर रोजी हडपसर येथून रात्री १०:५० वाजता सुटतील आणि दुसऱ्या दिवशी दुपारी १२:१५ वाजता नांदेड येथे पोहोचतील.



पूर्णा, परभणी, गंगाखेड, परळी वैजनाथ, लातूर रोड, लातूर, धाराशिव, बार्शी टाउन, कुर्डुवाडी आणि दौंड अशे थांबे असतील तर १ प्रथम वातानुकूलित, २ वातानुकूलित-II टियर, ६ वातानुकूलित थ्री टायर, १ वातानुकूलित हॉट बुफे कार, ६ स्लीपर क्लास, ४ सामान्य द्वितीय श्रेणी आणि २ सामानासह ब्रेक व्हॅन. २२ कोच अशी या रेल्वे गाड्यांची रचना असेल.

## ५४ मीटरच्या रस्त्याबाबत आयुक्तांची रेल्वे अधिकाऱ्यांसमवेत चर्चा

### शहरातील विविध विकास कामांची आयुक्तांकडून पाहणी

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. १२ नोव्हेंबर-**

साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे चौक रेल्वे ब्रिजचे पाडकाम होणार असल्याने रहदारी व वाहतुकील पर्यायी मार्ग म्हणून ५४ मीटरचा रस्ता सुरु करण्याबाबत महापालिका आयुक्त डॉ.सचिन ओम्बासे यांनी बुधवारी मध्य रेल्वे सोलापूरचे मंडल रेल प्रबंधक डॉ. सुजीत मिश्रा यांच्यासोबत सविस्तर चर्चा केली. दरम्यान महापालिका आयुक्तांनी शहरातील विविध विकास कामांची पाहणी करून आवश्यक सूचना दिल्या.

साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे चौक येथील रेल्वे ब्रिज पाडण्यात येणार आहे. या कामासाठी येथील रस्ता बंद ठेवण्यात येणार असल्याने या ठिकाणी पर्यायी मार्ग म्हणून ५४ मीटरचा रस्ता सुरु करण्यात येणार आहे. या संदर्भात महापालिका आयुक्त डॉ.सचिन ओम्बासे व मध्य रेल्वे सोलापूरचे मंडल रेल प्रबंधक डॉ. सुजीत मिश्रा यांच्यात सविस्तर चर्चा करण्यात आली. या चर्चेदरम्यान पर्यायी मार्ग त्वरित सुरू करण्याबाबत आयुक्त डॉ. ओम्बासे यांनी भर दिला. तसेच टिकेकरवाडी येथील रेल्वे स्टेशन विस्तारिकरण होणार असून त्या स्टेशन ला जोडणाऱ्या रस्ता परिसराला कुमठा गाव व होटगी रोडशी जोडणाऱ्या अप्रोच रोड संदर्भातही चर्चा करण्यात आली.

दरम्यान आयुक्तांनी ६ कमानी येथील नाल्याचे खोलीकरण आणि रुंदीकरणाच्या सुरू असलेल्या कामांची पाहणी केली. या कामामुळे परिसरातील पावसाचे पाणी नाल्यातून सहज प्रवाहित होईल आणि पाणी साचण्याची समस्या दूर होईल, असे त्यांनी सांगितले.

यानंतर स्मार्ट सिटी अंतर्गत विकसित व सध्या नागरिकांसाठी खुले केलेल्या एडवेंचर पार्कला भेट दिली. या ठिकाणी आयुक्तांनी पार्कमधील सुविधा, सुरक्षा व्यवस्था व देखभालीसंदर्भात तपासणी केली. तसेच पार्क परिसर अधिक आकर्षक व सुरक्षित ठेवण्यासाठी आवश्यक त्या सूचना संबंधित विभागाला दिल्या. त्यानंतर त्यांनी रंगभवन प्लाझा येथे पाहणी करून परिसरातील स्वच्छता, प्रकाशयोजना आणि सुशोभीकरणाच्या कामांची माहिती घेतली.

शेवटी समाचार चौक येथे सुरू असलेल्या सुशोभीकरणाच्या कामांची आयुक्तांनी पाहणी केली. या ठिकाणी सुंदर सीटिंग एरिया, गार्डन, लाईटिंग आदी सुविधा निर्माण करण्याचे काम सुरु असून, चौक आकर्षक व नागरिकांसाठी विश्रांतीयोग्य बनविण्याचे उद्दिष्ट असल्याचे त्यांनी नमूद केले.

या सर्व पाहणीदरम्यान आयुक्त डॉ. ओम्बासे यांनी सर्व अधिकाऱ्यांना कामे वेळेत आणि दर्जेदार पद्धतीने पूर्ण करण्याच्या सूचना दिल्या.त्या परिसरातील अतिक्रमण सुद्धा काढण्याचे सूचना दिल्या.यावेळी उपायुक्त आशिष लोकरे, रेल्वेचे अधिकारी एस. एच. मलभागे, योगेश पाटील, मंडल वाणिज्य प्रबंधक. ब्रजेश राय- व. मंडल परिचालन प्रबंधक. रामलाल प्यासे, भोसले,नगर अभियंता सारिका आकूलवार,अंतर्गत लेखा परीक्षक राहुल कुलकर्णी, उद्यान प्रमुख स्वप्नील सोलनकर,सागर कुरसेकर आदी उपस्थित होते.

# पंढरपुरातून धोकादायक पद्धतीने ऊस वाहतूक

## अवजड वाहतुकीस मनाई असताना शहरातून ऊस वाहतूक

## ना रिफ्लेक्टर, ना सुरक्षितता : बेशिस्त वाहतुकीमुळे अनेक अपघात

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि. १२ नोव्हेंबर-**

पंढरपूर तालुक्यात उसाचा गळीत हंगाम सुरू आला आहे. पंढरपूर शहरातून बंदी असूनही अवजड आणि गच्च भरलेल्या उसाच्या ट्रॉलीजची अत्यंत धोकादायक वाहतूक होत आहे. ही वाहतूक शहरवासीयांच्या जीवावर बेतत असल्याची शक्यता निर्माण झाली आहे.

पंढरपूर भागात आठ ते १० साखर कारखाने आहेत. रात्री अपरात्री निष्काळजीपणामुळे अपघात होण्याची शक्यता आहे. सध्या साखर कारखान्यांचा गळीत हंगाम सुरू असल्यामुळे बायपास रोड तसेच शहरातील सावरकर चौक, सरगम चौक, पुणे महामार्गावरून ऊस वाहतूक सुरू असून ट्रॅक्टरच्या चालक कर्कश आवाजात गाणी लावून वाहतूक करीत असल्याने त्यांना मागून आलेल्या वाहनाने वाजविलेल्या हॉर्नचा आवाज ऐकू येत नाही. यामुळे मोठा अपघात होण्याची शक्यता आहे. बेशिस्तपणे ही वाहतूक सुरु असल्याने त्यावर कारवाईची मागणी नागरिकांतून होत आहे. पंढरपूर तालुक्याच्या हद्दीत आठ ते दहा साखर कारखाने असल्याने मोठ्या प्रमाणात उसाची वाहतूक केली जाते ऊस वाहतूक करणाऱ्या ट्रॅक्टरमध्ये क्षमतेपेक्षा जास्त ऊस भरला जातो. कारखान्याच्या माध्यमातून रिफ्लेक्टर लावले जात नाहीत तर दुसरीकडे ट्रॅक्टर चालकच वाहतुकीचे नियम मोडून वाहन चालवितात. उसाच्या ट्रॅक्टरच्या चालकांनी कर्कश आवाजात गाणी वाजवत ट्रैक्टर चालवू नये. तसेच योग्य ते नियम पाळून ट्रॅक्टरच्या मागे रिफ्लेक्टर बसविणे आवश्यक आहे. याकडे कारखाना प्रशासनाने लक्ष देण्याची आवश्यकता आहे. सरगम चौक तसेच तालुका पोलीस स्टेशन समोरील बोगद्यातून उसाने भरलेले ट्रॅक्टर जाताना ऊस रस्त्यावर पडतो.या उसावरून इतर वाहने गेल्याने उसातील रस बाहेर येऊन रस्ता चिकट व निसरडा होऊन त्यावरून दुचाकी वाहने पसरून अपघात आले आहेत. उसाचा गळीत हंगाम सुरू होत असतानाच ही ऊस वाहतूक मोठ्या धोकादायक पद्धतीने होत असल्याचे दिसून येते. परंतु ना प्रशासनाचे लक्ष असते ना साखर कारखान्यांचे, या दुर्लक्षितपणामुळे अनेक वेळा अपघात होऊन एखाद्याला जीव गमवावा लागतो तर अनेकांना जखमी व्हावे लागते, असे अपघात दरवर्षी होत असतात, मागील वर्षी उसाच्या ट्रॅक्टरचा अपघात होऊन सांगोला तालुक्यातील एकाला आपला जीव गमवावा लागला होता. अनेकदा चक्क १५ ते १६ वर्षांची मुले लायसन नसताना देखील ट्रॅक्टर ट्रॉली वेगाने नेताना दिसतात.

**● चालकांनी नियम पाळून वाहतूक करावी :** शहरातून अवजड वाहतूक करण्यास मनाई असली तरीही उसाची वाहतूक होताना दिसून येत आहे. ही ऊस वाहतूक शहरातील वाहतुकीसाठी धोकादायक असून यामुळे अनेक वेळा असपातात होतात. पाचा विचार करताना ऊस वाहतूक करणाऱ्या चालकांनी नियमांचे पालन करणे अत्यावश्यक आहे. ऊस वाहतुकीचा ईतर वाहन चालकांना त्रास होणार नाही याची काळजी घेणे आवश्यक आहे.
**- उमेश टोमके, सजग नागरिक, पंढरपूर**

**● वाहतूक प्रशासनाचे दुर्लक्ष :** पंढरपूर शहरामध्ये नेहमीच भाविकांची गर्दी असते. ही गर्दी लक्षात घेता प्रशासनाकडून शहरातून अवजड वाहतूक होणार नाही याची सक्त ताकीद देण्यात आती आहे. दरम्यान असे असताना सध्या शहरातून अवजह वाहतूक तर होतेव परंतु आता ऊस वाहतुकीचे प्रमाण वाढते आहे. यामुळे अशा वाहतुकीवर वाहतूक प्रशासनाकडून कारवाई करण्यात येते की नाही जताच सवाल उपस्थित होताना दिसून येत आहे.
**- मोहन आरस, व्यवसायीक,पंढरपूर.**



**● चालकांना भान असणे गरजेचे :** वाखरी भागात तसेच शहरात ऊस वाहतूक करणारे ट्रैक्टर आहेत. एकतर ते अत्यंत संथ गतीने व साईड न देता चालत असतात, हॉर्न दिला तरी ऐकू येत नाही. ट्रॉलीचा दुचाकी वाहनांना धक्का लागून अपघात होण्याचा संभव आहे.
**- रमेश कांबळे, सामाजिक कार्यकर्ते,पंढरपूर**

# मंगळवेढा-मरवडे रोडवर ट्रॅक्टरला धडकून दुचाकीस्वाराचा मृत्यू

**तभा वृतसेवा**
**मंगळवेढा दि. १२ नोव्हेंबर-**

मंगळवेढा-मरवडे रस्त्याच्या कडेला ट्रॉलीला रिफ्लेक्टर न लावता उभा केल्याने त्यावर इंजीनिअरिंगचे शिक्षण घेत असलेल्या विद्यार्थी मोटरसायकल स्वाराचा आदळून मृत्यू झाला. त्याच्या मृत्यूस कारणीभूत ठरल्याप्रकरणी अज्ञात ट्रॅक्टर चालकाविरूद्ध मंगळवेढा पोलिसात गुन्हा दाखल झाला.

पोलिस सूत्रानी दिलेली माहिती अशी, दि.२६ ऑक्टोबर रोजी सायंकाळी ६.३० वाजण्याच्या सुमारास मंगळवेढा-मरवडे मार्गावर जाणार्या सिमेंट रोडवर नकाते कॉम्प्लेक्स समोर ट्रॅक्टर चालकाने ट्रॅक्टर ट्रॉली रिफ्लेकटर न लावता उभा केल्याने एम.एच.१३ डी. एस.७७५२ इंजीनिअरिंगचे शिक्षण घेत असलेला विद्यार्थी मोटरसायकलरून मरवडेकडून मंगळवेढयाकडे येणारा मयत जहीर मुल्ला (वय २१ वर्षे रा.मुल्ला गल्ली) हा जोडलेल्या डंपिंग ट्रॉलीला मोटरसायकलची जोराची धडक बसल्याने तो गंभीर जखमी होवून त्याचा डावा हात दंडापासून तूटून पडला होता.

दरम्यान जखमी मयत यास उपचाराकरीता ॲम्ब्युलन्सने प्रथम मंगळवेढा येथील खाजगी दवाखान्यात व तदनंतर सोलापूर येथील अश्विनी हॉस्पिटलमध्ये उपचारासाठी दाखल केले. उपचार सुरू असताना तो दि.२६ ऑक्टोबर रोजी १०.२० वाजता मयत झाला. याची खबर मंगळवेढा पोलिसात तेथील डॉक्टरानी दिल्यानंतर या घटनेची नोंद पोलिसात झाली आहे. दरम्यान तपासिक अंमलदार तुकाराम व्हरे यांनी संपूर्ण घटनेची चौकशी करून अज्ञात सदरच्या ट्रॅक्टर चालकाविरूद्ध निष्काळजीपणा करणे व मृत्यूस कारणीभूत ठरल्याचा गुन्हा दाखल केला आहे.

# उपमुख्यमंत्री अजित पवारांचा लवकरच सोलापूर दौरा

## मनपा निवडणुकीचा आढावा घेणार; सर्वपक्षीय नेते राष्ट्रवादीच्या संपर्कात : शहराध्यक्ष पवार

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.१२ नोव्हेंबर-**

सोलापूर महानगरपालिका पंचवार्षिक सार्वत्रिक निवडणुकीच्या अनुषंगाने आरक्षण सोडत जाहीर झाले. यानिवडणुकीच्या पार्श्वभूमीवर राज्याचे उपमुख्यमंत्री तथा पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष अजित पवार सोलापूर दौऱ्यावर येणार आहेत. निवडणुकीच्या अनुषंगाने उमेदवारांची तसेच पक्षाची आढावा बैठक घेऊन पदाधिकाऱ्यांना सूचना करणार असल्याचे सांगण्यात आले. पुढील आठवड्यात अजित पवारांचा दौरा निश्चित होईल, असे शहराध्यक्ष संतोष पवार यांनी सांगितले.





दरम्यान, महापालिका निवडणुकीच्या अनुषंगाने आरक्षण सोडत जाहीर झाल्यानंतर काही आजी माजी नगरसेवकांचे स्थान धोक्यात आले आहे. तर काही नगरसेवक सेफ झाले आहेत. गोळा बेरजेच्या राजकारणात अनेक नेते मंडळी पक्ष बदलण्याच्या स्थितीत आले आहेत. माजी नगरसेवक प्रथमेश कोठे आणि समर्थकांनी भाजप पक्षामध्ये प्रवेश केल्यानंतर माजी आमदार, बाजार समितीचे सभापती दिलीप माने हे अजित पवारांच्या राष्ट्रवादीच्या संपर्कात असल्याच्या आरोळ्या उठत आहेत. माने यांच्या भाजप प्रवेशाला 'ब्रेक' लागल्यानंतर ते राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये ते जाणार असल्याची चर्चा रंगू लागली आहे.

दरम्यान, अजित पवार यांच्या राष्ट्रवादी काँग्रेसचे शहराध्यक्ष संतोष पवार यांच्यासह आनंद चंदनशिवे, किसन जाधव, जुबेर बागवान, तौफिक शेख आदी पदाधिकाऱ्यांनी माजी आमदार दिलीप माने यांची भेट घेतली. या भेटीनंतर राजकीय वर्तुळात चर्चेला उधाण आले आहे. भाजप प्रवेश रखडल्यानंतर दिलीप माने सध्या पक्षी राजकारणापासून अलिप्त दिसत आहेत.

### राजकीय भेट नव्हती

माजी आमदार दिलीप माने यांची भेट घेतली. मात्र, ती राजकीय नव्हती. या भेटीत कोणतीही राजकीय चर्चा झाली नाही. आम्ही बँकेच्या कामासंदर्भात त्यांना भेटायला गेलो होतो. राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये प्रवेशाचा विषय आला नाही.
**- संतोष पवार, शहराध्यक्ष, राष्ट्रवादी काँग्रेस, सोलापूर**

सोलापूर दक्षिण विधानसभा मतदारसंघातील भाजप पदाधिकाऱ्यांनी त्यांच्या प्रवेशाला उघड विरोध करत थेट पक्षाच्या कार्यालयासमोरच आंदोलन केले. त्यानंतर पक्षाने निरीक्षक पाठवून अंदाज घेण्याचे पदाधिकाऱ्यांना आश्वासन दिल्याने माने यांचा प्रवेश थांबला आहे. त्यानंतर गेल्या काही दिवसांपासून माने हे राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये जाणार असल्याची चर्चा होऊ लागली आहे. या चर्चेच्या अनुषंगाने अधिक माहिती जाणून घेण्यासाठी माजी आमदार दिलीप माने यांच्याशी संपर्क साधण्याचा प्रयत्न केला असता माने यांच्याशी संपर्क होऊ शकला नाही.

# नाझरे येथे वीरभद्र जयंती निमित्त विविध कार्यक्रम

**सांगोला, दि.१२ नोव्हेंबर-**

नाझरे (ता. सांगोला) येथे वीरभद्र जयंती निमित्त मंदिरात शनिवार १५ ते गुरुवार दि.२० नोव्हेंबर अखेर पहाटे ५ ते ६ श्रीस रुद्राभिषेक, स.९.३० ते ११.३० परम रहस्य ग्रंथाचे पारायण, दु.४ ते ५ वीरशैव व रंगनाथ भजनी मंडळाचे भजन, सायं.६ ते ७ शिवपाठ व सायं.७.३० ते ८.३० वेदांताचार्य श्री श्री श्री १०८ गुरु सिद्ध मनीकंठ शिवाचार्य महाराज यांचे प्रवचन, महाआरती व महाप्रसाद वाटप होईल. शुक्रवार २१ नोव्हेंबर रोजी स.६ ते ६.३० षडाक्षरी मंत्राचा सामुदायिक जप, स.६.३० ते.६.४५ श्री गुरु सिद्ध मनीकंठ शिवाचार्य महाराज यांचे आशीर्वचन व स.६.५१ वा. श्रीस पुष्पवृष्टी होईल.



त्यानंतर महाआरती व नाझरे गावातून श्रीच्या पालखीची मिरवणूक निघणार आहे.

# सांगोल्यात पुन्हा गूढ आवाज

**सांगोला, दि.१२ नोव्हेंबर-**

काही दिवसांच्या विश्रांतीनंतर बुधवार दि.१२ नोव्हेंबर रोजी दिवसातून तीन वेळा सांगोला शहरासह तालुक्यात पुन्हा गूढ आवाज झाला. यामध्ये पहिला गूढ आवाज स.११.१७ वा. तर दुसरा गूढ आवाज लगेच स.११.२२ वा. झाला. त्यानंतरचा गूढ आवाज दु.३.१४ वा. झाला. सदर गूढ आवाज झाल्यानंतर सोशल मीडियावर चांगलीच चर्चा रंगली होती. मात्र गूढ आवाज कशामुळे प्रशासनाने याचा लवकरात लवकर शोध लावावा अशी मागणी जनतेतून होत आहे.

# तेलंगवाडीजवळ कारची टेम्पोला धडक, दोघे जखमी

**मोडनिंब, दि. १२ नोव्हेंबर-**

सोलापूर-पुणे महामार्गावर तेलंगवाडी गावाजवळ बुधवारी वेगाने जाणाऱ्या व्हॅगनार कारचे पुढील टायर फुटल्याने कारचालकाचे कारवरील चालकाचे नियंत्रण सुटल्याने बेंगलोरवरून मुंबई येथे जाणाऱ्या एका आयशर टेम्पोला पाठीमागून जोरदार धडक दिली. अपघातात कारचालकाच्या बाजूला बसलेल्या एका महिलेच्या डोक्याला जबर मार लागून गंभीर जखमी झाली. अन्य चार जण किरकोळ जखमी झाले.

सोलापूरवरून पुणेकडे जात असताना कारचा (क्र. MH १२ XQ-८७५३) अपघात झाला. जखमींना शेटफळ रुग्णालयातील शासकीय रुग्णवाहिकेतून डॉ. प्रदिप पाटील आणि चालक सिद्धेश्वर राऊत यांनी सोलापूर येथील खासगी रुग्णालयात पचारासाठी दाखल केले. अपघाताची माहिती मिळताच वरवडे टोल प्लाजा येथील ग्रस्तीपथक, रुग्णवाहिकापथक आणि मोडनिंब महामार्ग पोलिस मदत केंद्राचे प्रभारी अधिकारी उमेश पवार आणि त्यांचे कर्मचारी घटनास्थळी दाखल झाले असून वरवडे टोल नाका येथील ग्रस्तीपथकाने मोडनिंब महामार्ग पोलिस मदत केंद्राच्या पोलीस कर्मचाऱ्यांच्या मदतीने या अपघातातील वाहने वरवेड टोल नाका येथील क्रेनच्या मदतीने रस्त्याच्या बाजूला करून वाहतूक सुरळीत केली. अपघाताची माहिती मोहोळ पोलिस स्टेशनचे अधिकारी क्षीरसागर यांना दिल्याची माहिती वरवडे टोल प्लाझाचे ग्रस्तीपथकाचे प्रमुख विजय साळुंखे यांनी दिली.



**महाराष्ट्र राज्य मराठी नाट्य स्पर्धा**


सोलापूर : हुतात्मा स्मृती मंदिरात सांस्कृतिक कार्य विभाग सांस्कृतिक कार्यालय संचलनालयाच्या ६४ व्या महाराष्ट्र राज्य हौशी मराठी नाट्य स्पर्धेत बुधवारी सायंकाळी येथील बनशंकरी बहुउद्देशीय संस्थेने दोन अंकी 'द माइंडस्केप' नाटकाचे सादरीकरण केले.

# सोलापूर पुणे महामार्गावर दुचाकी घसरुन एक जखमी

**तभा वृत्तसेवा,**
**मोडनिंब, दि. १२ नोव्हेंबर-**

सोलापूर पुणे महामार्गावर अरण गावाजवळ मोडनिंब वरून भेंड येथे जात असताना सायंकाळी सहा वाजण्याच्या सुमारास दुचाकी (क्र. ४५ ९६७६) वरील चालकाचे दुचाकीवरील नियंत्रण सुटल्याने दुचाकी घसरून झालेल्या अपघातात दुचाकीचालक पुरुषाच्या डोक्याला मार लागून जखमी झाला.

या अपघातात बाळासाहेब दत्तात्रय दळवी वय ४८ वर्षे, रा. भेंड हे जखमी झाले. सदर अपघातात जखमीस वरवडे टोल नाका येथील रुग्णवाहिकेमधून डॉ.प्रशांत कारंजकर आणि रुग्णवाहिका चालक नागनाथ भालेराव यांनी मोडनिंब (ता. माढा) येथील खासगी रुग्णालयात तात्काळ पुढील उपचारासाठी दाखल केले. या अपघाताची माहिती मिळताच वरवडे टोल प्लाजा येथील ग्रस्तीपथक आणि मोडनिंब महामार्ग पोलिस मदत केंद्राचे सहाय्यक पोलिस निरीक्षक उमेश पवार आणि त्यांचे कर्मचारी तात्काळ घटनास्थळी दाखल झाले. सदर आपघाताची माहिती टेंभूर्णी पोलिस स्टेशन येथील अपघात विभागाचे अधिकारीजगताप आणि सरडे यांना दिली असल्याची माहिती वरवडे टोल प्लाझा येथील ग्रस्तीपथकाचे प्रमुखविजय साळुंखे यांनी दिली.



# 'सहकार शिरोमणी' देणार उच्चांकी दर : चेअरमन कल्याणराव काळे

## कारखान्याच्या २६ व्या गळीत हंगामाचा शुभारंभ

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि. १२ नोव्हेंबर-**

ऊस उत्पादक शेतकऱ्यांच्या ऊसास सहकार शिरोमणी कारखाना जिल्ह्यात उच्चांकी दर देणार असून, मागील पाच-सहा वर्षात कारखाना आर्थिक अडचणीतून मार्गक्रम करीत असतानाही केवळ शेतकऱ्यांच्या घामाला योग्य दाम देण्यासाठी आम्ही सर्व संचालक सतत प्रयत्न करीत असल्याचे सांगितले. यापूर्वीही केवळ शेतकऱ्यांचे हित डोळ्यासमोर ठेवून, एफआरपीपेक्षा दर देण्यात आला असल्याचे चेअरमन केल्याणराव काळे यांनी सांगितले.

सहकार शिरोमणी कारखान्याच्या सन २०२५-२६ च्या २६वा गळीत हंगाम शुभारंभ चेअरमन कल्याणराव काळे व ओंकार शुगर कार्पोरेशन प्रा.लि. युनिट नं.१ ते १७ चे चेअरमन बाबुराव बोत्रे-पाटील व संचालिका रेखा बोत्रे-पाटील यांच्या प्रमुख उपस्थितीत दिपप्रज्वलन करुन करण्यात आला. तत्पुर्वी संचालक तानाजी उमराव उर्फ रावसाहेब सरदार व त्यांच्या पत्नी राजश्री सरदार या उभयतांच्या हस्ते



बॉयलर पूजन व संचालक राजाराम जगदाळे व त्यांच्या पत्नी रंजना जगदाळे या उभयतांच्या हस्ते गव्हाण व काटापूजन करण्यात आले. यावेळी श्रीविठ्ठल व सहकार शिरोमणी वसंतदादांच्या प्रतिमेचे पुजन उपस्थित सर्व मान्यवरांचे हस्ते करण्यात आले.

कल्याणराव काळे पुढे म्हणाले शेतकऱ्यांना वेळेत आणि जास्तीत-जास्त दर देता यावा केवळ सर्व सभासद, कामगार या सर्वाचे हित डोळ्यासमोर ठेवुन, सुमारे १६ कारखाने चालविण्याचा अनुभव असणारे ओंकार ग्रुपचे सर्वेसर्वा चेअरमन मा.श्री.बोत्रे-पाटील यांचे सहकार्याने सहयोगी तत्वावर हा कारखाना चालविला जाणार आहे. सहयोगी तत्वानुसार आपल्या सभासदांचे, कामगारांचे, संचालक मंडळाचे सर्व हक्क अबादित राहणार असून, त्यामध्ये कोणतेही बदल होणार नाही. कारखाना भाडे तत्वावर किंवा भागीदारीमध्ये दिलेला नसून शासनाचे जीआरनुसार शासनाच्या अटी व शर्तीस अधिन राहुनच सहयोगी तत्वावर चालविण्यात येणार आहे. आपण वार्षिक सभेमध्ये दिलेल्या मंजुरीने झालेल्या निर्णयावर शासकीय समितीमध्ये याचा निर्णय होणार असून, त्यास काही महिने लागणार आहेत. हे सर्व कामकाज शासनाच्या नियमांचे चौकटीत राहुनच करण्यात येत आहे. काही मंडळी मिडीयाव्दारे, पत्रकार परिषद घेवुन, स्वार्थासाठी कारखाना अडचणीत आणण्यासाठी अटोकात प्रयत्नात आहेत. परंतु विरोधकांच्या अपप्रचाराचा विचाराचा न करता सिझनमध्ये जास्तीत जास्त क्रशिंग करुन, आपल्या ऊस उत्पादक सभासद शेतकऱ्यांना वेळेत आणि जास्तीत-जास्त ऊसाला दर कसा देता येईल याचाच विचार आम्ही सर्व संचालक सतत करीत आहोत. आपणास न मागता दिपावली सणासाठी सवलतीच्या दरातील ५० किलो साखर, शंभर रुपयाचा दुसरा हप्ता देण्यात आलेला आहे. यासाठी आवश्यक ते सहकार्य व कोणताही करार न करता केवळ आपल्या सर्वावर विश्वास ठेवुन यंदाचा गळीत हंगाम चालू करण्यासाठी ओंकार साखर कारखान्याचे चेअरमन बोत्रे-पाटील यांनी कोट्यावधी निधी दिला असून, त्याबद्दल त्यांचे आभार व्यक्त करुन, विश्वास पात्र राहण्याची ग्वाही यावेळी दिली.

यावेळी ओंकार ग्रुपचे बोत्रे-पाटील म्हणाले दिवंगत नेत्यांनी परिश्रमाने कारखाने उभारलेले आहेत ते बंद न पडता सुरळीत चालू राहुन ऊस उत्पादक शेतकऱ्यांना व कामगारांना त्यांच्या कष्टाचे व कामाचे दाम मिळावे व लवकरात लवकर हे कारखाने कर्जमुक्त व्हावेत या उद्देशाने ओंकार ग्रुप काम करीत आहे, ऊस उत्पादक शेतकऱ्यांनी कोणत्याही वजन काट्यावर वजन करुन या कारखान्यास ऊस गळीतास आणावा, वजनात तफावत होणार नाही असे सांगुन, चालू गळीत हंगामामध्ये ५.५० लाख मे.टन गाळपाचे उद्दिष्ट असून, प्रत्येक १५ दिवसांनी गळीतास आलेल्या ऊसाचे पेमेंट, ऊस तोडणी वाहतुकदारांचे पेमेंट व कामगारांना दरमहा पेमेंट करण्याची ग्वाही दिली. प्रास्ताविक कारखान्याचे प्र.कार्यकारी संचालक पोपटराव घोगरे यांनी केले. सूत्रसंचालन प्रा. समाधान काळे यांनी केले तर आभार संचालक युवराज दगडे यांनी केले.

**हे पत्र मुद्रक व प्रकाशक** दिलीप शिवमुर्ती दुलंगे यांनी **सोलापूर तरुण भारत मीडिया लिमिटेड करिता, सोलापूर तरुण भारत कार्यालय** १९/२० औद्योगिक वसाहत, होटगी रोड, सोलापूर येथे छापून तरुण भारत कार्यालय, श्री. मसलेकर निवास, जिल्हा न्यायालय पाठीमागे, समर्थ नगर, धाराशिव (उस्मानाबाद) ४१३५०१, कार्यालयातून प्रकाशित करून वितरीत केले. दूरध्वनी : ९७६७०९९७११ / ८८८८८४७२३९ ● मुख्य समुह संपादक : **दिलीप यशवंत पेठे.** ● मुख्य संपादक : **प्रशांत वसंतराव माने** (पी. आर. बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांच्यावर आहे) दैनिक सोलापूर तरुण भारत. RNI No. MAHMAR/2023/86468. **E-mail starunbharatgmail.com.** ● **Websate:http://dainiktarunbharat/** या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक/संचालक सहमत असतीलच असे नाही.

**Owned by, SOLAPUR TARUN BHARAT MEDIA LTD. Printed by, Published by** DILIP SHIVMURTI DULANGE **Printed at** SOLAPUR TARUN BHARAT MEDIA LT. 19,20 INDUSTRIAL ESTATE, HOTGI ROAD, SOLAPUR, Dist. SOLAPUR, 413003.**Publised at** TARUN BHARAT OFFICE Mr. Maslekar Residence, Behind District Court, Samarth Nagar, Dharashiv. PIN - 413501 | **RNI No. MAHMAR/2023/86468**

● **CHIEF GROUP EDITOR :** DILIP YASHWANT PETHE ● **CHIEF EDITOR :** PRASHANT VASANTRAO MANE

# धाराशिव दिनांक

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.




## लोहारा येथे युनियन बँकेचा १०७ वा वर्धापन दिन साजरा

**तभा वृत्तसेवा**
**लोहारा, दि.१२ नोव्हेंबर -**

लोहारा शहरातील युनियन बँक ऑफ इंडिया या राष्ट्रीयकृत बँकेला १०७ वर्षे पुर्ण होऊन यशस्वी वाटचाल चालू असल्याबद्दल शाखेत बँकेचे शाखा व्यवस्थापक संदीप विजयकुमार पुरी व बँकेच्या ग्राहकांच्या हस्ते (दि.११) केक कापून, मिठाई वाटून मोठ्या उत्साहात वर्धापनदिन साजरा करण्यात आला.



यावेळी शाखा व्यवस्थापक संदीप पुरी, सहाय्यक शाखा व्यवस्थापक मुकेश जाधव, विशेष सहाय्यक विशाल बिरादार, रिलेशनशिप मॅनेजर (ग्राहक संबंध व्यवस्थापक) आकाश कातळे, प्रधान खजानची समीर शेळके, बँकेचे कर्मचारी बसय्या स्वामी, सचिन फताटे, शेखर माणिकशेट्टी, हर्षवर्धन माणिकशेट्टी, उमेदचे प्रभाग समन्वयक सौरभ जगताप, ताई कुंभार, प्रभावती माने-जाधव, दत्ता जाधव, युनियन बँकेचे ग्राहक सेवा केंद्र चालक अशोक दुबे, यांच्यासह बँकेचे खातेदार, ठेवीदार, हितचिंतक, शेतकरी, व्यापारी आदी उपस्थित होते.

## धाराशिव जिल्हा बँकेला मिळणार ७४ कोटींची मदत; राज्य सरकारचा निर्णय

### आ. राणाजगजितसिंह पाटील यांच्या पाठपुराव्याला यश

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.१२ नोव्हेंबर -**

धाराशिव जिल्हा सहकारी बँकेला नवसंजीवनी देण्यासाठी राज्य सरकारने तब्बल ७४ कोटी रुपयांचे अर्थसहाय्य देण्याचा म हत्त्वपूर्ण निर्णय मंगळवारी घेतला आहे. या निर्णयाची माहिती आम दार राणाजगजितसिंह पाटील यांनी दिली असून, हा निर्णय जिल्ह्यातील शेतकऱ्यांसाठी दिलासादायक ठरेल, असे ते म्हणाले.

ऑक्टोबर महिन्यात आमदार पाटील यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना पत्राद्वारे बँकेस आर्थिक मदत देण्याची मागणी केली होती. अतिवृष्टी आणि महापुराम ुळे जिल्ह्यातील शेतकरी आर्थिक संकटात सापडले असून, पतपुरवठा बंद झाल्याने शेतकऱ्यांची अडचण वाढली आहे. या पार्श्वभूमीवर जिल्हा बँकेला अर्थसहाय्य देण्याचा निर्णय राज्य सरकारने घेतल्याने शेतकऱ्यांना मोठा दिलासा मिळाला आहे.

आमदार पाटील म्हणाले की, अभूतपूर्व अतिवृष्टीमुळे अनेकांच्या शेतीजमिनी खरवडून गेल्या आहेत. खरीप हंगाम हुकला आहे. अशा परिस्थितीत जिल्हा बँकेच्या माध्यम ातून कर्जपुरवठा सुरू होणे अत्यावश्यक आहे. त्यांनी मुख्यमंत्री फडणवीस यांना दिलेल्या पत्रात 'फार्मर आयडी', ठेवीदारांचे संरक्षण आणि कर्जपुरवठ्याची पुनर्बहाली यांचा मुद्दा मांडला होता.



होमट्रेड रोखे घोटाळ्यामुळे धाराशिव जिल्हा बँकेला म ोठा आर्थिक फटका बसला होता. तब्बल सहा लाख ठेवीदारांचे ४४० कोटी रुपये अडकले असून, मागील २३ वर्षांपासून शेतकऱ्यांना बँकेमार्फत कर्जपुरवठा बंद आहे. परिणामी, अनेक शेतकऱ्यांना सावकारीकडे वळावे लागले आहे. आता सरकारकडून मिळणाऱ्या या अर्थसहाय्यामुळे जिल्हा बँकेच्या पुनरुज्जीवनाला गती मिळेल, अशी अपेक्षा आमदार पाटील यांनी व्यक्त केली. त्यांनी या निर्णयाबद्दल मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, अजित पवार आणि महायुती सरकारमधील सर्व मंत्री यांचे जिल्ह्यातील शेतकरी बांधवांच्या वतीने आभार मानले.




## संक्षिप्त वृत्त...



### येळी येथे ५० लाखांच्या निधीत 'वैशाली बुद्ध विहार' वास्तूचे भूमिपूजन

**उमरगा, दि.१२ नोव्हेंबर -**

तालुक्यातील येळी येथे नव्याने उभारण्यात येणाऱ्या 'वैशाली बुद्ध विहार' वास्तूचे भूमिपूजन व उद्घाटन सोहळा शिवसेना उपनेते ज्ञानराज चौगुले यांच्या हस्ते मोठ्या उत्साहात संपन्न झाला. या विहाराच्या उभारणीसाठी तब्बल ५० लाख रुपयांचा निधी उपलब्ध करून देण्यात आल्याची माहिती यावेळी देण्यात आली. या सोहळ्याला जिल्हा बँकेचे उपाध्यक्ष कैलास शिंदे, माजी सभापती हरिष डावरे, तसेच वंचित बहुजन आघाडीचे नेते रामभाऊ गायकवाड यांची प्रमुख उपस्थिती लाभली. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी हरिष डावरे होते. याप्रसंगी सरपंच निवृत्ती पवार, ग्रामसेवक एस.आर. पांढरे, सरपंच शिवलिंग माळी, तसेच वैशाली बुद्ध विहार ट्रस्टचे पदाधिकारी, उपासक-उपासिका व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.



### केशेगाव ग्रामपंचायतीच्या उपसरपंचपदी मल्लीनाथ महाबोले यांची बिनविरोध निवड

**इटकळ, दि.१२ नोव्हेंबर -**

तुळजापूर तालुक्यातील मौजे केशेगाव ग्राम पंचायतीच्या उपसरपंचपदी मल्लीनाथ गंगाराम महाबोले यांची बिनविरोध निवड करण्यात आली. या निवडीनंतर गावात आनंदाचे आणि उत्साहाचे वातावरण निर्माण झाले असून ग्रामस्थांनी गुलाल उधळून व फटाके फोडून जल्लोष साजरा केला. ग्रामपंचायतीची विशेष सभा सरपंच मल्लिनाथ आप्पाराव गावडे यांच्या अध्यक्षतेखाली पार पडली. निवड प्रक्रिया विस्तार अधिकारी डी.एस. नडगिरे यांच्या मार्गदर्शनाखाली आणि ग्रामसेवक तांबोळी यांच्या उपस्थितीत पूर्ण झाली. सर्व सदस्यांनी एकमताने मल्लीनाथ महाबोले यांची उपसरपंच म्हणून निवड केली. या सभेला ग्रामपंचायत सदस्य लक्ष्मण नागनाथ क्षिरसागर, शंकर सिद्राम घंटे, सविता मारुती पवार, प्रभावती धोंडीबा जाधव, महिबुब इस्माईल फकीर, अश्विनी प्रदीप हुकीरे आणि शोभा कमलाकर बागडे उपस्थित होते.



### श्री संत महादेव बाबा कासार यांची पुण्यतिथी उत्साहात साजरी

**तुळजापूर, दि.१२ नोव्हेंबर -**

श्री संत महादेव बाबा कासार यांची पुण्यतिथी भक्तिमय वातावरणात उत्साहाने साजरी करण्यात आली. श्री विठ्ठल रुक्मिणी मंदिर, जिजामाता नगर येथे सकाळी १० वाजता प्रतिमा पूजनाने सोहळ्याची सुरुवात झाली. हभप. ॲड. नरसिंग महाराज मैंदर्गे, पुणे यांनी कलियुगात संतांचे महात्त्म्य पटवून सांगितले. आई-वडीलानंतर संतच सामान्य जनतेची काळजी वाहतात व त्यांना भौतिक जगतातून भगवंताच्या भक्तियम संवेमध्ये आणतात. महाराष्ट्र ही संतांची भूमि असून आपण या पावन भूमित जन्म घेतल्याने आपण भाग्यवान आहोत असे महाराजांनी सांगितले. दया, क्षमा, शांती, भक्ती व वैराग्य हे संतांचे मूलभूत गुणधर्म असून समाजाला अध्यातमिककडे नेण्याचं महत्त्वाचे कार्य संतच करू शकतात, असे प्रतिपादन श्रीमान यशोदा जीवन प्रभूजी इस्कॉन धाराशिव यांनी केले. प्रसादाची व्यवस्था बाळासाहेब शेटे यांनी केली होती. यात सुमारे २५० ते ३०० भाविकांनी कार्यक्रमाचा लाभ घेतला.



### लोटस पोदार लर्न स्कूलच्या विद्यार्थ्यांची राज्यस्तरीय रोलबॉल स्पर्धेसाठी निवड

**उमरगा, दि.१२ नोव्हेंबर -**

महाराष्ट्र राज्य क्रीडा व युवक सेवा संचालनालयांतर्गत जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय, नांदेड यांच्या वतीने आयोजित विभागीय रोलबॉल स्पर्धेत लोटस पोदार लर्न स्कूल, उमरगा येथील खेळाडूंनी उत्तम कामगिरी केली. १४ वर्षे मुलांचा संघ द्वितीय तर १९ वर्षे मुलांचा संघ प्रथम क्रमांक पटकावून राज्यस्तरीय स्पर्धेसाठी पात्र ठरला. या यशासाठी क्रीडा शिक्षक रोहित पायमल व शाम दुधभाते यांनी मार्गदर्शन केले. अध्यक्ष व्यंकट अरगडे, युवराज गायकवाड, विशाल कोकरे, प्राचार्य सिंह यांनी विजेत्यांचे अभिनंदन केले.

## जगदाळे यांचा काँग्रेसमध्ये प्रवेश; नळदुर्ग न.पा.च्या राजकारणात खळबळ

**तभा वृत्तसेवा**
**नळदुर्ग, दि.१२ नोव्हेंबर -**

राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष (शरद पवार गट)चे नेते अशोक जगदाळे यांनी ऐन नगरपालिका निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर पक्षाला सोडचिठ्ठी देत आपल्या समर्थकांसह काँग्रेस पक्षात जाहीर प्रवेश केला आहे. त्यांच्या या निर्णयामुळे राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटाला मोठा धक्का बसला असून काँग्रेस पक्षाची ताकद वाढली आहे.

मुंबईतील टिळक भवन येथे दि. ११ नोव्हेंबर रोजी झालेल्या कार्यक्रमात महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांच्या हस्ते आणि माजी मंत्री अमित देशमुख यांच्या उपस्थितीत अशोक जगदाळे यांनी अधिकृतपणे काँग्रेस प्रवेश केला. जगदाळे यांच्यासोबत माजी नगराध्यक्ष नितीन कासार, माजी उपनगराध्यक्ष शरीफ शेख, माजी नगरसेवक अमृत पुदाले, माजी नगरसेविका सुमन जाधव, विकास सोसायटीचे चेअरमन संजय बेडगे, व्हाईस चेअरमन ताजोद्दीन सय्यद, तसेच रुकनोद्दीन शेख, अलीम शेख, अमोल सुरवसे, दत्ता राठोव आणि नवल जाधव यांनीही काँग्रेसमध्ये प्रवेश केला.



▶▶ राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार गट) ला मोठा धक्का, काँग्रेसला मिळाले नवे बळ

या प्रवेशामुळे नळदुर्ग नगरपालिकेतील राजकारणाला नवी दिशा मिळाली असून, आगामी निवडणुकांमध्ये काँग्रेस पक्ष आता जगदाळे यांच्या नेतृत्वाखाली रणनिती आखण्याची शक्यता आहे. त्यांच्या आगमनामुळे तुळजापूर तालुक्यात काँग्रेस पक्षाला मोठे राजकीय बळ प्राप्त झाले आहे.

जगदाळे यांच्या प्रवेशामुळे नगरपालिकेच्या निवडणुकीचे राजकीय गणित बदलण्याची शक्यता वर्तवली जात असून, काँग्रेस पक्ष आता नळदुर्गच्या रणांगणात अधिक आक्रमकपणे उतरणार असल्याचे संकेत मिळत आहेत.

## हॉटेल सागर बार ॲण्ड लॉज येथे अनैतिक देह व्यापार उघकीस

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.१२ नोव्हेंबर -**

धाराशिव जिल्ह्यातील उम रगा तालुक्यातील गुंजोटी येथील प्रितीश दिलीप सगर (वय २६) या युवकाने स्वतःच्या आर्थिक फायद्यासाठी एका महिलेस वाणिज्यिक हेतूने आश्रय देत अनैतिक व्यवसाय करण्यास प्रवृत्त केल्याचा प्रकार उघडकीस आला आहे. या प्रकरणी उमरगा पोलिसांनी गुन्हा नोंदविला आहे.

ही कारवाई दि.९ नोव्हेंबर रोजी रात्री साडेअकराच्या सुमारास करण्यात आली. जकेकुर चौक ते लातूर जाणाऱ्या रस्त्यालगत असलेल्या हॉटेल सागर बार ण्ड



लॉज येथे आरोपी प्रितीश सगर हा संबंधित महिलेस आश्रय देऊन तिच्याकडून व्यावसायिक हेतूने लैंगिक स्वैराचार करवून घेत असल्याची माहिती पोलिसांना मिळाली होती. त्यानंतर पोलिसांनी तत्काळ कारवाई करत घटनास्थळी धाड टाकली असता आरोपी व महिला तेथे आढळून आले.

सरकारतर्फे मिळालेल्या प्रथम खबरेवरून उमरगा पोलिस ठाण्यात गुन्हा नोंदवण्यात आला आहे.

## कळंब नगर परिषद निवडणुक; तिसऱ्या दिवशीही ना नगराध्यक्ष! नगरसेवक! उमेदवारी : अर्ज दाखल निरंक

**निवडणूक पारदर्शक होण्यासाठी ९ पथकाची नियुक्ती... नगर परिषद क्षेत्रातील २० ,९ ५८ मतदार मतदानाचा हक्क बजावणार... तिकीट मिळवण्यासाठी पक्षप्रवेशाला गती!**

### महायुतीतल्या जिल्हास्तरीय वरीष्ठ नेत्यांचे काळे कारनाम्याने महायुतीत संभ्रम कायम...

**तभा वृत्तसेवा / परवेज मुल्ला**
**कळंब, दि.१२ नोव्हेंबर -**

परवेज मुल्ला :

कळंब नगर परिषदेच्या सार्वत्रिक निवडणुकीची प्रक्रिया सुरू झाली असून, राज्य निवडणूक आयोगाने ४ नोव्हेंबर २०२५ रोजी कार्यक्रम जाहीर केल्यानंतर आचारसंहिता लागू झाली. नगर परिषद क्षेत्रातील २० हजार ९ ५८ मतदार मतदानाचा हक्क बजावणार आहेत, त्यात १० हजार ७१३ पुरुष, १० हजार २४५ म हिला मतदार आहेत. मतदानासाठी शहरात २४ ठिकानी मतदान केंद्रे निश्चित केली आहेत. नामनिर्देशन दाखल करण्यास १०




नोव्हेंबरपासून सुरुवात झाली असली तरी तिसऱ्या दिवशी एकही अर्ज दाखल झाला नाही, अशी माहिती निवडणूक विभागाकडून मिळाली. अर्ज दाखल करण्याची अंतिम तारीख १७ नोव्हेंबर, छाननी १८ नोव्हेंबर, अर्ज मागे घेण्याची मुदत १९ ते २१ नोव्हेंबर, चिन्ह वाटप २६ नोव्हेंबर, मतदान २ डिसेंबर, आणि मतमोजणी ३ डिसेंबर रोजी सकाळी ८ वाजता होईल.

या निवडणुकीत १० प्रभागांमधून प्रत्येकी दोन सदस्य निवडले जातील, म्हणजे एकूण २० नगरसेवक निवडले जातील. तसेच थेट नगराध्यक्ष पदासाठी निवडणूक होणार आहे. नगराध्यक्षपदासाठी खर्च मर्यादा ७ लाख ५० हजार रूपये, नगरसेवकपदासाठी २ लाख ५० हजार रूपये ठरवण्यात आली आहे. उमेदवारांनी दररोजचा खर्च निवडणूक विभागाकडे सादर करणे बंधनकारक आहे. अर्ज ऑनलाईन पद्धतीने भरता येईल, तसेच सेतू सेवा केंद्रे आणि हेल्पलाईन सुविधा उपलब्ध आहेत. त्याचप्रमाणे सभा रेकॉर्डिंग करण्यासाठी व्ही. एस.टी. तीन पथक चेक पोस्ट साठी एफ. एस.टी.तीन पथक, धाड पथक एस. टी. टी. तीन पथक असे एकूण नऊ पथकाची निर्मिती या नगरपरिषद निवडणुकीसाठी करण्यात आलेली आहे. शांततेत निवडणूक पार पाडण्यासाठी कार्यालय परिसरात कडक पोलिस बंदोबस्त ठेवण्यात आला आहे आणि कार्यालयाच्या १०० मीटर परिसरात फक्त दोन व्यक्तींना प्रवेश असेल. निवडणूक निर्णय अधिकारी हेमंत ढोकले, सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी श्रीमती मंजुषा गुरमे, अजित काकडे यांनी नागरिकांना लोकशाहीच्या या उत्सवात सर्वांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवावा आणि मतदानाचा हक्क बजवावा, असे आवाहन केले आहे.



महाराष्ट्रातील नगरपरिषद सार्वत्रिक निवडणूकीचे राण पेटले असून, कुरघोड्यांचे राजकारणाला आता उत आला आहे. महाविकास आघाडी बरोबरच आता महायुतीतही संभ्रमावस्था आहे. महायुतीतील मोठ्या भावाच्या भुमिकेत असणाऱ्या भारतीय जनता पार्टी च्या पदाधिकारी यांचा अध्यक्षपदावर दावा आहे. अध्यक्षपद महायुतीत भाजपा कडे दिल्याशिवाय इतर जागांवर चर्चा नको, अशी भुमिका स्थानिक पदाधिकारी यांनी घेतली आहे. भारतीय जनता पार्टीचा मोठा मतदार वर्ग कळंब शहरात असुन त्याला राणाजगजितसिंह पाटील यांचे भाजपात चांगलेच वजन असयेण्याने आता आणखीनच बळ मिळाले आहे.

या प्रमुख कारणांमुळे भारतीय जनता पार्टी ही अध्यक्ष पदावरील आपला दावा सोडायला तयार दिसत नाही, असे सततच्या फेसबुक, वॉटस्पला प्रसिद्ध होणाऱ्या पोस्ट वरून दिसून येते.

## शेतकऱ्यांना तातडीने अनुदान द्या : आ. तानाजी सावंत

### 'फार्मर आयडी'च्या गुंतागुंतीत अडकलेले अनुदान; प्रशासनाची दिरंगाई म्हणजे शेतकऱ्यांच्या जखमांवर मीठ चोळणे

**तभा वृत्तसेवा**
**वाशी, दि.१२ नोव्हेंबर -**

धाराशिव जिल्ह्यातील बळीराजा गेल्या सहा महिन्यांपासून अतिवृष्टीच्या तडाख्यात सापडला असून, पिकांचे प्रचंड नुकसान झाले आहे. त्यावर रखडलेली सरकारी मदत या दुहेरी संकटामुळे शेतकरी अक्षरशः हवालदिल झाला आहे.

या पार्श्वभूमीवर शिवसेनेचे भुम-परंडा-वाशीचे आमदार आणि माजी मंत्री तानाजी सावंत यांनी जिल्हाधिकाऱ्यांकडे तातडीने अनुदान वाटप करण्याची मागणी करत निवेदन सादर केले.

आमदार सावंत यांनी जिल्हाधिकाऱ्यांचे लक्ष वेधून दिले की, अनेक शेतकऱ्यांचे अनुदान फक्त 'फार्मर आयडी' च्या गुंतागुंतीत अडकले आहे. तहसीलदार आणि तलाठी कार्यालयातील प्रक्रिया रखडल्याने शेतकऱ्यांना दिलासा मिळत नाही. ही सरकारी दिरंगाई म्हणजे शेतकऱ्यांच्या जखमांवर मीठ चोळण्यासारखी आहे, असा संताप त्यांनी व्यक्त केला.

त्यांनी मागणी केली की तहसीलदार आणि मंडळ अधिकाऱ्यांना तात्काळ आदेश देऊन 'फार्मर आयडी'ची अडचण दूर करावी आणि कोणताही बहाणा न करता सर्व पात्र शेतकऱ्यांना तातडीने अनुदान वितरित करावे. तसेच वारसदार आणि समाईक खातेदारांनाही मदतीपासून वंचित ठेवू नये, असेही त्यांनी स्पष्ट केले.

शिवसेनेच्या नेहमीच्या ठाम आणि आक्रमक भूमिकेतून आमदार सावंत यांनी शेतकऱ्यांचा आवाज प्रशासनापर्यंत पोहोचवला आहे. आता जिल्हाधिकारी कार्यालयाकडून कितपत जलद कार्यवाही होते, याकडे संपूर्ण धाराशिव जिल्ह्याचे लक्ष लागले आहे. बळीराजाला न्याय मिळेपर्यंत शिवसेना शांत बसणार नाही, असा इशारा सावंत यांनी या निवेदनातून दिला आहे.

## अणदूर येथे करिअर अकॅडमीच्या विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य वाटप

### सेवानिवृत्त मुख्याध्यापक बाबुराव बिरादार गुरुजींच्या अमृत महोत्सवी वर्षानिमित्त उपक्रम

**तभा वृत्तसेवा**
**अणदूर, दि.१२ नोव्हेंबर -**

येथील शिक्षण प्रसारक मंडळ संचलित जवाहर कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालयात करिअर अकॅडमीच्या ५० विद्यार्थ्यांना सॅक, करिअर अकॅडमीची पुस्तके आणि पेन या शालेय साहित्याचे वाटप करण्यात आले.

हा उपक्रम श्री बसवेश्वर विद्यालय, जेवळी येथील सेवानिवृत्त मुख्याध्यापक व आदर्श शिक्षक पुरस्कार प्राप्त बाबुराव बिरादार-तोंडारकर गुरुजींच्या अमृत महोत्सवी वर्षानिमित्त आयोजित करण्यात आला होता. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी म हाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. उम ाकांत चनशेट्टी होते, तर प्रमुख पाहुणे म्हणून उपप्राचार्य डॉ. म ल्लिनाथ लंगडे, प्रा.डॉ. विश्वास माने आणि प्रा.डॉ. सिद्धेश्वर बाड उपस्थित होते. यावेळी जवाहर महाविद्यालयाच्या वतीने बिरादार गुरुजींचा सन्मानचिन्ह, पुष्पगुच्छ,




शाल व श्रीफळ देऊन सत्कार करण्यात आला.

या प्रसंगी बोलताना बिरादार गुरुजी म्हणाले, शिक्षणमहर्षी सि. ना. आलुरे गुरुजींनी ग्राम ीण भागातील विद्यार्थ्यांसाठी शिक्षणाची दारे खुली केली. त्यांनी जाती-धर्माचा भेद न करता गोरगरीब विद्यार्थ्यांना शिक्षणाची संधी दिली. त्यांच्या कार्याचा आदर्श ठेवून मीही शिक्षण क्षेत्रात छोटासा वाटा उचलत आहे, असे ते म्हणाले.

अध्यक्षीय समारोपात प्राचार्य डॉ. उमाकांत चनशेट्टी यांनी बिरादार गुरुजींच्या जीवनप्रवासाचा आणि त्यांच्या शैक्षणिक-सामाजिक कार्याचा आढावा घेतला. तसेच उपप्राचार्य डॉ. मल्लिनाथ लंगडे आणि डॉ. सिद्धेश्वर बाड यांनीही मनोगत व्यक्त करून बिरादार गुरुजींना निरोगी दीर्घायुष्यासाठी शुभेच्छा दिल्या.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक व सूत्रसंचालन प्रा.डॉ. प्रसन्न कंदले यांनी केले, तर आभार प्रा.डॉ. ज्योती हत्तरगे यांनी मानले. या कार्यक्रमास महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक, जवाहर करिअर अकॅडमीचे प्रशिक्षक आणि विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.


## छोटी जाहिरात...

**टि.सी. हरवली आहे**

**व्यंकटेश नरेंद्र लांडे,** रा. तुळजापूर, ता. तुळजापूर, जि. धाराशिव या नावाची **इयत्ता १२ वी पासची टी.सी.** व इतर शैक्षणिक कागदपत्रे तुळजापूर ते धाराशिव प्रवासादरम्यान हरवली आहे. तरी कोणास सापडल्यास खालील मोबाईल नंबरवर संपर्क साधावा.

**संपर्क : ९५७९४०१०९५**

# विनोद मेत्रेवार यांच्या सतर्कतेमुळे अल्पवयीन मुलीची सुखरूप सुटका

**त.भा. वृत्तसेवा,**

**अहमदपूर, १२ नोव्हेंबर :** अहमदपूर पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक विनोद मेत्रेवार आणि त्यांच्या पथकाच्या सतर्क गस्तीमुळे धाराशिव येथून अपहरण झालेल्या एका अल्पवयीन मुलीची सुखरूप सुटका करण्यात आली आहे. अपहरणाचा आरोपीही पोलिसांच्या जाळ्यात अडकला असून, पुढील कारवाईसाठी त्याला धाराशिव पोलिसांच्या ताब्यात देण्यात आले आहे.

याविषयी पोलीस सुत्राकडून मिळालेली माहीती अशी की, आनंदनगर पोलीस स्टेशन, धाराशिव येथे दि ११ नोव्हेंबर २०२५ रोजी दाखल झालेल्या एका अल्पवईन मुलीच्या संदर्भात नोंद असलेली मुलगी अहमदपूर पोलिस गस्ती करत असताना दि १२ नोव्हेंबर २०२५ रोजी पहाटे ३:०० वाजेच्या सुमारास पोलीस निरीक्षक विनोद मेत्रेवार हे पोहेकॉ बबन चपडे, विशाल मुंडे या



कर्मचाऱ्यासह रात्रीच्या गस्तीवर असताना, त्यांना तेलगाव पाटी, तालुका अहमदपूर येथील शिवारात मोकळ्या जागेत संशयास्पद स्थितीत दोन व्यक्ती झोपलेल्या आढळल्या. मेत्रेवार यांनी तात्काळ त्यांच्याकडे चौकशी केली असता त्यांनी धाराशिव येथील पत्ता सांगितला.

विनोद मेत्रेवार यांनी विलंब न लावता आनंदनगर, धाराशिव येथील पोलीस स्टेशनला संपर्क साधला. तेव्हा सदर व्यक्तींवर अपहरणाचा गुन्हा दाखल असल्याची माहिती उघड झाली.

आनंदनगर पोलीस स्टेशनचे सहाय्यक पोलीस निरीक्षक आर. एस. घाडगे यांनी अहमदपूर पोलिसांशी संपर्क साधून अपहृत अल्पवयीन मुलगी आणि आरोपी ओंकार या दोघांनाही तपासकामी ताब्यात देण्याची विनंती केली.

पोलीस निरीक्षक विनोद मेत्रेवार यांनी कायदेशीर प्रक्रिया पूर्ण करून, अल्पवयीन मुलगी व आरोपीला धाराशिव पोलिसांच्या ताब्यात दिले. रात्रीच्या वेळी अत्यंत सतर्क राहून पोलीस निरिक्षक मेत्रेवार यांनी दाखवलेल्या तत्परतेमुळे ही गंभीर गुन्ह्यातील व्यक्ती वेळेत ताब्यात घेण्यात यश आले.

# सिध्दी शुगरच्या ११ हजार १११ व्या साखर पोत्यांचे पूजन

**त.भा. वृत्तसेवा,**

**अहमदपूर, १२ नोव्हेंबर :** अहमदपूर तालुक्यातील सिद्धी शुगर अँड अलाईड इंडस्ट्रीज लि. महेशनगर उजना कारखान्यात चालू गळीत हंगामात उत्पादित झालेल्या सिध्दी शुगरच्या या हंगामातील उत्पादीत झालेल्या ११ हजार १११ व्या साखर पोत्याचे पुजन सोमवार दि.१० नोव्हेंबर २०२५ रोजी सायंकाळी ६ वा. कारखान्याचे मार्गदर्शक माजीमंत्री बाळासाहेब जाधव यांचे हस्ते करण्यात आले.

याप्रसंगी आपले मनोगत व्यक्त करताना बाळासाहेब जाधव यांनी चालू गळीत हंगाम २०२५-२६ करीता ६ लाख मे. टन ऊस गाळपाचे उद्दिष्ट असल्याचे सांगितले.

सदर कार्यक्रमास कारखान्याचे उपाध्यक्ष पी. जी. होनराव, कारखान्याचे पुरवठादार उमेश बगाडीया, मुख्य व्यवस्थापक एस. आर. पिसाळ, मुख्य व्यवस्थापक (तांत्रिक) बी. के. कावलगुडेकर, मुख्य व्यवस्थापक (केन) पी.एल. मिटकर, मुख्य व्यवस्थापक (डिस्टीलरी) एस. बी. शिंदे, मुख्य लेखाधिकारी पाटील, चिफ इंजिनिअर मुलानी, राज्य बँक प्रतिनिधी व्ही. पी. आकुसकर, डेप्युटी चिफ केमिस्ट सोमवंशी, ऊस विकास अधिकारी वाय. आर. टाळे, डे. चिफ अकौंटंट माने, ई.डी.पी. मॅनेजर जाधव, परचेस ऑफिसर चव्हाण, गोडावुन किपर अरविंद कदम, लॅब केमिस्ट ताटे, हेड टाईम किपर टिळक, शुगर सेल अकौंटंट खेडकर, सुरक्षा अधिकारी डोंगरे आदी अधिकारी-कर्मचारी, कामगार मोठ्या संख्येने उपस्थित होते.



# चाकूरमध्ये सेवानिवृत्त मुख्याध्यापकास लुटले

**त.भा. वृत्तसेवा,**

**चाकूर, १२ नोव्हेंबर :** चाकूर शहर व परिसरात मागच्या काही दिवसांपासून नागरिकांना अडवून लूटमारकरण्याचे प्रमाण वाढल्याचे निदर्शनास येत आहे. एका सेवानिवृत्त मुख्याध्यापकास अडवून त्यांच्याकडील ऐवज लंपास केल्याची घटना नुकतीच घडली आहे. त्यामुळे नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे.

चाकूर तालुक्यातील चापोली येथील रहिवासी असलेले पंढरीनाथ राजाराम मद्रेवार हे सोमवार दि. १० नोव्हेंबर २०२५ रोजी दुपारी १.३० वाजण्याच्या सुमारास हयातीचे प्रमाणपत्र दाखल करण्यासाठी लातूर रोड कडून चाकूर पंचायत समितीकडे चालत जात होते. एका काळ्या रंगाच्या मोटारसायकलवरून दोन चोरट्यांनी त्यांना रस्त्यात अडवले. मोटारसायकल चालवणाऱ्याने त्यांना अडवून आम्हाला चौकशी करायची आहे,असे खोटेच बोलून थांबवण्याचा प्रयत्न केला. मद्रेवार यांनी त्याकडे दुर्लक्ष करून जाण्याचा प्रयत्न केला. मात्र चोरटयांनी पुन्हा मागे येऊन त्यांचा रस्ता अडवला. दुसर्या चोरट्याने मुख्याध्यापकांच्या जवळ येऊन त्यांना दमदाटी करून त्यांच्या पॅन्टच्या खिशात हात घालून खिशातील जुना मोबाईल व रोख १७० रुपये हे काढून घेतले. नंतर त्यांनी उजव्या हातात असलेली सोन्याची अंगठी काढून घेतली. पण त्या भामट्यांनी मोबाईल व १७० रुपये तेथेच टाकून काळ्या रंगाच्या मोटरसायकलवर बसून लातूरच्या दिशेने निघून गेले. चाकूर परिसरात अशा घटना वारंवार घडत असल्याने नागरिकांमध्ये सध्या भीतीचे वातावरण पसरले आहे. अशा भुरट्या चोरांना पकडून त्यांच्यावर योग्य ती कारवाई करण्याची मागणी नागरीकातून केली जात आहे. या प्रकरणी चाकूर पोलिसात गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील तपास पोलीस निरीक्षक बालाजी रामराव भंडे यांच्या मार्गदर्शनाखाली पंकज लक्ष्मणराव निळकंठे हे करत आहेत.

# रविंद्र काळे यांची उदगीर नगर परिषद निवडणुकीसाठी निरीक्षकपदी नियुक्ती

**त.भा. वृत्तसेवा,**

**उदगीर, १२ नोव्हेंबर :** भारतीय राष्ट्रीय काँग्रेसचे लातूर जिल्हाध्यक्ष अभय साळुंके यांनी लातूर जिल्ह्यातील विलास सहकारी साखर कारखान्याचे माजी व्हाईस चेअरमन तथा विद्यमान संचालक रविंद्र काळे यांची उदगीर नगरपरिषद निवडणुकीसाठी पक्षाच्या वतीने निरीक्षक म्हणून नियुक्ती केली आहे.

संचालक रविंद्र काळे यांना उदगीर नगर परिषद निवडणुकीसाठी काँग्रेस पक्षाने महत्त्वपूर्ण जबाबदारी दिली आहे. पक्ष निरीक्षक म्हणून रविंद्र काळे यांच्यावर निवडणूक तयारीचा आढावा घेण्याची जबाबदारी सोपविण्यात आली आहे. उदगीर शहरातील काँग्रेस पक्षाच्या उमेदवारांची निवड प्रक्रिया, प्रचार यंत्रणा आणि निवडणुकीच्या तयारीचा सविस्तर आढावा घेणे. रणनीती निश्चित करणे,



स्थानिक नेते व कार्यकर्त्यांशी चर्चा करून निवडणुकीची प्रभावी रणनीती तयार करणे आणि त्याची अंमलबजावणी करणे, समन्वय साधणे, स्थानिक गट-तटांमध्ये समन्वय साधणे आणि निवडणुकीच्या तयारी संबंधीचा सविस्तर अहवाल वेळोवेळी पक्षश्रेष्ठींना सादर करणे आदी जबाबदार्या त्यांच्यावर सोपविण्यात आल्या आहेत.

# प्राचार्य उषा कुलकर्णी यांचा न्या. माल्हाटकर यांच्या हस्ते सत्कार



**त.भा. वृत्तसेवा,**

**उदगीर, १२ नोव्हेंबर :** मातृभूमी महाविद्यालयाच्या प्राचार्य उषा कुलकर्णी यांचा जिल्हा व अतिरिक्त सत्र न्यायालयाचे न्यायाधीश डी. बी. माल्हाटकर यांच्या शुभहस्ते सत्कार करण्यात आला. प्राचार्य उषा कुलकर्णी यांनी विधी सेवा समितीच्या वतीने आयोजित व्यसनमुक्तीपर पथनाट्य महाविद्यालयाच्या माध्यमातून सादर केले होते. विधी जागृती रॅलीत मातृभूमी महाविद्याविद्याल राष्ट्रीय सेवा योजना, कस्तुराबाई नर्सिंग स्कूलच्या माध्यमातून जनजागृती केली होती त्याबद्दल जिल्हा जिल्हा न्यायधिश डी. बी. म्हलाटकर यांच्या शुभहस्ते सत्कार करण्यात आला यावेळी

जिल्हा व आतिरिक्तसत्र न्यायधिश डी. बी. म्हालाटकर यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी न्यायाधीश वाय.बी. गमे, सह दिवाणी न्यायाधीश वरिष्ठ, न्यायाधीश के.ए.यादव, न्यायधीश बी.आर. झेंडे, उदगीर तालुका विविध संघाचे अध्यक्ष आनंद मुंढे, उपाध्यक्ष गितानंद अक्कनगीरे आदींची उपस्थिती होती.

मातृभूमी व प्रतिष्ठान शिक्षण प्रसारक मंडळ संचलित मातृभूमी महाविद्यालय कस्तुराबाई नर्सिंग स्कूल व मातृभूमी नर्सिंग स्कूलचे हे सातत्याने शिक्षण व ज्ञानाबरोबरच सामाजिक जाणीवा व संवेदना निर्माण करण्यासाठी विविध उपक्रमाचे आयोजन केले जाते. या कार्याबद्दल न्यायधिश डी बी म्हालाटकर यांच्या हस्ते सत्कार म्हणजे मातृभूमीच्या कार्याचा गौरव असल्याचे मत त्यांनी व्यक्त केले.

## लातूर फार्मसीत मेडसेफ्टी विक जनजागृती

**त.भा. वृत्तसेवा,**

**औसा,१२ नोव्हेंबर :** महाराष्ट्र राज्य फार्मसी परिषद मुंबई यांच्या वतीने मेड सेफ्टी वीक २०२५ जनजागृती अभियानांतर्गत लातूर कॉलेज ऑफ फार्मसी महाविद्यालयात जनजागृती करण्यात आली. या उक्रमांतर्गत आऐषधांच्या सुरक्षिततेबद्दल जागरुकता वाढवणे आणि औषधांच्या दुष्परिणामांची नोंद घेण्याच्या उद्देशाने जनजागृती करण्यात आली. डॉक्टरांशिवाय मेडिकलमधील गोळ्या घेवू नये, असे डॉ. श्रीनिवास बुमरेला यांनी मार्गदर्शन केले.

# निलंगा काँग्रेस निरीक्षकपदी विजय देशमुख यांची निवड

**त.भा. वृत्तसेवा,**

**निलंगा, १२ नोव्हेंबर :** नगर परिषद व नगर पंचायत निवडणूकीच्या निवडणूक आयोगाने केलेल्या घोषणेनंतर सर्वच राजकिय पक्षांनी मतदार संघातील मतदारांचा कानोसा, इच्छुक उमेदवार चाचपणी, इच्छुक उमेदवारांचे उमेदवारी मागणी अर्ज स्वीकारणे, मुलाखती सुरू केल्या असून याकरिता प्रदेश काँग्रेसकडून निरीक्षकांच्या निवडी करण्यात आलेल्या आहेत.

लातूर जिल्ह्यातील निलंगा नगरपरिषद निवडणुकी करिता काँग्रेस पक्षाचे प्रांताध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ, राज्याचे माजी मंत्री दिलीपराव देशमुख, राज्याचे माजी मंत्री, स्थानिक स्वराज्य संस्था निवडणूक विभागीय प्रभारी आ. अमित देशमुख, खा.डॉ. शिवाजी काळगे, जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचे अध्यक्ष धीरज विलासराव देशमुख व प्रदेश काँग्रेसचे उपाध्यक्ष तथा जिल्हा प्रभारी बाळासाहेब देशमुख यांच्या सूचनेनुसार लातूर जिल्हा काँग्रेस कमिटीच्या वतीने ट्वेन्टी वन शुगर्सचे व्हा.चेअरमन विजय



देशमुख यांची जिल्हाध्यक्ष अभय साळुंके यांनी निलंगा नगर परिषद निवडणुकीसाठी निरीक्षक म्हणून निवड केली आहे.

लातूर जिल्हा काँग्रेस पक्षाच्या वतीने प्रसिद्ध करण्यात आलेल्या प्रसिद्धी पत्रकारनुसार,निलंगा नगरपरिषद निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर ही नियुक्ती करण्यात आली असून, या निर्णयामुळे निवडणुकीच्या प्रक्रियेवर बारकाईने लक्ष ठेवले जाणार आहे. विजय देशमुख यांच्या या निवडीमुळे ते पक्षातील सर्वांना सोबत घेऊन निलंगा नगर परिषदेवर काँग्रेसचा झेंडा फडकावणार असा विश्वास अभय साळुंके यांनी व्यक्त केला आहे.

नगर परिषद निवडणूक काळात ट्वेन्टी वन शुगर्सचे व्हा. चेअरमन विजय देशमुख यांचा व्यवस्थापन क्षमता अनुभव, जनसंपर्क निवडणुकीच्या कामकाजात उपयुक्त ठरू शकतो.त्यांच्या नियुक्तीमुळे निवडणुकीच्या प्रक्रियेला अधिक पारदर्शकता आणि निष्पक्षता लाभेल अशी अपेक्षा देखील व्यक्त केली जात असून निवडणुकीच्या दृष्टीने ही एक महत्त्वपूर्ण निवड मानली जात आहे.

# एमपीएससी उत्तीर्ण झालेल्या शिवकुमार पाटील यांचा सत्कार

**त.भा. वृत्तसेवा,**

**शिरूर अनंतपाळ, १२ नोव्हेंबर :** शिरूर अनंतपाळ तालुक्यातील अंकुलगा राणी येथील शिवकुमार सुरेखा चंद्रकांत पाटील यांनी एमपीएससी परीक्षांमध्ये उत्तीर्ण होवून यश संपादन केल्याबद्दल त्यांच्या लहानपणापासूनचे वर्गमित्रच्या वतीने त्याचा भव्य कौटुंबिक सत्कार करण्यात आला.

मित्राबद्दल असलेल्या प्रेमापोटी, आपुलकीने जपलेले मित्रत्वाचे नाते अधिक दृढ व्हावे व आपला वर्गमित्र चांगल्या हुद्द्यावर गेल्यामुळे आनंदित होऊन एक आदर्श घ्यावा असा मित्रपरिवाराच्या वतीने तसेच ग्रामपंचायत, जि.प. शाळा, श्री नृसिंह विद्यालय यांच्या तर्फे जंगी सत्कार अंकुलगा राणी येथील ग्रामपंचायतीच्या प्रांगणात कार्यक्रम घेवून पुढील वाटचालीस शुभेच्छा देण्यात आल्या.

यावेळी भाई बंडाप्पा काळगे यांच्या अध्यक्षतेखाली कार्यक्रम संपन्न झाला.कार्यक्रमासाठी प्रमुख पाहुणे म्हणून लाभलेले नृसिंह विद्यालयाचे मुख्याध्यापक महावरकर बी.एस. यांनी सखोल मार्गदर्शन केले. मी शिक्षक म्हणून अनेक गावात काम करत असताना राणी अंकुलगा गावातील विद्यार्थी रत्नाची खान असलेला भास होत होता. त्याप्रमाणेच शिवकुमार पाटील हा माझा विद्यार्थी हिरा म्हणून चमकला असे गौरोद्गार महावरकर यांनी काढले. यावेळी अनेक मान्यवरांचे शुभेच्छापर भाषणे झाली.

यावेळी सरपंच प्रतिनिधी गणेश गुराळे, माजी सरपंच ग्रा. पं. सदस्य विकास जागले, माजी उपसरपंच रामदास साकोळे, पांडुरंग शेंडगे, ओमकार पाटील, नागेश काळगे, वैशंपायन जागले, महारुद्र स्वामी, गणपती पोतदार, किशन पाटील, बीट अंमलदार राजेंद्र कांबळे, तंटामुक्ती अध्यक्ष बलभीम गुराळे, भालेराव बालाजी, प्राथमिक शिक्षणाचे धडे घेतले त्या जि.प. शाळेचे शिक्षकवृंद तसेच ज्या शाळेतून माध्यमिक शिक्षण घेतले त्या श्री नृसिंह विद्यालयाचे शिक्षक वृंद, तसेच पहिली ते दहावी पर्यंतचे गणेश गुराळे, पत्रकार राजकुमार काळे, संतोष पाटील, नेताजी सूर्यवंशी, शंकर कानडे, महेश मल्लेशे,गंगाधर मल्लेशे, श्रीधर कारभारी, सुनील कांबळे यांच्यासह जिल्हा परिषद शाळा व श्री नृसिंह विद्यालयाचे सर्व विद्यार्थी तसेच गावातील प्रतिष्ठित नागरिक, नातेवाईक, आप्तेष्ट उपस्थित होते. सूत्रसंचालन परमेश्वर बिडवे यांनी केले तर कार्यक्रमाची प्रास्ताविक राजकुमार काळे केले आणि आभार राठोड सोपान यांनी मानले. हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी माधव टोंपे, भाऊराव फुलारी, अमीन मुल्ला यांनी परिश्रम घेतले.



# वडवळ नागनाथ येथील विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य वाटप

**त.भा. वृत्तसेवा,**

**चाकूर, १२ नोव्हेंबर :** चाकूर तालुक्यातील वडवळ नागनाथ येथील पूरग्रस्त कुटुंबातील विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्याचे वाटप वडवळ कलापंढरी संस्था लातूर व क्राय संस्था मुंबई यांच्या संयुक्त विद्यमानाने पूरग्रस्त कुटुंबातील विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य वाटप करण्याचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. या कार्यक्रमात विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य पेन आणि रजिस्टर वाटप करण्यात आले. एकूण ६१ बालकांना शालेय साहित्य वाटप करण्यात आले. त्यात प्राथमिकचे ३६ आणि माध्यमिकचे २५ विद्यार्थी होते.



या कार्यक्रमास अध्यक्ष उपसरपंच बालाजी गंदगे होते. तर प्रमुख पाहुणे म्हणून कलापंढरी संस्थेचे अध्यक्ष बी.पी. सूर्यवंशी आणि प्राचार्य डॉ. माधव गादेकर उपस्थित होते. सामाजिक कार्यकर्ते नरसिंग भुरे, मायाताई सोरटे, कलापंढरी संस्थेचे समन्वयक धनराज पवार, भास्कर राजपेठे तसेच संस्थेच्या कार्यकर्त्या फराणा शेख, सोनी ढेपे उर्फ कोठावदे, विद्यार्थ्यांनी आणि पालक उपस्थित होते.

प्राचार्य डॉ. माधव गादेकर यांनी पालकांनी पाल्यांना उच्च शिक्षण देण्यासाठी प्रोत्साहित करावे आणि विद्यार्थ्यांतील सुप्त कलागुण ओळखून त्यांना वाव दिले पाहिजे असे प्रतिपादन केले. सामाजिक कार्यकर्ते नर्सिंग भुरे यांनी कला पंढरी संस्थेच्या वतीने चालवणाऱ्या ऍक्टिव्हिटी सेंटरमुळे विद्यार्थ्यांमध्ये जे बदल झाले आणि संस्थेचं काम गावात कशा पद्धतीने चालवले जाते यावर प्रकाश टाकला.कलापंढरी संस्थेचे अध्यक्ष बी.पी. सूर्यवंशी यांनी वडवळ व परिसरातील बालकांच्या हितासाठी कलापंढरी संस्था नेहमी पुढाकार घेईल आणि विद्यार्थ्यांच्या विकासांना चालना देण्याचे काम नेहमी करेल असे मत व्यक्त केले.

या कार्यक्रमाचे सूत्रसंचलन क्रिस्टी कसबे यांनी केले. प्रास्ताविक धनराज पवार यांनी मांडले. कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन भास्कर राजपेठे यांनी मानले.

# प्रकाश शिंदे यांचे निधन

**त.भा. वृत्तसेवा,**

**देवणी, १२ नोव्हेंबर :** येथील फुले शाहू आंबेडकरी चळवळीतील जेष्ठ नेते प्रभावी व्यक्तिमत्व प्रकाशजी नरसिंगराव शिंदे यांचे अल्पशा आजाराने निधन झाले ते ६० वर्षाचे होते.

त्यांनी दलित पँथर ते आज तागायत फुले शाहू आंबेडकरी विचारासाठी बांधील राहून अन्याय अत्याचाराच्या विरोधात लढत राहिले. त्यांचा सर्वच महापुरुषांच्या जयंती व त्याच्या वैचारिक प्रबोधनाच्या विविध कार्यक्रम अंतर्गत विचाराचे अदान प्रदान कार्यक्रमात ते कायम सक्रिय राहिले.

एक मित भाषी मनमिळाऊ व्यक्तिमत्व म्हणून त्यांच्याकडे पहिले गेले त्यांच्या अचानक



निघून जाण्याने आंबेडकरी चळवळीची हानी झाली आहे. त्यांच्या पश्चात पत्नी दोन मुली एक मुलगा असा परिवार आहे.

या शिंदे परिवारावर दुःखाचा डोंगर पसरला आहे त्यातून सावरण्याची बुद्धी देवो हिच गौतम बुद्धा चरणी प्रार्थना मी व माझ्या गायकवाड परिवाराकडून त्यांना भावपुर्ण श्रद्धांजली करतो.



**आ. प्रशांतजी बंब यांनी आज वेरूळ येथील समंतभद्र विद्यामंदिर येथे शाळेला भेट घेऊन विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले यावेळी भाजपचे छत्रपती संभाजी नगर जिल्हा उपाध्यक्ष प्रकाश वाकळे घृष्णेश्वर देवस्थान अध्यक्ष कुणाल दांडगे जिल्हा सरचिटणीस गणेश हजारी ज्ञानेश्वर नलावडे राजेंद्र बडे प्रेमचंद पाटणी मुख्याध्यापक गुलाबचंद बोराळकर क्रीडा शिक्षक आशिष कानडे सचिन अन्नदाते मान्यवरांची उपस्थिती होती.**

## भव्य इंडिया टूर २०२५ साठी सहयोग

बेंगळुरू,: टोयोटा किर्लोस्कर मोटरने जपानमधील जागतिक स्तरावर प्रशंसित परफॉर्मन्स ग्रुप ड्रम टाओसोबत सहयोगाने आज ड्रम टाओ इंडिया टूर २०२५ साठी अधिकृत वेळापत्रकाची घोषणा केली. या सहयोगामधून कलात्मक उत्कृष्टता आणि आंतर सांस्कृतिक संबंधाचे संयोजन दिसून येते, जेथे दोन देश एकत्र आले आहेत, जे परंपरा, नाविन्यता आणि सर्जनशीलतेप्रती आदर व्यक्त करतात. टोयोटाचा ड्रम टाओसोबत सहयोग ब्रँडचे तत्त्व 'मोबिलिटी फॉर ऑल' सादर करतो, जेथे संबंध गतीशीलतेपलीकडे जात संकल्पना, सर्जनशीलता आणि मानवी उत्साहाला चालना देतात. या सहयोगाच्या माध्यमातून टीकेएम जपान व भारतामधील संबंधाला साजरे करते, सांस्कृतिक व्यवहार आणि भारतातील तरूणांसोबत अर्थपूर्ण सहभागाला चालना देते.

## सिम्बॉयसिस एमबीए अभ्यासक्रमासाठी अर्ज करण्याची अखेरची संधी

मुंबई : सिम्बॉयसिस इंटरनॅशनल (अभिमत विद्यापीठ)तर्फे त्यांच्या सिम्बॉयसिस नॅशनल ॲप्टिट्यूड (स्नॅप) टेस्ट २०२५ च्या नोंदणीसाठी २० नोव्हेंबर ही अंतिम तारीख जाहीर करण्यात आली आहे. एमबीए इच्छुकांसाठी ही राष्ट्रीय पातळीवरील प्रवेश परीक्षा आहे. उत्कृष्ट शैक्षणिक कारकिर्दीच्या पाच दशकांहून अधिक अनुभवासह सिम्बॉयसिस हा मॅनेजमेंट शिक्षण घेऊ इच्छिणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी कायमच प्राधान्यक्रम राहिला आहे. कारण, हा अभ्यासक्रम जागतिक पातळीशी सुसंगत, उद्योगक्षेत्राशी संबंधित आणि सखोल अभ्यास असलेला आहे. यानंतर अर्ज करण्यासाठी अधिक मुदत दिली जाणार नाही.इच्छुकांनी अंतिम तारखेच्या आधी त्यांच्या अर्जाची प्रक्रिया पूर्ण करावी असे आवाहन करण्यात आले आहे. ही कम्प्युटर-बेस्ड टेस्ट (सीबीटी) तीन तारखांना घेतली जाईल आणि उमेदवारांना तीन वेळा परीक्षा देता येईल. प्रवेश प्रक्रियेसाठी यातील सर्वोत्तम गुण ग्राह्य धरले जातील.

## डिजिटल इन्शुरर ऑफ द इयर पुरस्कार जिंकला

मुंबई : भारतातील अग्रगण्य नवयुगीन डिजिटल फुल-स्टॅक विमा कंपनी गो डीजिट जनरल इन्शुरन्स लिमिटेड (डिजिट इन्शुरन्स) ने जाहीर केले की तिला सिंगापूर येथे झालेल्या आशिया इन्शुरन्स इंडस्ट्री अवॉर्ड्स (एआयआयए) २०२५ मध्ये दोन पुरस्कार मिळाले आहेत. कंपनीला डिजिटल इन्शुरर ऑफ द इयर पुरस्काराने सन्मानित करण्यात आले, तर व्यवस्थापकीय संचालक आणि मुख्य कार्यकारी अधिकारी जसलीन कोहली यांना वूमन लीडर ऑफ द इयर पुरस्कार मिळाला, ज्यामुळे त्या हा सन्मान मिळवणाऱ्या पहिल्या भारतीय महिला ठरल्या.

## मोटर क्सिडेंट इन्श्युरन्स घोटाळ्याचा पर्दाफाश

नाशिक : भारतातील आघाडीची खासगी जनरल इन्श्युरन्स कंपन्यांपैकी एक असलेल्या बजाज जनरल इन्श्युरन्स लिमिटेडने (पूर्वीची बजाज आलियान्झ जनरल इन्श्युरन्स कंपनी) बनावट थर्ड-पार्टी नुकसानभरपाईच्या दाव्याच्या आधारे २५ कोटींच्या मोटर क्सिडेंट इन्श्युरन्स फसवणुकीचा यशस्वीपणे पर्दाफाश केला आहे. भूज येथील मोटर अपघात दावा लवाद (च-उढ) मध्ये सादर केलेली बनावट एफआयआर आणि दिशाभूल करणाऱ्या कागदपत्रांच्या माध्यमातून ही फसवणूक उजेडात आली.

## बलिदानाविषयीच्या पारंपरिक कल्पनेला शह


स्वतःचे बलिदान देणाऱ्या महिलेचे चित्रण करण्याची टेलिव्हिजनची परंपरा मोडीत काढत सोनी सबवरील 'इत्ती सी खुशी' मालिकेने अन्विता (सुंबुल तौकीर खान) ही व्यक्तिरेखा सादर केली आहे, जी परंपरेचा विरोध करण्याचे धाडस दाखवते. एरवी टीव्ही मालिकांमधील महिला या त्यागमूर्ती आणि अत्यंत सोशिक असतात. पण, या मालिकेत अन्विताने आपल्या वडिलांना लिव्हर दान करण्यासाठी आपण पात्र असल्याचे कळल्यानंतरही ते दान न करण्याचा धाडसी निर्णय घेतला आहे. तिचे वडील अत्यंत गंभीर स्थितीत आहेत आणि तातडीने लिव्हर ट्रान्सप्लांट केल्यानेच ते जगू शकणार आहेत. पण अन्विता भावनेच्या भरात निर्णय घेत नाही. उलट, ती परिणामांचा शांतपणे विचार करते - खास करून तिच्यावर अवलंबून असलेल्या आपल्या पाच धाकट्या भावंडांचा विचार करते. तिच्यासाठी तिचे स्वतःचे आरोग्य जपणे हा स्वार्थी विचार नसून आपल्या कुटुंबाचे भविष्य सुरक्षित करण्याचा मार्ग आहे.

## २५ कोटींच्या मोटर क्सिडेंट इन्श्युरन्स फसवणुकीचा यशस्वीपणे पर्दाफाश

पुणे : भारतातील आघाडीची खासगी जनरल इन्श्युरन्स कंपन्यांपैकी एक असलेल्या बजाज जनरल इन्श्युरन्स लिमिटेडने (पूर्वीची बजाज आलियान्झ जनरल इन्श्युरन्स कंपनी) बनावट थर्ड-पार्टी नुकसानभरपाईच्या दाव्याच्या आधारे २५ कोटींच्या मोटर क्सिडेंट इन्श्युरन्स फसवणुकीचा यशस्वीपणे पर्दाफाश केला आहे. भूज येथील मोटर अपघात दावा लवाद मध्ये सादर केलेली बनावट एफआयआर आणि दिशाभूल करणाऱ्या कागदपत्रांच्या माध्यमातून ही फसवणूक उजेडात आली. भारतीय दंडविधान संहिता आणि मोटर वाहन कायदा अंतर्गत साणंद पोलीस स्थानकात एफआयआर दाखल करण्यात आली होती. तक्रार दाखल केलेल्या कथित वाहनचालकाने असे दावा केला होता की, आपण (वाहनचालक) महिंद्रा झायलो हे वाहन चालवित असताना रस्त्यावर समोरुन अचानक कुत्रा आल्याने गाडी पलटली. तसेच त्याने तक्रारीत असे म्हटले होते की, गाडीतील सह-प्रवासाला अपघातात जीवघेणी दुखापत झाली आणि त्याला साणंद सरकारी रुग्णालयात दाखल केले असता मृत घोषित करण्यात आले.

## आईक्यू ने २० नोव्हेंबरपासून आईक्यू १५ साठी प्री-बुकिंगची घोषणा केली आहे

नवी दिल्ली, १२ नोव्हेंबर, २०२५: उच्च-कार्यक्षमता असलेला स्मार्टफोन ब्रँड,आईक्यू २६ नोव्हेंबर रोजी आईक्यू१५ लाँच करण्यासाठी सज्ज आहे. स्मार्टफोन इनोव्हेशनमध्ये नवीन मानके स्थापित करत,आईक्यू १५ प्रीमियम कामगिरीसह प्रगत कॅमेरा, सॉफ्टवेअर क्षमता आणि एआय क्षमता, एक आकर्षक डिझाइन, विस्तारित बॅटरी लाइफ आणि इमर्सिव्ह डिस्प्ले तंत्रज्ञानाचा मेळ घालते जे एक अतुलनीय स्मार्टफोन अनुभव प्रदान करते. आईक्यू १५ ची प्री-बुकिंग २० नोव्हेंबर २०२५ पासून सुरू होईल. ग्राहक त्यांचा फोन प्री-बुक करण्यासाठी १००० रुपये परत करण्यायोग्य रक्कम देऊन प्रायोरिटी पास मिळवू शकतात. प्रायोरिटी पाससह, तुम्हाला विशेष प्री-बुकिंग फायदे देखील मिळतील, ज्यामध्ये आईक्यू टीडब्ल्यूएस १ई इयरबड्सची एक मोफत जोडी आणि १२ महिन्यांची वाढीव वॉरंटी समाविष्ट आहे. प्रायोरिटी पास मर्यादित आहेत आणि प्रथम येणाऱ्यास प्रथम प्राधान्य या तत्त्वावर दिले जातील.



## सौ. मनीषा श्याम जोशी यांचे निधन

तभा वृत्तसेवा,

बिडकीन - दि. १२ नोव्हेंबर-बिडकीन येथील सौ. मनीषा श्याम जोशी (वय ४५ वर्ष) यांचे आज दि. १२ नोव्हेंबर रोजी दुपारी चार वाजता दुःखद निधन झाले. त्यांच्या पार्थिवावर आज रात्री आठ वाजता शेकटा रोडवरील अमरधाम स्मशानभूमी येथे अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या पश्चात पती, दोन मुले, दिर व सासू असा परिवार आहे. त्या श्याम जोशी (देवा) यांच्या पत्नी होत.

# ग्राहकाभिमुख सेवा देण्यासाठी युनियन बँक ऑफ इंडिया कटिबद्ध : सुनिल कुमार यादव

## १०७ व्या स्थापना दिनानिमित्त ग्राहक मेळावा संपन्न



अहिल्यानगर : सार्वजनिक क्षेत्रातील बँकांमध्ये देशात ०५ व्या स्थानावर असलेली युनियन बँक ऑफ इंडिया चौफेर प्रगती करत असून अत्याधुनिक तंत्रज्ञानाच्या माध्यमातून ग्राहकाभिमुख सेवा देण्यात कटिबद्ध असल्याचे प्रतिपादन युनियन बँक ऑफ इंडियाच्या अहिल्यानगर क्षेत्रीय कार्यालयाचे प्रमुख सुनिलकुमार यादव यांनी केले. बँकेच्या १०७ व्या स्थापना दिनानिमित्त आयोजित ग्राहक मेळाव्यात श्री यादव बोलत होते.

बँकेच्या स्थापनेविषयी सांगताना ते म्हणाले की, बँकेची स्थापना ११ नोव्हेंबर १९१९ रोजी झाली. शेठ सिताराम पोतदार हे प्रवर्तक होते. मुख्यालयाच्या इमारतीचे उद्घाटन राष्ट्रपिता महात्मा गांधी यांच्या हस्ते १९२१ मध्ये झाले.

आज बँकेच्या ८६०० हून अधिक शाखा आहेत. ९००० हून अधिक एटीएम, २५ हजाराहुन अधिक बीसी पॉईंट्स, ७५ हजारहून अधिक कर्मचारी आहेत.

बँकेच्या प्रगती विषयी श्री यादव यांनी सांगितले की,

सप्टेंबर २०२५ अखेर बँकेचा एकूण व्यवसाय २२.०९ लाख कोटी आहे. यामध्ये १२.३४ लाख कोटींच्या ठेवी व ९.७५ लाख कोटींचे कर्ज वितरण आहे. बँकेचा शाखा विस्तार परदेशात देखील असून हाँगकाँग येथे ३, दुबई इंटरनॅशनल फायनान्शिअल सेंटर व सिडनी ऑस्ट्रेलिया येथे प्रत्येकी १, अबुधाबी येथे प्रतिनिधी कार्यालय, लंडन, मलेशिया आदी ठिकाणी शाखा विस्तार आहे.

अशा या गौरवशाली १०७ वर्षांची परंपरा असलेल्या युनियन बँक ऑफ इंडियाच्या प्रगतीमध्ये सर्व खातेदार ग्राहक, कर्जदार, अधिकारी व कर्मचारी यांचे योगदान मोलाचे असल्याचे

यावेळी श्री यादव म्हणाले.

१०७ व्या स्थापना दिनानिमित्त मुंबई येथे आयोजित ग्राहक मेळाव्यामध्ये

भारत सरकारच्या अर्थ मंत्रालयाच्या आर्थिक सेवा विभागाचे सचिव एम. नागाराजू हे प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित होते. त्यांच्या शुभहस्ते व्यावसायिकांसाठी अत्यंत उपयुक्त असलेल्या युनियन बीझ या मोबाईल पचे तर रिटेल ग्राहकांसाठी युनियन इझ या मोबाईल पचे लॉन्चिंग करण्यात आले. याच बरोबर देशातील ५१ नवीन शाखांचे ऑनलाइन उद्घाटन एम. नागाराजू यांचे हस्ते करण्यात आले. यामध्ये अहिल्यानगर एमआयडीसी नागापूर येथील शाखेचा समावेश आहे. विकसित भारत २०४७ या भारत सरकारच्या महत्त्वाकांक्षी उपक्रमामध्ये युनियन बँक ऑफ इंडिया महत्त्वपूर्ण भूमिका बजावेल, असा विश्वास देखील एम. नागाराजू यांनी यावेळी व्यक्त केला.

मुंबई येथे झालेल्या कार्यक्रमाचे थेट प्रक्षेपण अहिल्यानगर येथील ग्राहक मेळाव्याच्या वेळी करण्यात आले. यावेळी उप क्षेत्रप्रमुख अमित कुमार सिन्हा, सुभाष गजभिये यांसह विविध शाखा प्रमुख, विभाग प्रमुख अधिकारी - कर्मचारी, ग्राहक, शुभचिंतक, कर्जदार, खातेदार आदी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# कन्नड पंचायत समिती शिक्षण विभागात दिव्यांग विद्यार्थ्यांसाठी ॲलिम्को मोजमाप व साहित्य वाटप शिबिर संपन्न

तभा वृत्तसेवा

कन्नड : दि.१२ नोव्हेंबर - पंचायत समिती शिक्षण विभागाच्या वतीने दिव्यांग विद्यार्थ्यांसाठी ॲलिम्को मोजमाप व साहित्य साधन वाटप शिबिराचे आयोजन करण्यात आले. या शिबिरात तालुक्यातील विविध शाळांमधील दिव्यांग विद्यार्थ्यांना त्यांच्या गरजेनुसार सहाय्यक साहित्याचे वितरण करण्यात आले.

या उपक्रमात एकूण ६१ दिव्यांग विद्यार्थ्यांना साहित्य साधनांचे वाटप करण्यात आले, तर ८१ विद्यार्थ्यांचे मोजमाप घेण्यात आले. कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान शिक्षण विस्तार अधिकारी दिवेकर यांनी भूषविले, तर प्रमुख पाहुणे म्हणून जिल्हा समन्वयक (समावेशित शिक्षण) गणेश बेडके उपस्थित होते.



कार्यक्रमात मान्यवरांनी विद्यार्थ्यांना प्रोत्साहन देत सांगितले की, दिव्यांग विद्यार्थी हे समाजाचे अविभाज्य घटक आहेत. योग्य प्रोत्साहन, शिक्षणसुविधा आणि प्रेम मिळाल्यास ते उज्ज्वल भविष्य घडवू शकतात. समाजाने त्यांच्या विकासासाठी संवेदनशीलतेने योगदान द्यावे.

साहित्य मिळाल्यानंतर विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावर आनंद झळकला. पालकांनी शिक्षण विभाग व प्रशासनाचे मनःपूर्वक आभार मानले.

शिबिर यशस्वी रित्या पार पडण्यासाठी जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी, शिक्षणाधिकारी, उपशिक्षणाधिकारी आणि गटशिक्षणाधिकारी यांच्या मार्गदर्शनाखाली समावेशित शिक्षण विभागातील नितीन वाघ, कडुबा भुसारी, उत्तम आघाडे, प्रशांत अहिरराव, प्रविण वाकेकर, अयुब सय्यद, युनूस सय्यद, असिफ शेख, निलम परदेशी, अलका गंगुले, दीपा पवार, खुशाल राठोड तसेच सर्व केंद्रप्रमुख व केंद्रीय मुख्याध्यापक यांनी योगदान दिले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन उत्तम आघाडे यांनी केले, तर आभार प्रदर्शन प्रविण वाकेकर यांनी मानले.

# १३ डिसेंबर रोजी जिल्ह्यातील सर्व न्यायालयांमध्ये राष्ट्रीय लोकअदालतीचे आयोजन

अहिल्यानगर, दि. १२ :* राष्ट्रीय विधी सेवा प्राधिकरण, सर्वोच्च न्यायालय, नवी दिल्ली यांच्या निर्देशानुसार, अहिल्यानगर जिल्ह्यातील सर्व न्यायालयांमध्ये शनिवार, दि. १३ डिसेंबर २०२५ रोजी राष्ट्रीय लोकअदालतीचे आयोजन करण्यात येणार आहे.

या लोकअदालतीत मोटार वाहन अपघात प्रकरणे, कौटुंबिक प्रकरणे, वीज वितरण कंपनीशी संबंधित प्रकरणे, दिवाणी तसेच तडजोडपात्र फौजदारी प्रकरणे, तसेच बँका आणि वीज वितरण कंपन्यांची दाखलपूर्वीची प्रकरणे यांचा समावेश करण्यात येणार आहे. याशिवाय कौटुंबिक न्यायालय, औद्योगिक न्यायालय, कामगार न्यायालय, सहकार न्यायालय आणि ग्राहक तक्रार निवारण मंचातील प्रकरणे देखील या लोकअदालतीत तडजोडीसाठी ठेवण्यात येणार आहेत.

लोकअदालतीमध्ये प्रकरण तडजोडीने मिटविल्यास संबंधित पक्षकारास भरलेली न्यायालयीन फी परत मिळते. नागरिकांनी आपापसातील वाद सामोपचाराने मिटवून वेळ, पैसा आणि मानसिक ताणतणाव वाचवावेत, असे आवाहन करण्यात आले आहे.

# 'अमृत दुर्गोत्सव'ची विश्वविक्रमाला गवसणी!!

पुणे (दिनांक १० नोव्हेंबर २०२५) : महाराष्ट्र संशोधन, उन्नती व प्रशिक्षण प्रबोधिनी (अमृत) या महाराष्ट्र शासनाच्या स्वायत्त संस्थेने ऐतिहासिक कामगिरी करत विश्वविक्रमी झेप घेतली आहे. 'अमृत' मार्फत या दिवाळीत ''अमृत दुर्गोत्सव २०२५' हा एक आगळावेगळी उपक्रम राबविण्यात आला.

या उपक्रमाचा उद्देश महाराष्ट्राचे आराध्य दैवत छत्रपती शिवाजी महाराजांचे शौर्य, पराक्रम, संस्कृती रक्षण, स्वभाषा, स्वधर्म यासारख्या अनेक गुणांना उजाळा देऊन अनेकांच्या मनावर सुसंस्कार करणे, या दृष्टीने समाजमन घडविणे आणि शिवाजी महाराजांना विश्वविक्रमी मानवंदना देणे हा होता. यासाठी महाराजांच्या पराक्रमाची साक्ष असलेले आणि युनेस्कोने जागतिक वारसा स्थळ म्हणून घोषित केलेल्या बारा दुर्गांपैकी कोणत्याही एकाची प्रतिकृती अंगणात, सोसायटी, शाळेत, मैदानात तयार करून त्यासोबत फोटो घेऊन तो ''अमृत दुर्गोत्सव २०२५' च्या वेबसाईटवर अपलोड करायचा होता. सहभागी होणाऱ्या प्रत्येकास माननीय मुख्यमंत्री यांच्या स्वाक्षरीचे अभिनंदन पत्र मिळणार होते.

अमृतचे व्यवस्थापकीय संचालक मा. विजय जोशी यांचे उत्तम नियोजन आणि अमृत कर्मचाऱ्यांच्या प्रचंड मेहनतीच्या जोरावर हा केवळ शासकीय उपक्रम न राहता त्याला लोकोत्सवाचे रूप प्राप्त झाले. महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यातून मिळालेला उत्स्फूर्त प्रतिसाद, शेजारील राज्ये, इतकेच काय अमेरिका, इंग्लंड, आखाती देशातून मिळालेला भावनिक प्रतिसाद याद्वारे ''अमृत दुर्गोत्सवात' प्रचंड प्रमाणात दुर्गांसोबत घेतलेले फोटो जमा झाले. ही संख्या इतकी प्रचंड होती की या गोष्टीची नोंद 'गिनीज वर्ल्ड रेकॉर्ड' या विश्वविक्रमांची नोंदणी करणाऱ्या जगातील सर्वात प्रतिष्ठित संस्थेने घेतली.

'मानवी हातांनी तयार केलेल्या प्रतिकृतींचा सर्वात मोठा डिजिटल फोटो अल्बम' या श्रेणीमध्ये 'अमृत दुर्गोत्सवात' विश्वविक्रम झाल्याचे प्रमाणपत्र गिनीज वर्ल्ड रेकॉर्ड' चे -वर्क्षीवळलर्री प्रतिनिधी श्री. प्रवीण पटेल यांच्या हस्ते अमृतचे व्यवस्थापकीय संचालक मा. विजय जोशी यांना सुपूर्द केले.

यावेळी बोलताना 'गिनीज वर्ल्ड रेकॉर्ड ' चे अधिकृत पंच श्री प्रवीण पटेल यांनी सदर विश्वविक्रमाची कठीण तपासणी प्रक्रिया सर्वांपुढे मांडली.

# एमजीएम वैद्यकीय महाविद्यालयात 'आशाछाया' कार्यशाळा संपन्न

छत्रपती संभाजीनगर, दि.१२: महात्मा गांधी मिशन वैद्यकीय महाविद्यालय आणि रुग्णालयातील ट्युलिप ब्रेस्ट सेंटर आणि जिल्हा आरोग्य अधिकारी कार्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित 'आशाछाया' स्तन कर्करोग प्रशिक्षण कार्यशाळा अत्यंत उत्साहात पार पडली. समाजातील महिलांच्या स्तन आरोग्याबद्दल जागरूकता वाढविण्याच्या आणि स्तन कर्करोगाचे निदान लवकर व्हावे, ह्या उद्देशाने आयोजित या कार्यशाळेला जिल्ह्यातील विविध प्राथमिक आरोग्य केंद्रांमधील तालुका आरोग्य अधिकारी, वैद्यकिय अधिकारी आणि आशा संचालक असे सुमारे १८० जण सुमारे उपस्थित होते.



उद्घाटन सोहळा टाटा हॉस्पिटल मुंबईचे माजी संचालक पद्मश्री डॉ.राजेंद्र बडवे, एमजीएमचे उपाध्यक्ष डॉ.पी.एम. जाधव आणि दुरदृशप्रणालीद्वारे टाटा हॉस्पिटलचे माजी शैक्षणिक संचालक डॉ.कैलाश शर्मा यांच्या प्रमुख उपस्थितीत संपन्न झाला. यावेळी, डॉ.अरविंद गायकवाड, शासकिय कर्करोग रूग्णालय जिल्हा प्रजनन व बाल आरोग्य अधिकारी डॉ.विशाल बेंद्रे, अतिरिक्त जिल्हा अधिकारी डॉ. सावरगावकर, एमजीएम वैद्यकीय महाविद्यालयाचे अधिष्ठाता डॉ. राजेंद्र बोहरा, इंडियन कॅन्सर सोसायटीचे डॉ.प्रसाद राणे, एन्ड्रेस ॲन्ड हौसरच्या चीफ फायनान्स ऑफीसर स्मिता भारतीया यांच्या प्रमुख उपस्थितीत दीपप्रज्वलन करण्यात आले.

प्रास्ताविकात ट्युलिप ब्रेस्ट सेंटरच्या संस्थापक आणि प्रोजेक्ट डायरेक्टर डॉ.अरुणा कराड यांनी कार्यशाळेचे उद्दिष्ट आणि महत्त्व सांगितले. त्यांनी सांगितले की, स्तन कर्करोगावर मात करण्यासाठी जागरूकता, तपासणी आणि योग्य वेळी उपचार हेच सर्वात प्रभावी शस्त्र आहेत. आशा कार्यकर्त्या या समाजातील प्रत्येक घरापर्यंत आरोग्यसंदेश पोहोचवणाऱ्या खऱ्या आरोग्यदूत आहेत.

कार्यक्रमादरम्यान डॉ. आशुतोष तोंडारे (स्तन विकार तज्ञः,प्रोजेक्ट डायरेक्टर, ट्युलिप ब्रेस्ट सेंटर) यांनी क्लिनिकल ब्रेस्ट एक्झामिनेशनचे प्रात्यक्षिक सादर केले. उपस्थित प्रतिनिधींनी प्रत्यक्ष प्रशिक्षण घेतले आणि त्यांच्या अनेक शंकांचे निरसनही यावेळी करण्यात आले. स्तनाच्या अचूक परीक्षणाने, कर्करोग लवकर शोधून जीव आणि स्तन दोन्ही वाचवले जावू शकतात, असे डॉ.आशुतोष यांनी सांगितले.

कार्यशाळेदरम्यान ब्रेस्ट कॅन्सरची लक्षणे, तपासणी पद्धती, प्रतिबंधात्मक उपाय आणि उपचार पर्याय या विषयांवर सविस्तर माहिती देण्यात आली. या कार्यशाळेबाबत उपस्थितांनी अत्यंत सकारात्मक अभिप्राय दिला. अनेक सहभागींनी सांगितले की, या कार्यशाळेमुळे त्यांना प्रत्यक्ष काम करताना अधिक आत्मविश्वास आणि ज्ञान मिळाले आहे.

या कार्यक्रमाचे संपूर्ण आयोजन आणि मार्गदर्शन डॉ. अरुणा कराड आणि डॉ.आशुतोष तोंडारे यांनी केले. या यशस्वी उपक्रमामुळे छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यात स्तन कर्करोगविषयी जनजागृती आणि प्राथमिक आरोग्यसेवेत कार्यरत आशा कार्यकर्त्यांचे प्रशिक्षण या दोन्ही क्षेत्रांत एक नवा अध्याय सुरू झाला आहे.

# सेंट्रल बँक ऑफ इंडियाच्या वतीने १४ नोव्हेंबरला संगमनेर येथे शेतकरी मेळाव्याचे आयोजन

## विविध कृषी योजनांची माहिती मिळणार

अ.नगर : देशाची पहिली स्वदेशी बँक आणि राष्ट्रीयकृत बँक सेंट्रल बँक ऑफ इंडियाच्यावतीने १४ नोव्हेंबरला संगमनेर येथे शेतकरी मेळाव्याचे आयोजन करण्यात आले असल्याची माहिती जिल्हा अग्रणी प्रबंधक आशिष नवले यांनी दिली.


सेंट्रल बँक ऑफ इंडियाच्या वतीने देशभरात क्रेडिट आऊटरीच कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. याद्वारे शेतकरी बांधवांना कृषी क्षेत्रासंदर्भात जनजागृती व बँकेच्या विविध कृषी योजना यासंदर्भात माहिती दिली जाणार असून या कार्यक्रमासाठी सेंट्रल बँक ऑफ इंडियाचे अहमदनगर क्षेत्रीय प्रमुख राजीव नयन यांचेसह बँकेचे वरिष्ठ अधिकारी, प्रशासनातील विविध मान्यवर उपस्थित राहणार आहेत. संगमनेर तालुक्यातील जोर्वे येथील शिव ओंकार पॅलेस

येथे आयोजित करण्यात आलेल्या या मेळाव्यात शेतकरी बांधवांनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे असे आवाहन

जिल्हा अग्रणी बँक प्रबंधक आशिष नवले यांनी केले आहे.

मेळाव्यात शेतकऱ्यांना कृषी कर्ज, पीक कर्ज, पशुसंवर्धन, शेतीमाल प्रक्रिया, व नवोन्मेषी कृषी तंत्रज्ञान नवीन कृषी योजना, बँकिंग कृषी कर्ज योजना,सेंट पोल्ट्री योजना सेंट कोल्ड स्टोरेज ,सेंट फूड प्रोसेसिंग, आणि ग्रामीण आजीविका योजना याविषयी माहिती दिली जाणार आहे.

# स्मार्ट सुनबाई २१ नोव्हेंबर पासून आपल्या भेटीला



छत्रपती संभाजीनगर - १५०० रुपयांचा महिला बचत गट कुठल्या कुठे जातो यावर आधारित चित्रपटाचे कथानक , हास्य,थरार आणि गुढतेने भरलेला शिवाजी दोलताडे दिग्दर्शित आणि गोवर्धन दोलताडे, गार्गी निर्मित, कार्तिक दोलताडे पाटील सह निर्मित हास्य, स्मार्ट सुनबाई २१ नोव्हेंबर २०२५ ला संपूर्ण महाराष्ट्रात प्रदर्शित होणार आहे.

संतोष जुवेकर, रोहन पाटील, भाऊ कदम, किशोरी शहाणे, सायली देवधर, मोहन जोशी, दीपक शिर्के, प्राजक्ता हनमघर, प्राजक्ता गायकवाड, उषा नाईक, अंशुमन विचारे, स्नेहल शिदम, विनम बाबल, भक्ती चव्हाण, दीप्ती सोनवणे, अनुष्का बेनके, पूजा राजपूत, सुचिका जोशी, विद्या मेहेत्रे, मोनिका बंगाळ, आर्या सकुंडे, वैशाली चौधरी, सपना पवार, कांचन चौधरी हे लोकप्रिय कलाकार या सिनेमात झळकणार असून, त्यांची केमिस्ट्रीच या चित्रपटाची खरी जमेची बाजू ठरणार आहे.

चित्रपटाची कथा आणि लेखन योगेश शिरसाट यांनी केले असून, विजय नारायण गवंडे, साई-पियुष यांनी या सिनेमाला बहारदार संगीताची साथ दिली आहे.

गीतकार वैभव देशमुख, अदिती उविड असून अजय गोगावले, वैशाली माढे, आनंदी जोशी, सावनी रवींद्र, उर्मिला धनगर यांचे सुरेल स्वर या सिनेमाला लाभले आहेत. प्रेक्षकांच्या मनात उत्सुकतेची लाट निर्माण करणारा हा नवीन सिनेमा लवकरच मोठ्या पडद्यावर उलगडणार आहे. शिवाजी दोलताडे दिग्दर्शित आणि गोवर्धन दोलताडे, गार्गी निर्मित चित्रपट स्मार्ट सुनबाई २९ नोव्हेंबरपासून संपूर्ण महाराष्ट्रात प्रेक्षकांच्या भेटीला येतोय.

# वेरूळ येथे प पू १०८ नियम सागर महाराज संघ यांचा पिंछी परिवर्तन कार्यक्रम १२ नोव्हेंबर रोजी



छत्रपती सभाजीनगर श्री पार्श्वनाथ ब्रम्हचारी आश्रम जैन गुरुकुल मध्ये परमपूज्य १०८ विद्यासागर महाराज यांचे परम शिष्य निर्यापक मुनिश्री नियम सागर महाराज, अभिनंदन सागर, महाराज, ऋषभ सागर महाराज व सुपार्श्वसागर महाराज यांचा गत चार महिन्यांपासून सुरू आहे.

चातुर्मास पर्वाचा अंतिम समापनाच्या निमित्ताने दिनांक १२ नोव्हेंबर रोजी दुपारी एक वाजता पिंछी परिवर्तन कार्यक्रमाचे भव्य स्वरूपात आयोजन करण्यात आले आहे.

यावेळी महाराजांच्या पिंछी प्राप्त करण्याचा मान संयम धारी श्रावकाला प्राप्त होणार आहे. या निमित्ताने प पू १०८ नियम सागर महाराज अभिनंदन सागर महाराज वृषभ सागर महाराज व सुपार्श्वसागर महाराज यांच्या मंगलमय प्रवचनाचा लाभ प्राप्त होणार आहे, तरी या कार्यक्रमाला जास्तीत जास्त संख्येने उपस्थित राहण्याचे आवाहन चातुर्मास कमिटीचे अध्यक्ष दिनेश गंगवाल संयोजक नवीन पाटणी, महामंत्री डॉ प्रेमचंद पाटणी, सुमित ठोले, मदनलाल पांडे, निर्मल कुमार ठोले, महेंद्र दगडफोडे ,गौतमचंद ठोले गुलाब चद बोराळकर रानुजैन यांनी केले आहे या कार्यक्रमासाठी चे संपूर्ण नियोजन बाल ब्रह्मचारी पंडित मनीष भैया यांच्या मार्गदर्शनात होणार आहे. यावेळी महाप्रसादाचे देखील आयोजन करण्यात आले आहे.अशी माहिती अतुल बादे पियूशकासलीवाल नरेंद्र अजमेरा यानी दिली .

जा.क्र./नपंसो/नामांतर/२०२५/२०२६ कार्यालय नगर पंचायत सोयगांव
दिनांक : ११-११-२०२५

## जाहीर प्रगटन

सर्व जनतेस याद्वारे कळविण्यात येते की, **अनिल सखाराम जोहरे** यांनी मोहल्ला **योगेश्वर बिल्डर्स ॲन्ड डेव्हलपर्स** सोयगांव स.नं. ----- मधील प्लॉट **१९०४** त्यांचे नांवे मालमत्ता कर रजिस्टरला नोंद घेणेसाठी या कार्यालयात अर्ज दाखल केला आहे. अर्जानुसार जागेची चतु:सीमा खालील प्रमाणे आहे.

**पूर्व : रो. हाऊस नंबर १४ बी पश्चिम : लागू गट नंबर**
**दक्षिण : लागू गट नंबर उत्तर : ९ मीटर रोड व वापर**

आकार : पूर्व पश्चिम **५८.९७ चौरस मीटर** दक्षिणोत्तर..........

वरील नामांतराबाबातच्या कोणास आक्षेप असेल त्यांनी १५ दिवसांचे आत सकारण लेखी निवेदन कागदोपत्र पुराव्यानिशी या कार्यालयात दाखल करावे. मुदती नंतर कोणतेही आक्षेप विचारात घेतले जाणार नाही व नियमानुसार पुढील कार्यवाही करण्यात येईल.

मुख्याधिकारी
नगरपंचायत सोयगाव

## नोटीस

संस्थेच्या तमाम ठेवीदार कर्जदार व हितचिंतक यांना या नोटीसद्वारे कळविण्यात येते की, आमची शाखाः बिडकीन या शाखेमध्ये पिग्मी कलेक्शन करत असलेले एजंट नाव श्री. दिनेश विजयराव भवर रा. मारवाडी गल्ली, बिडकीन ता पैठण जि. छत्रपती संभाजीनगर यांनी संस्थेकडे एजंट या पदाचा राजीनामा देण्याबाबत अर्ज दिलेला आहे. तरी सदरील एजंट यांच्या दैनंदिन बचत खाते संदर्भात काही तक्रार अथवा अडचण असल्यास ही नोटीस प्रसिद्ध झालेल्या दिवसांपासुन आठ दिवसाच्या आत योग्य त्या कागदोपत्री पुराव्यासह संस्थेच्या मुख्य कार्यालयात अहमदनगर येथे संपर्क साधावा. आठ दिवसाच्या आत संस्थेच्या मुख्य कार्यालयास दैनंदिन बचत खात्या संदर्भात कुठलीही तक्रार प्राप्त न झाल्यास सदर एजंटचा राजीनामा स्वीकारून त्यास एजंट पदाच्या जबाबदारीतून मुक्त करण्याचा अधिकार संस्थे स राहील व उशिरा आले ल्या दैनंदिन बचत खाते संदर्भात तक्रारीचा विचार केला जाणार नाही व यानंतर सदर व्यक्तीबरोबर केलेल्या कोणत्याही व्यवहारास संस्था जबाबदार राहणार नाही. याची नोंद घ्यावी.

कळावे,

श्री रेणुकामाता मल्टीस्टेट को-ऑप
अर्बन क्रेडिट सो. लि., अहमदनगर
तर्फे
व करीता मोरे हरीश्चंद्र अंबादास (मुख्य कार्यकारी अधिकारी)
दि..१३/११/२०२५

लातूर
# दिनांक

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

## प्रा.अनुजा कांबळे-धायगुडे यांना पीएच.डी. प्रदान

**त.भा. वृत्तसेवा,**

**लातूर, १२ नोव्हेंबर :** येथील दयानंद शिक्षण संस्थाद्वारा संचालित दयानंद वाणिज्य महाविद्यालयाच्या सहाय्यक प्राध्यापिका अनुजा अरुण कांबळे (धायगुडे) यांना स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाने पीएच.डी. पदवी प्रदान केली आहे.

प्रा. अनुजा कांबळे यांनी 'आधुनिक तंत्रज्ञानाचा प्रभाव वाणिज्य आणि व्यवस्थापन शिक्षणावर कोविडपूर्व व कोविडनंतर ' या अत्यंत महत्वाच्या आणि समकालीन विषयावर संशोधन केले आहे. या संशोधनासाठी त्यांना प्राचार्या डॉ. सुजाता चव्हाण यांचे मार्गदर्शन लाभले. तसेच स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाचे को. डीन डॉ. एच.एस. पटणे, बाह्य मार्गदर्शक अरुण गायकवाड यांचेही मोलाचे मार्गदर्शन मिळाले. त्यांच्या या उल्लेखनिय यशाबद्दल दयानंद शिक्षण संस्थेचे अध्यक्ष लक्ष्मीरमण लाहोटी, सचिव रमेश बियाणी, प्राचार्य डॉ. प्रशांत मान्नीकर, उप प्राचार्य डॉ. गणेश लहाने, अंतर्गत गुणवत्ता हमी कक्षाचे समन्वयक डॉ. बाळासाहेब चव्हाण, वाणिज्य विभाग प्रमुख डॉ. मनिषा अष्टेकर आदींनी अभिनंदन केले आहे.





# लोहपुरुष पटेल यांच्या जयंतीनिमित्त पदयात्रेला लातुरात उत्स्फूर्त प्रतिसाद






**त.भा. वृत्तसेवा,**

**लातूर, १२ नोव्हेंबर :** देशाच्या एकात्मतेचे प्रतिक आणि लोहपुरुष म्हणून ओळखले जाणारे सरदार वल्लभभाई पटेल यांच्या १५० व्या जयंतीनिमित्त लातूर शहरात पदयात्रेचे आयोजन करण्यात आले होते. या पदयात्रेला शहरातील विविध महाविद्यालये, शाळा, स्वयंसेवी संस्था आणि नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला.

पदयात्रेची सुरुवात यशवंत विद्यालय आणि दयानंद कला महाविद्यालयाच्या संगीत विभागातर्फे सादर करण्यात आलेल्या देशभक्तीपर गीताने करण्यात आली. उपजिल्हाधिकारीसायली ठाकूर यांच्या हस्ते हिरवा झेंडा दाखवून जिल्हा क्रीडा संकुल येथून पदयात्रेला प्रारंभ झाला.

केंद्र शासनाचे युवा कार्य व क्रीडा मंत्रालय, लातूर जिल्हाधिकारी कार्यालय, लातूर मेरा युवा भारत केंद्र, राष्ट्रीय सेवा योजना क्षेत्रीय निर्देशनालय आणि जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने या पदयात्रेचे आयोजन करण्यात आले होते.

जिल्हा क्रीडा संकुल मैदानापासून छत्रपती शिवाजी महाराज चौक मार्गे भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर पार्कपर्यंत पदयात्रा काढण्यात आली. हातात तिरंगा आणि सरदार पटेल यांचे छायाचित्र घेऊन विद्यार्थ्यांनी दिलेल्या देशभक्तीपर घोषणांमुळे संपूर्ण वातावरण देशभक्तीमय झाले. कार्यक्रमाच्या शेवटी सरदार वल्लभभाई पटेल यांच्या जीवनकार्यावर प्रकाश टाकण्यात आला आणि राष्ट्रगीताने पदयात्रेची सांगता झाली.

लातूरचे उपविभागीय पोलीस अधिकारी समीरसिंह साळवे, जयक्रांती महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. श्रीधर कोल्हे, जिल्हा क्रीडा अधिकारी महादेव कसगावडे, जिल्हा युवा अधिकारी सशांक रावुला, राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रम समन्वयक डॉ. केशव आलगुले, मेरा युवा भारत केंद्राचे संजय ममदापुरे, डॉ. बालाजी होकरणे, माध्यमिक शिक्षण विभागाचे ढमाले, डॉ. गौरव जवळीकर यावेळी उपस्थित होते.

या पदयात्रेत यशवंत विद्यालय, श्री शिवाजी माध्यमिक विद्यालय, केशवराज विद्यालय, मारवाडी राजस्थान विद्यालय, श्री देशिकेंद्र विद्यालय, जयक्रांती महाविद्यालय, दयानंद वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, बसवेश्वर फार्मसी कॉलेज, राजर्षी शाहू महाविद्यालय, तसेच एनसीसी आणि एनएसएस विभागाच्या विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदविला. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी महावीर काळे, प्रशांत साबणे प्रियंका मोरे, अश्विन स्वामी, रमेश शिंदे, संदीप भोसले आणि वेंकटेश हालींगे यांनी विशेष परिश्रम घेतले.



# गौतम बुद्ध, छत्रपती शिवाजी महाराज व राष्ट्रपिता गांधींच्या मूर्तीची स्थापना

**त.भा. वृत्तसेवा,**

**लातूर, १२ नोव्हेंबर :** : रयतेचे राजे आणि हिंदवी स्वराज्याचे निर्माते छत्रपती शिवाजी महाराज, विश्वाच्या कल्याणासाठीचे पंचशील तत्वज्ञान देणारे तथागत भगवान गौतम बुद्ध आणि मानव केंद्रबिंदू ठेवून खेड्यांच्या विकासातूनच राष्ट्र विकास होईल हा मूलमंत्र देणारे राष्ट्रपिता महात्मा गांधी यांचा आदर्श नव्या पिढीला प्रेरणादायी व्हावा तसेच यांचा आदर्श हाच मानवातील स्नेहभाव वृद्धिंगत करण्यासाठी उपयोगी पडेल हे जाणून विश्वधर्मी प्रा.डॉ. विश्वनाथ दा. कराड यांनी त्यांच्या मूर्तीची स्थापना रामेश्वर (रूई) येथे उभारण्यात आलेल्या 'विश्वधर्मी मानवता तीर्थ भवनात' केली.

विश्व शांती केंद्र (आळंदी), माईर्स एमआयटी, पुणे भारत व मानवता तीर्थ रामेश्वर (रूई) यांच्या संयुक्त विद्यमाने जगातील सर्वात मोठ्या आणि विस्तीर्ण दालन असलेल्या 'विश्वधर्मी मानवता तीर्थ भवन' या वास्तूमध्ये सत्य, शांती, अहिंसा, प्रेम आणि मानवतेचे मूर्तिमंत प्रतीक असलेल्या, मानवी इतिहासातील काही उत्तुंग व पथदर्शी व्यक्तिमत्वांच्या चैतन्यदायी प्रतिकांची या ठिकाणी प्रतिष्ठापना आणि पूजन मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी विश्वधर्मी मानवतातीर्थ भवन या वास्तूचे संकल्पक, संरचना, नियोजक व निर्मितीकार एमआयटी वर्ल्ड पीस युनिव्हर्सिटीचे संस्थापक अध्यक्ष विश्वधर्मी प्रा.डॉ. विश्वनाथ दा. कराड, प्रगतिशील शेतकरी हभप काशीराम दा. कराड, ऋषिकेश कराड, माईर्स एमआयटीचे कुलसचिव डॉ. रत्नदीप जोशी, वरिष्ठ सल्लागार डॉ. संजय उपाध्ये, गिरीश दाते, संचालक डॉ. महेश थोरवे, दिलीप पाटील, विष्णू भिसे, सचिन मुंडे व योगेश पारखी उपस्थित होते.

यावेळी विश्वधर्मी प्रा.डॉ. विश्वनाथ दा. कराड म्हणाले, गौतम बुद्धांचे विश्वशांतीचा संदेश देणारे तसेच पंचशीलाचे तत्वज्ञान जगाला मार्गदर्शक ठरणारे आहे. दया, क्षमा, शांती, त्याग, सेवा, समर्पणाच्या विचारांमध्येच अखिल मानव जातीचे कल्याण सामावलं आहे. तसेच स्वत्व आणि स्वाभिमान यांची शिकवणूक देत पर्यावरण स्नेही राज्याची निर्मिती करणारे रयतेचे राजे व हिंदवी स्वराज्याचे निर्माते छत्रपती शिवाजी महाराज यांचा प्रेरणादायी आदर्श हाच मानवातील स्नेहभाव वृद्धिंगत करण्यासाठी उपयोगी आहे. भारतीय संस्कृतीचे वसुधैव कुटुंबकम व एकं सत विप्रा बहुदा वदंती हा संदेशच जगाला विनाशापासन वाचवू शकतो. हाच संदेश रामेश्वर रूई येथे साकारलेल्या एकमेवाद्वितीय अशा 'विश्वधर्मी मानवतातीर्थ भवना' च्या माध्यमातून संपूर्ण जगाला देण्याचा छोटासा प्रयत्न आहे.

डॉ. रत्नदीप जोशी म्हणाले, जगामध्ये विद्वेषाची भावना वाढीस लागत असताना व्यक्ती व्यक्तींमधील सहसंवाद आणि स्नेहभाव वृद्धिंगत व्हावा यासाठी रामेश्वर रूई येथे विश्वधर्मी मानवता तीर्थ भवनाची संकल्पना डॉ. विश्वनाथ दा. कराड यांनी केली. त्याची निर्मिती हेच एक मोठे आद्भुत आश्चर्य आहे. ९० फूट रूंदीचा मधला सभागृहाचा भाग हा भारतातील एकमेव द्वितीय असून या सभागृहामध्ये शैक्षणिक, सांस्कृतिक, सामाजिक स्नेहभावाचे तसेच ग्रामीण जनतेची काळ्या मातीशी असलेली नाळ दिसून येते.

हिंदवी स्वराज्याचे संस्थापक छत्रपती शिवाजी महाराज यांचा साडेतीन फूटाचा अर्ध पुतळा विधिवत पूजन करुण बसविण्यात आला. तीन फूट सात इंचाचा अर्ध पुतळा हा पंचधातुंनी निर्मित केलेला असून त्याचे वजन १४४ किलो आहे. या मूर्तीला सुवर्ण जडीत करण्यात आले आहे. तसेच भगवान गौतम बुद्ध आणि राष्ट्रपिता महात्मा गांधी यांची अप्रतिम व रेखीव मूर्तीची निर्मिती करण्यात आली आहे.

# 'सोमाणी'च्या श्रेयशची राष्ट्रीय ज्युदो स्पर्धेसाठी निवड



**त.भा. वृत्तसेवा,**

**लातूर, १२ नोव्हेंबर :** येथील श्रीकिशन सोमाणी विद्यालयाचा इयत्ता दहावी मधील विद्यार्थी श्रेयश श्रीकांत शेळके याची राष्ट्रीय ज्युदो स्पर्धेसाठी निवड झाली आहे.

पुण्याच्या बालेवाडीत नुकत्याच पार पडलेल्या राज्यस्तरीय शालेय ज्युदो स्पर्धेत १७ वर्षांखालील मुलांच्या वयोगटातून, ७३ किलो वजनी गेटमधून श्रेयशने प्रथम क्रमांक पटकावला होता. या यशामुळे श्रेयशची मणिपूरचे राजधानी इंफाळ येथे आयोजित करण्यात आलेल्या राष्ट्रीय ज्युदो स्पर्धेसाठी निवड झाली आहे.

श्रेयश शेळके याने मिळवलेल्या या नेत्रदीपक यशाबद्दल संस्थेचे अध्यक्ष डॉ. चेतन सारडा, सचिव कमलकिशोर अग्रवाल, कोषाध्यक्ष जयेश बजाज, शालेय समितीचे अध्यक्ष अतुल देऊळगावकर, मुख्याध्यापक रमाकांत स्वामी, पर्यवेक्षक गिरीश कुलकर्णी, सुनीता जाधव, राहुल पांचाळ यांच्यासह सर्व शिक्षक-शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांनी अभिनंदन केले आहे. श्रेयशला क्रीडा शिक्षक रुपाली कांबळे, गोरख राठोड, माणिक हाके यांचे मार्गदर्शन लाभले.

# देवणीच्या विकास कामाच्या चौकशीसाठी आमरण उपोषण

**त.भा. वृत्तसेवा,**

**लातूर, १२ नोव्हेंबर :** देवणी नगर पंचायतीला विविध विकास कामासाठी आलेल्या निधीचा योग्य वापर करण्यात आलेला नाही, केलेल्या कामाची चौकशी करावी व झालेल्या कामाचे फलकाद्वारे माहिती प्रसिध्द करावी आदी मागण्यांसाठी शिवसेना उध्दव बाळासाहेब ठाकरे पक्षाच्या वतीने जिल्हाधिकारी कार्यालयासमोर आमरण उपोषण करण्यात येत आहे.



वर्ष २०२२ पासून देवणी नगर पंचायतीला विविध विकास कामासाठी मोठ्या प्रमाणात निधी प्राप्त झाला. बांधकाम, रस्ते, गटारी, दलित वस्ती, सुलभ शौचालय, पाणीपुरवठा, स्वच्छता, घनकचरा व्यवस्थापन, विद्युत पुरवठा, अग्निशमन, स्वच्छता कामगार यासाठी आलेल्या निधीची माहिती व झालेला खर्च, तसेच नगर पंचायतीने घेतलेल्या ठरावाची प्रोसिडींग बुक, ऑडीट रिपोर्ट, झालेल्या खर्चाची माहिती उपलब्ध करून द्यावी, अशी मागणी करण्यात आली होती. त्याचप्रमाणे झालेल्या कामाचे माहितीचे फलक लावणे आवश्यक असतानाही त्याची कार्यवाही करण्यात आली नाही. बोगस व निकृष्ट दर्जाची कामे करून भ्रष्टाचार करण्यात आला. त्याची चौकशी व्हावी यासाठी शिवसेना उध्दव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे दीपक उमाकांत स्वामी व माधव रामराव तेलंगे यांनी जिल्हाधिकारी कार्यालयासमोर दि. १० नोव्हेंबरपासून उपोषण सुरू केले आहे.

# एकल महिलांसाठी राबविणार विशेष मोहीम

## रोजगार, स्वयंरोजगाराच्या संधी उपलब्ध करून देण्यासाठी प्रयत्न : जिल्हाधिकारी

**त.भा. वृत्तसेवा,**

**लातूर, १२ नोव्हेंबर :** जिल्ह्यातील एकल महिलांना शासकीय योजनांचा लाभ देवून त्यांना स्वावलंबी बनविण्यासाठी जिल्हा प्रशासनामार्फत विशेष मोहीम राबविली जाणार आहे. या अंतर्गत रोजगार, स्वयंरोजगाराच्या संधी उपलब्ध करून देण्याचा प्रयत्न केला जाणार आहे. पुढील तीन महिन्यात या उपक्रमांतर्गत राबविण्यात येणाऱ्या उपक्रमांची माहिती देण्यासाठी, कृती कार्यक्रम निश्चित करण्यासाठी जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर-घुगे यांच्या सूचनेनुसार सर्व शासकीय विभाग प्रमुखांसाठी कार्यशाळेचे आयोजन करण्यात येणार आहे. जिल्हाधिकारी कार्यालयामध्ये या अनुषंगाने जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर-घुगे यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या बैठकीत हा निर्णय घेण्यात आला.

रोहयोच्या उपजिल्हाधिकारी अहिल्या गाठाळ, जिल्हा नियोजन अधिकारी सोमनाथ रेड्डी, जिल्हा परिषदेचे उपमुख्य कार्यकारी अधिकारी बाळासाहेब वाघ, जावेद शेख, जिल्हा महिला व बालविकास अधिकारी संदीप यादव यांच्यासह संबंधित विभागांचे अधिकारी यावेळी उपस्थित होते.

**विविध शासकीय विभागांची लवकरच कार्यशाळा; पुढील तीन महिन्यातील कृती कार्यक्रम निश्चित होणार**

एकल महिलांना शासनाच्या विविध योजनांचा लाभ देवून त्यांना आर्थिकदृष्ट्या स्वावलंबी बनविण्यासाठी प्रयत्न करण्याची आवश्यकता आहे. यासोबतच त्यांच्यासाठी रोजगार, स्वयंरोजगार विषयक प्रशिक्षण आयोजित करावीत. १ डिसेंबर २०२५ पासून या अनुषंगाने पुढील तीन महिन्यांसाठी विशेष मोहीम हाती घ्यावी, अशा सूचना जिल्हाधिकारी श्रीमती ठाकूर-घुगे यांनी दिल्या.




# परवाने रद्द केलेली रास्तभाव दुकाने नव्याने सुरु करा : ॲड. ढवळे

**त.भा. वृत्तसेवा,**

**लातूर, १२ नोव्हेंबर :** कायमस्वरुपी परवाने रद्द केलेली महाराष्ट्रातील सार्वजनिक वितरण व्यवस्थेतील रास्तभाव दुकाने नव्याने जाहीरनामे काढून सुरू करण्याची सूचना राज्य अन्न आयोगाचे अध्यक्ष ॲड. महेश ढवळे यांनी अन्न नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभागाला केली आहे. यामुळे राज्यात हजारो रेशन दुकाने पुन्हा सुरू होण्याची आशा निर्माण झाली असून यातून रेशन कार्डधारकांची मोठी सोय होणार आहे.

राज्य अन्न आयोगाचे अध्यक्ष ॲड. महेश ढवळे यांनी याबाबत अन्न नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभागाच्या प्रधान सचिवांना पत्र लिहिले आहे. राज्य अन्न आयोग अध्यक्षांना दिलेल्या जबाबदारींच्या अनुषंगाने राज्यातील जिल्ह्यांना भेटी देऊन तेथील सार्वजनिक वितरण व्यवस्थेचा आढावा घेतल्याचे या पत्रात म्हटले आहे. यावेळी असे लक्षात आले की, राज्यात बऱ्याच जिल्ह्यांमध्ये विविध कारणांनी कायमस्वरुपी रद्द केलेली शेकडो तसेच राज्यभर हजारो रास्तभाव दुकाने आहेत. यापैकी न्यायप्रविष्ट प्रकरणांची संख्या तुलनेने कमी आहे, असे या पत्रात निदर्शनास आणून दिले आहे.



कायमस्वरुपी रद्द केलेल्या दुकानांचे रेशन कार्डधारक शासनामार्फत इतर रास्तभाव दुकानांना जोडणी केलेली आहेत. त्यामुळे अशा जोडणी केलेल्या प्रत्येक रास्तभाव दुकानांकडे ४ ते ५ हजार कार्डधारक लाभार्थी संख्या झालेली आहे. मोठ्या प्रमाणात कार्डधारक असल्याने वितरणावर ताण येत आहे. तसेच लाभार्थांना दूर अंतरांवरुन धान्य घेण्यास जावे लागत आहे. तसेच कांही नागरिकांना नैसर्गिक आपत्तीच्या घटनांमुळे लाभापासून वंचित रहावे लागत आहे. या परिस्थितींचा विचार करता अशा कायमस्वरुपी बंद दुकानांचे परवाने नव्याने वाटप करावेत, अशा सूचना शासनाकडून देणे आवश्यक आहे, असे ॲड. महेश ढवळे यांनी यांनी सूचित केले आहे. रास्तभाव दुकान परवाने वाटताना बचतगटांच्या अनुषंगाने काही निकष दिलेले आहेत. त्यामध्ये समाजातील वंचित घटकांकरिता काम करणाऱ्या संस्था, युवकांकरिता, विधवा, परित्यक्ता, अल्पभूधारक, अत्यल्प भूधारक, अपंग, तृतीयपंथी यांचे बचतगट यांचा देखील समावेश करावा, जेणेकरुन बेरोजगार घटकांना रोजगाराच्या संधी उपलब्ध होतील. त्यासाठी तसा सुधारित शासन आदेश निर्गमित करावा, असेही अध्यक्ष ॲड. ढवळे यांनी या पत्राद्वारे अन्न नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभागाच्या प्रधान सचिवांना सूचित केले आहे.

# माहिती कार्यालयातील रद्दी खरेदीसाठी दरपत्रके सादर करा

**त.भा. वृत्तसेवा,**

**लातूर, १२ नोव्हेंबर :** जिल्हा माहिती कार्यालय, येथील वृत्तपत्रांची व मासिकांची रद्दी विक्री करण्यात येणार आहे. यासाठी नोंदणकृत रद्दी खरेदीदारांनी आपली दरपत्रके २१ नोव्हेंबर २०२५ पर्यंत जिल्हा माहिती कार्यालयात सादर करण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

इच्छूक रद्दी खरेदीदारांनी आपले दरपत्रके बंद लिफाफ्यात जिल्हा माहिती अधिकारी, जिल्हा माहिती कार्यालय, मध्येवर्ती प्रशासकीय इमारत, तळमजला, उत्तर बाजू, लातूर या पत्यावर २१ नोव्हेंबर २०२५ सायंकाळी ५ वाजेपर्यंत कार्यालयीन वेळेत सादर करावीत. रद्दी खरेदीदाराकडे इलेक्टॉनिग वजन काटा असणे बंधनकारक आहे. या संदर्भातील अटी व शर्ती कार्यालयीन वेळेत कार्यालयात पाहता येतील. दरपत्रकात वृत्तपत्र रद्दी, मासिके रद्दी व पेपर गोळा याचे स्वतंत्र दर नमूद करावेत, रद्दी विक्रीचे दरपत्र मंजूर करणे अथवा रद्द करणे, तसेच संपुर्ण रद्दी विक्री प्रक्रिया रद्द करण्याचे सर्व अधिकार जिल्हा माहिती अधिकारी, लातूर यांना राहतील.